महावृक्षलागवड । सामाजिक न्याय । प्रेरणा । योजना । आरोग्य

जुलै २०१७ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य



## एकच लक्ष्य ४ कोटी वृक्ष

हरितसेना महाराष्ट्र

सत्यमेव जयते
सहकार व पणन विभाग

MACP
Maharashtra Agricultural Competitiveness Project, Pune

World Bank

# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प

''जागतिक बँक व महाराष्ट्र शासनाचा राज्यातील शेतमालाचे व शेळ्या-मेंढ्याचे उत्पादन वाढवण्याबरोबरच बाजारपेठांची क्षमता बांधणी, पर्यायी बाजार व्यवस्थांची निर्मिती व शेतकऱ्यांची बाजारपेठांशी जोडणीद्वारे शेतमालास व शेळ्या-मेंढ्यांना किफायतशीर भाव मिळवून देण्यासाठीचा राज्यातील एकमेव प्रकल्प.''

## राबवलेले प्रमुख उपक्रम व साध्य



- **शेतमालास किफायतशीर भाव मिळावा, यासाठी राज्यातील ८२ कृषी उत्पन्न बाजार समित्या, ४०० आठवडी बाजार, ११२ वखार महामंडळांची गोदामे व २४ जनावरांचे बाजार यांचे आधुनिकीकरण.**
- बाजार समित्यांच्या कामात सुसूत्रता यावी यासाठी संगणकीय लेखा पद्धत, संगणकीय लिलाव पद्धती यासाठी चालना.
- **निवडक बाजार समित्यांची गोदामे व वखार महामंडळाच्या ११२ गोदामांमधून शेतकरी, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी धान्य साठवणूक करावी यासाठी व धान्य तारण योजनेसाठी चालना.**





- राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये शेतमाल उत्पादनावर आधारित १३,००० शेतकरी गटांची स्थापना व या गटांना गावसमूह स्तरावर एकत्रीकरणातून ४१० शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना व या कंपन्यांना गावसमूह स्तरावर ''शेतकरी सामुदायिक सेवा केंद्र'' निर्मितीतून शेतमालाचे एकत्रीकरण व विपणनासाठी चालना.
- **शेळीपालनास चालना देण्यासाठी निवडक जिल्ह्यांमध्ये १००० उस्मानाबादी पैदासक्षम बोकडांचे वाटप, २५० शेळीपालन प्रात्यक्षिकांची उभारणी व ७०५ पशुसखींच्या नेमणुका व २८८ जनावरांची तपासणी व उपचार शिबिरांचे आयोजन.**



- प्रकल्पांतर्गत राज्यामध्ये शेतीवर आधारित उद्योग-व्यवसायांना चालना देण्याच्या दृष्टीने ''कृषी व्यवसाय प्रोत्साहन सुविधा'' व शेतकऱ्यांनी पिक पद्धतीमध्ये बदल करून व बाजारभावांचा विचार करून किफायतशीर शेती व्हावी या दृष्टीने ''भारतीय कृषी विपणन माहिती व विश्लेषण केंद्र'' या यंत्रणांची स्थापना व प्रकल्प पश्चात या सेवा निरंतर राहतील, या दृष्टीने वाटचाल.

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प**
प्लॉट नं. एफ/ई/७८, पहिला मजला, भूविकास बँकेचे प्रशिक्षण केंद्र, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे- ४११ ०३०
दूरध्वनी: (०२०) २४२७०३१५/२४२७०३१६, फॅक्स: (०२०) २४२७०३२२
E-mail: macp2009ymail.com | Website: http://macp.gov.in

# अंतरंग



### ५ केवळ कर्जमाफी नाही, कर्जमुक्ती...

शेती, दूध आणि पूरक व प्रक्रिया उद्योगांचे दीर्घकालीन धोरण आखून महाराष्ट्र सरकार वाटचाल करीत आहे. इतिहासातली सर्वांत मोठी कर्जमाफी सरकारने दिली असली तरी तेवढ्याने भागणार नाही. शेतकरी कायमचा कर्जमुक्त झाला पाहिजे. **– मुख्यमंत्री**


| | |
|---|---|
| केवळ कर्जमाफी नाही, कर्जमुक्ती... | ५ |
| वन है तो जल है, जल है तो कल है | ८ |
| वृक्षलागवडीचा लोकोत्सव | १२ |
| झाडांची भिशी | १७ |
| झाडे अशी लावा... | १८ |
| दुष्काळमुक्तीसाठी शाश्वत जलसंधारण | २० |
| राजर्षी शाहू महाराजांचे जलधोरण | २५ |
| 'जलयुक्त'ची किमया... | २६ |
| शेतकऱ्यांच्या हितासाठी | ३० |
| सक्षमीकरणाची नवी दिशा | ३२ |
| शिका आणि समर्थ व्हा... | ३६ |
| मिशन कुपोषण निर्मूलन | ४० |
| नोंदी | ४२ |
| आत्मविश्वास आणि चिकाटी | ४६ |
| पावसाळ्यात तब्येत सांभाळा... | ४८ |
| सायबर हल्ल्यापासून सावधान | ५० |
| एका आगळ्या लग्नाची गोष्ट | ५२ |
| जलसमृद्ध गोळेगाव | ५३ |
| स्मार्ट शाळा | ५४ |
| मतदार राजा: लोकशाहीचा धागा | ५६ |
| येथे कर माझे जुळती... | ५८ |


### ८ वन है तो जल है, जल है तो कल है




राज्यात १ जुलै ते ७ जुलै २०१७ या वनमहोत्सवाच्या काळात होणाऱ्या ४ कोटी वृक्षलागवडीची माहिती आणि त्यामागचा उद्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या शब्दात...

### १२ वृक्षलागवडीचा लोकोत्सव

हरित महाराष्ट्राच्या ध्येयनिष्ठ वाटचालीत लोकांचा सहभाग ही एक अमूल्य गोष्ट आहे. वन विभागाने पुन्हा एकदा राज्यातील जनतेला येत्या १ जुलै ते ७ जुलै या काळात ४ कोटी वृक्षारोपणाच्या कामात सहभागी होण्याची साद घातली आहे.



### २० दुष्काळमुक्तीसाठी शाश्वत जलसंधारण




'मी मुख्यमंत्री बोलतोय' या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाश्वत जलसंधारण करणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेची गावागावांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करून, तसेच रखडलेले सिंचन प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करून संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यात येईल; अशी ग्वाही दिली.

### ३२ सक्षमीकरणाची नवी दिशा

समाजाच्या तळागाळातील विविध घटकांना न्याय मिळावा, त्यांच्या जीवनाचा स्तर उंचवावा, यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

### ३६ शिका आणि समर्थ व्हा...



सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती, जमाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती जमाती या प्रवर्गातील शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात.

### ४० मिशन कुपोषण निर्मूलन

कुपोषण निर्मूलनासाठी आरोग्य विभागामार्फत विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्याचा आढावा नुकताच आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांनी घेतला. त्याचा वृत्तांत...

### ४६ आत्मविश्वास आणि चिकाटी




नागरी सेवा परीक्षेत महाराष्ट्रातून पहिल्या आलेल्या विश्वांजली गायकवाड यांची मुलाखत.

वर्ष ६९ वे | अंक १ | जुलै २०१७

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

**संपादन**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, देवेंद्र भुजबळ, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

**प्रशासन**

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

**मांडणी**

- मुखपृष्ठ — सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

**पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

**वितरण आणि वर्गणीदार**

वर्गणीदार व तक्रार निवारण – ०२२–२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

संपादकीय

# हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र

महाराष्ट्रासाठी जुलै महिना महत्त्वाचा ठरणार आहे. गेल्या वर्षी २ कोटींपेक्षा अधिक वृक्षलागवड करून, एका विक्रमाची नोंद राज्याने केली होती. लोकसहभागातून किती प्रचंड काम होऊ शकते, याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून याकडे पाहावे लागेल. वृक्षलागवडीच्या या उत्साहाने प्रेरित होऊन यंदा शासनाने ४ कोटी वृक्षलागवडीचे ध्येय ठरवले आहे. यंदासुद्धा गेल्या वर्षीसारखाच लोकांचा प्रतिसाद अपेक्षित असून, निर्धारित उद्दिष्टापेक्षा अधिक वृक्षलागवड होईल अशी अपेक्षा आहे. या वृक्षलागवडीमुळे राज्याची वाटचाल हरित महाराष्ट्राकडे होत आहे.

वृक्ष आपल्याला प्राणवायू देतात. सूर्यापासून निघणाऱ्या अतिनील किरणांपासून आपले संरक्षण करतात. पर्यावरणाचे संतुलन राखण्यात वृक्षांचा मोठा सहभाग असतो असे असूनही, मानवाने गेल्या काही वर्षात अपरिमित वृक्षतोड केली आहे. त्याचे दुष्परिणाम तापमान वाढ, निसर्गाच्या लहरीपणात वाढ, प्रदूषणात वाढ अशा विविधप्रकार आपल्यासमोर आहेत. आपले जीवनमान समृद्ध, सुखी आणि निरोगी ठेवण्यासाठी वृक्षांची गरज आहे. त्यामुळे राज्यशासन वृक्षलागवडीची महत्त्वाकांक्षी मोहीम राबवत आहे. वृक्षलागवडीच्या उत्साहासोबत आपण सर्वांनी वृक्षांचे संगोपन, निगा व संवर्धनासाठीही जागरूक असणे गरजेचे आहे, तेव्हाच ही मोहीम यशस्वी होईल.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. या कर्जमाफीच्या अनुषंगाने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेला विशेष लेख या अंकात आम्ही समाविष्ट केला आहे. 'आमचा बळीराजा ही आमच्या सरकारची सर्वोच्च प्राथमिकता होती, आहे आणि भविष्यातही राहील; पण त्याच वेळी शेतकरी कर्जाच्या विळख्यात पुन्हा अडकू नये हा माझा प्रयत्न आहे,' असे मुख्यमंत्र्यांनी या लेखात आवर्जून नमूद केले आहे.

अल्पावधीतच अतिशय लोकप्रिय ठरलेल्या, 'मी मुख्यमंत्री बोलतोय' या कार्यक्रमात जून महिन्यात मुख्यमंत्र्यांनी पिण्यासाठी पाणी, शेतीसाठी पाणी आणि उद्योगासाठी पाणी या विषयावर महाराष्ट्रातील जनतेशी वृत्तवाहिन्या, आकाशवाणी याद्वारे मनमोकळा संवाद साधला आणि नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. या कार्यक्रमाचा विस्तृत वृत्तांत आम्ही या अंकात दिला आहे. 'पाणी' या विषयावरील राज्यशासनाची भूमिका स्वयंस्पष्टरीत्या समजून घेण्यासाठी हा वृत्तांत उपयुक्त ठरेल.

आपल्या सर्वांच्या आवडत्या 'लोकराज्य'चे इंग्रजी भावंड 'महाराष्ट्र अहेड'च्या मे महिन्याच्या अंकाचे विशेष कौतुक पंतप्रधान कार्यालयाने केले. पीएमओ ट्विटरवर हा अंकही टाकण्यात आला. आमच्या परिश्रमाची दखल सर्वोच्च पातळीवरून घेतली गेल्याने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयासाठी ही अत्यंत अभिमान आणि आनंदाची बाब ठरली आहे. 'लोकराज्य' व 'महाराष्ट्र अहेड' या नियतकालिकांचे अंक अधिकाधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण होतील यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**



# केवळ कर्जमाफी नाही, कर्जमुक्ती...

**शेती, दूध आणि पूरक व प्रक्रिया उद्योगांचे दीर्घकालीन धोरण आखून महाराष्ट्र सरकार वाटचाल करीत आहे. त्याची फळेही आता दिसू लागली आहेत. इतिहासातली सर्वात मोठी कर्जमाफी सरकारने दिली असली तरी तेवढ्याने भागणार नाही. शेतकरी कायमचा कर्जमुक्त झाला पाहिजे.**




**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री


जगाचा पोशिंदा असलेला आमचा शेतकरी कालही अडचणीत होता आणि आजही आहे. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी राज्याची सूत्रे हाती घेतली, तेव्हा ज्या काही समस्या माझ्या पदरी पडल्या, त्यातील सर्वांत मोठी समस्या ही शेतीची होती. म्हणूनच सरकारने प्रारंभापासूनच या क्षेत्रावर विशेष लक्ष दिले. शेतीतील समस्यांकडे मुख्यमंत्री म्हणून जसे माझे लक्ष असते, तसेच एक शेतकरी म्हणूनही मी या समस्यांकडे पाहतो. स्वत: एक शेतकरी असल्याने या व्यथा मी जवळून पाहिल्या आणि अनुभवल्या आहेत. मागास भागाचे १५ वर्षे प्रतिनिधित्व केले आहे. राज्याच्या इतिहासातील सर्वांत मोठी कर्जमाफी जाहीर करताना माझ्या मनात याच भावना दाटून आल्या आहेत. आमचा बळीराजा ही आमच्या सरकारची सर्वोच्च प्राथमिकता होती, आहे आणि भविष्यातही राहील. पण त्याच वेळी शेतकरी कर्जाच्या विळख्यात पुन्हापुन्हा अडकू नये, हा माझा प्रयत्न आहे.

पाणी आणि वीज या शेतीच्या समस्या असल्या तरी त्याहून अधिक समस्या मला शेतमालाला मिळणाऱ्या कमी भावाची वाटते. बाजारपेठेचा अभाव आणि नगण्य असलेला कृषिप्रक्रिया उद्योग यातून शेतीचे अर्थकारण धोक्यात आले. शेतीत वरकरणी अनेक उपाय वेळोवेळीच्या राज्यकर्त्यांनी केले. मात्र, जखम पूर्णत: बरी होईल, अशी दीर्घकालीन योजना कधीच अमलात आणली गेली नाही. टीका काही काळ बाजूला ठेवली तरी वस्तुस्थिती नाकारून चालत नसते. तसे केले तर ती स्वत:च स्वत:ची केलेली फसवणूक ठरते. उत्पादकता वाढवण्यासाठी पाणी आणि वीज जितकी आवश्यक, तितकीच पिकलेल्या शेतमालाला योग्य भाव देणारी बाजारपेठसुद्धा आवश्यक आहे. (उत्पादकता वाढवणे, हे मी जेव्हा जेव्हा म्हणतो, तेव्हा त्यात लागतमूल्य कमी करणे आणि हेक्टरी उत्पादन वाढवणे, हे अपेक्षित आहे. तरच खऱ्या अर्थाने हमीभाव हा परवडणारा असेल.) कांद्याचे उदाहरण बघा! पूर्वी, संपूर्ण देशाला कांदे आपण पुरवायचो. उत्तरेकडील सर्व राज्ये आणि मध्य प्रदेश ही आपली बाजारपेठ होती. आज नऊ राज्ये कांदा उत्पादन घेतात. त्यामुळे, पर्यायी पिकांकडे आपल्याला वळावे लागेल. नाही तर शेतमालाला भाव नसणे, हा चिंतेचा विषय बनतो. बाजारातील ग्राहकांना आकारले जाणारे दर आणि शेतकऱ्यांना मिळणारा प्रत्यक्ष भाव ही तुलना अस्वस्थ करते. पण, हातावर हात देऊन बसण्यापलीकडे आधीच्या राज्यकर्त्यांनी काही केले नाही आणि मध्यस्थांचे फावले. दलाल, अडत्यांची साखळी निर्माण झाली आणि शेतकरी पुरता नागवला गेला.

### अवघ्या अडीच वर्षात...

आम्ही या साऱ्या समस्यांना एकदम भिडलो. शाश्वत सिंचनासाठी प्रयत्न सुरू केले. त्याच वेळी ते पाणी शेतीला देता यावे, यासाठी त्याला वीजजोडणी दिली. शेतकऱ्याची बाजारपेठ त्याच्या हाती असावी, यासाठी 'संत सावता माळी आठवडी बाजार योजनेला' गती दिली आणि

त्या भागात जे पिकते, त्या भागात त्यावर प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात यश मिळवले. काही प्रकल्प पूर्ण होत आहेत. काही लवकरच पूर्ण होतील. आज विरोधक टीका करीत असले तरी या सर्व सामूहिक प्रयत्नांना मिळणारे यश आणि त्याचे भविष्यातील फलित, याची अस्वस्थता त्यांच्या टीकेतून अधिक जाणवते. जे आपल्याला ५० वर्षांत जमले नाही, ते या सरकारला केवळ अडीच वर्षांत जमतेच कसे, हेच खरे दुखणे आहे. शेतीतील प्रत्येक घटकाबाबत ती १५ वर्षे आणि आमची अडीच वर्षे अशी तुलना केली तरी हे काम किती मोठे आहे, याची सहज कल्पना यावी. या प्रयत्नांचा खरा लाभार्थी असलेला शेतकरी, सुरक्षित हातांत राज्यकारभार दिला, याबद्दल आश्वस्त आहे. या सरकारने निर्णयशून्यता संपविली व कार्यतत्परता आणली.

## देशाचे रोल मॉडल 'जलयुक्त शिवार'

जनआंदोलनाच्या रूपाने समाजाने स्वीकारलेली, अन्य राज्यांनी मॉडेल म्हणून स्वीकार केलेली जलयुक्त शिवार योजना ही आज शेतीला शाश्वत सिंचन देते आहे. राज्यात ११ हजारांहून अधिक गावांतील पाण्याचा प्रश्न मिटला आणि कधी ना कधी दुष्काळात सापडणारी २४ हजार गावे दुष्काळमुक्त करण्याकडे दमदार वाटचाल चालू आहे. जलयुक्त शिवारची आजवर किमान तीन लाखांवर कामे झाली. यातून जी १२ लाख हेक्टर सिंचनक्षमता तयार झाली, त्यासाठी केवळ चार हजार १७८ कोटी रुपये आम्ही खर्च केले. त्यातही ५६० कोटी जनता-जनार्दनाने दिले. याच कामांसाठी जुने सरकार वापरत असलेले 'कॅल्क्युलेटर' हाती घेतले, तर तीस हजार कोटी लागले असते. पूर्ण झालेल्या ६० हजार विहिरी, ५० हजारांवर शेततळी ही मोठी कामे पार पडली. 'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार'ची तर कामे सुंदर होत आहेत. यातून किमान ५० हजार तलावांमधील गाळ काढून तो शेतीत पसरवला जाईल. प्रादेशिक पातळीवर सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती मिळाली आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत राज्याला २६ हजार कोटींची मदत केंद्राने दिली. पूर्वीच्या सरकारमध्ये शेतकऱ्यांना जमीन अधिगृहीत करताना कवडीमोल मोबदला मिळे. आता पाचपट मोबदला मिळत असल्याने सर्वांत मोठा अडसर असलेली भूसंपादनाची कामे वेगाने होत आहेत. या साऱ्या कामांचा अतिशय अनुकूल परिणाम गावोगावी दिसू लागला आहे.

## सिंचन प्रकल्पांना गती

शेतकऱ्यांना आधार द्यावयाचा असेल तर महाराष्ट्रातील रखडलेले प्रकल्प मार्गी लावणे अत्यंत आवश्यक होते. ते काम आम्ही वेगाने सुरू केले आहे. कृष्णा-मराठवाडा प्रकल्प अनुशेषातून बाहेर काढून त्यासाठी २५० कोटींची तरतूद आम्ही केली. गोसीखुर्द, निम्नवर्धा, बेंबळा अशा अनेक प्रकल्पांना गती दिली. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प 'प्रधानमंत्री कृषीसिंचन योजने'त आणले. अगदी खारपाणपट्ट्याचाही बारकाईने नियोजनात समावेश करण्यात आला. विदर्भ-मराठवाड्यात चार हजार गावांमध्ये 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प' जागतिक बँकेच्या मदतीने सध्या राबवला जातो आहे.

## विक्रमी गुंतवणूक

राज्याच्या इतिहासात झाली नाही, इतकी गुंतवणूक या दोन वर्षांत शेतीत झाली आहे. त्याचा परिणामही दिसतो आहे. शेतीचा विकासदर प्रथमच दुहेरी आकड्यांत म्हणजे १२.५ टक्के इतका झाला आहे. गेल्या सरकारने केलेली एकूण कर्जमाफी ही सात हजार कोटींची होती. पण, आपल्या सरकारने शेतकऱ्यांना दोन वर्षांत रोखीने दिलेली मदत त्याहूनही अधिक आहे. गेल्या सरकारने १५ वर्षांत दिलेली मदत अवघी चार



## शेतीपूरक उद्योगांची भरारी

शेतीपूरक उद्योगांच्या क्षेत्रातही राज्य सरकारने मोठी झेप घेतली. आज विदर्भ आणि मराठवाड्यात तीन हजार गावांमध्ये एनडीडीबीच्या सहकार्याने दूध उत्पादनाला चालना दिली जात आहे. हा कार्यक्रम सर्व गावांमध्ये जावा, असा आमचा प्रयत्न आहे. दूधउत्पादक शेतकऱ्यांचा नफा यामुळे प्रतिलीटर चार रुपयांनी वाढला आहे. ज्यांनी आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी दुधाचा सरकारी ब्रँड संपविला, तेच आज शेतकऱ्यांचे कष्टाचे दूध रस्त्यावर ओतायला आतुर दिसतात. दुधसंघांनी आपला नफा शेतकऱ्यांसोबत नीट वाटला असता तर आज दूध शेतकरी अडचणीत सापडला नसता. म्हणून नफ्याचे प्रमाण ७०:३० असावे, असा राज्य सरकारचा आग्रह आहे. मोर्शीत पिकणारे संत्रे असो, की कापसावर प्रक्रिया करणारा नांदगाव खंडेश्वरचा 'फार्म टू फॅशन' टेक्सटाइल पार्क असो, नांदेडमधला फळप्रक्रिया प्रकल्प असो की, नागपुरातील फूडपार्क असो, कोकणातील काजुबोंडावरील प्रकल्प असो की जालन्यातील सीडपार्क असो, असे अनेक प्रकल्प सरकारने हाती घेतले.

'जेथे जे पिकतं, तेथे ते खपत नाही', ही म्हण लवकरच खोटी ठरेल.

'कोकाकोला'च्या मिनिटमेडमध्ये विदर्भ, मराठवाड्यातील मोसंबीचा रस आता दिसू लागला आहे. 'फँटा'मध्ये दहा टक्के संत्र्याचा लगदा वापरणेही आता लवकरच सुरू होईल.

हजार ४३८ कोटी रुपये होती. आघाडी सरकारने १५ वर्षांत पीकविम्यापोटी चार हजार सहाशे कोटी रुपये दिले (वर्षाला सरासरी ३०६ कोटी), तर आपल्या सरकारने अडीच वर्षांत सहा हजार ७३९ कोटी रुपये दिले. (म्हणजे वर्षाला सरासरी तीन हजार ३६९ कोटी). जे सरकार वर्षाकाठी २३ हजार वीज जोडण्या द्यायचे, तेच महाराष्ट्र सरकार आज अडीच वर्षांत दोन लाख ७५ हजार जोडण्या देऊ शकले. ही आमच्या कामाची गती आहे. आता सौरफीडरच्या माध्यमातून शेतकऱ्यांना १२ तास वीज दिली जाईल. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये तातडीने उपाय योजणे आवश्यक होते. तेथे 'महात्मा फुले जनारोग्य योजने'च्या माध्यमातून मोफत उपचारांची सुविधा देण्यात आली. पाच लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सहाशे कोटी खर्चून उपचार देण्यात आले. या १४ जिल्ह्यांतील ६८ लाख शेतकऱ्यांना गेल्या दोन वर्षांत चौदाशे कोटींचे धान्य देण्यात आले. दोन रुपये किलो दराने गहू आणि तीन रूपये किलो दराने तांदूळ देण्यात आला.



दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मुलांची फी सरकार भरत आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना शहरांत उच्च शिक्षणाच्या संधी मिळाव्या, यासाठी 'डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता' सुरू झाला. मोठ्या शहरांत वर्षाकाठी ३० हजार रुपये या योजनेत दिले जातात.

## विविध उपाययोजना

योग्य वेळी कर्जमाफी करणारच, हे अगदी पहिल्या दिवसापासून आम्ही सांगत होतो. पण, कर्जमाफी करण्यापूर्वी बळीराजा पुन्हा कर्जबाजारी होणार नाही, याचेही प्रयत्न आवश्यक होते. कर्जाच्या परिघाबाहेर गेलेल्या शेतकऱ्याला कर्ज मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणात पीककर्जाची फेररचना केली. आधीच्या सरकारच्या काळात ३२ हजार कोटींच्या पुढे कर्ज गेले नाही. ते प्रमाण आज ४२ हजार कोटी आहे. गावातच हवामानाचा अंदाज कळावा, त्यातून शेतकऱ्याला पीकनियोजन करता यावे, कापणी, पेरणी, रोवणी याचे निर्णय घेता यावेत, यासाठी दोन हजार ६५ हवामानकेंद्रांची उभारणी करण्याचे सरकारने ठरवले. इतकी हवामान केंद्रे उभारणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. गटशेती, तंत्रज्ञानाची जोड असेही अनेक उपाय हाती घेतले आहेत. शेतमालाला पूर्वीपेक्षा अधिक भाव देण्याचे काम सरकारने केले. मध्यंतरी तुरीचा प्रश्न होता. संपूर्ण देशातील ११ लाख टन खरेदीपैकी विक्रमी सहा लाख टन तूरखरेदी महाराष्ट्रात झाली. ५०५० रुपये असा सर्वाधिक दर दिला. यापूर्वीच्या सरकारने केलेली सर्वाधिक तूरखरेदी ही २० हजार टन होती.

## शेतकरी आंदोलन

शेतकऱ्यांचे आंदोलन मी समजावून घेतले. पण, त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून काही राजकीय पक्षांनी जो धुडगूस घातला, जी हिंसा केली, ज्या शेतमालाची नासाडी केली, त्यामुळे, मात्र व्यथित झालो. ही आंदोलने न्याय्य मागण्यांसाठी आहेत, की शेतकऱ्यांचे आणखी आर्थिक नुकसान करण्यासाठी? राज्याच्या इतिहासातील सर्वांत मोठी कर्जमाफी शेतकऱ्यांना मिळेलच, हा माझा शब्द आहे. गरजू आणि गरीब, ज्यांना खऱ्या अर्थाने या मदतीची गरज आहे, त्यांनाच ती मिळेल. हमीभावापेक्षा कमी किंमतीत शेतमालाची खरेदी लवकरच कायदेशीर गुन्हा ठरेल. शेतकऱ्याचा सात-बारा कोरा करण्याचा प्रयत्न होत असतानाच तो पुन्हा कर्जबाजारी होणार नाही, ही काळजी घेण्याचे काम करणे हेच राजकीय परिपक्वतेचे लक्षण आहे. त्यांच्या कष्टाचा पैसा जोवर त्यांच्या खिशात पूर्णपणे येत नाही, तोवर बळीराजा आनंदी आणि समृद्ध झाला, असे मानता येणार नाही. सरकारच्या या प्रामाणिक प्रयत्नांना सर्वांची साथ आहेच. पण, ती अधिक मिळावी, सर्वांनी या प्रयत्नांना हातभार लावावा, हेच माझे नम्र आवाहन आहे. अन्नदात्याचे ऋण आपल्या सर्वांनाच फेडायचे आहेत. आपले हात त्याचा घास हिसकावून घेण्यासाठी नाहीत, तर आनंदाने त्याला घास भरविण्यासाठी सरसावले पाहिजेत. मी प्रारंभीपासून आग्रह करीत आलो की, हा लढा केवळ एका कर्जमाफीने संपणारा नाही. तो केवळ एक टप्पा असू शकतो. खरा लढा हा शेतकऱ्यांच्या कायमस्वरूपी कर्जमुक्तीचा असला पाहिजे. कायमच्या कर्जमुक्तीचा आग्रह मी आजही धरतो. नव्हे, तो माझा निर्धार आहे. घेतलेले कर्ज स्वत: फेडण्याची ऐपत तयार करणे, हाच कर्जमुक्तीचा खरा अर्थ. ज्या दिवशी हे सारे हात एकत्र येतील, एकजुटीने काम करतील, झटतील तेव्हा तेच शेतकरी लढ्याचे खरे यश असेल!

प्रश्न तुलना करण्याचा नाही. टीकेचा तर नाहीच नाही. पण, विकासाचा आव आणून तो करून दाखवता येत नसतो. त्याला पोटतिडीक लागते. मेहनत लागते. घोषणा करायला परिश्रम लागत नाहीत. त्या प्रत्यक्षात उतरवायला जिद्द लागते. गाव, गरीब आणि किसान यासाठी सरकार अहोरात्र काम करते आहे. आज प्रशासनातील अधिकारीही ज्या गतीने या प्रक्रियेत सहभागी होत आहेत, जो उत्साह दाखवत आहेत, तो वाखाणण्याजोगा आहे. स्वच्छ भारत अभियानात गावागावात शौचालयांच्या निर्मितीत तर राज्याने मोठी मजल गाठली. आज १९ लाख शौचालये ग्रामीण भागात उभारण्यात आली आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेतून शेतकऱ्यांना त्याच्या हक्काचा निवारा मिळत आहे.

साभार : महाराष्ट्र टाइम्स (१५, १६ जून २०१७)

# वन है तो जल है, जल है तो कल है

**राज्यात १ ते ७ जुलै २०१७ या वनमहोत्सवाच्या काळात होणाऱ्या ४ कोटी वृक्षलागवडीची माहिती आणि त्यामागचा उद्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या शब्दांत...**




**सुधीर मुनगंटीवार**
वनमंत्री


जग भौतिक सुखाच्या मागे लागले असून परकॅपिटा इनकम, जीडीपी ग्रोथ ही त्याची भाषा झाली आहे. हर व्यक्ती धन की बात सुनता है लेकिन आवश्यकता है मन की बात सुननेकी. येथे एक पर्यावरणवादी म्हणतो, जगण्यासाठी प्रत्येकाला प्राणवायू लागतो की पैसा? हे एकदा श्वास बंद करून नोटा मोजा.. म्हणजे मग पर्यावरणशास्त्र महत्त्वाचे की अर्थशास्त्र महत्त्वाचे हे लक्षात येईल. खरे तर साधे सूत्र आहे. जिथे वनसृष्टी तिथे जीवसृष्टी. वन है तो जल है, जल है तो कल है..

आपण पर्यावरणाचा प्रचंड ऱ्हास करत असताना ग्लोबल वॉर्मिंग, क्लायमेट चेंजसारखे शब्द शब्दकोशातून बाहेर पडले. आता आपण त्याची चिंता करत आहोत. ज्या वसुंधरेने मनुष्याचे पोषण केले तो मनुष्य मात्र वसुंधरेचे शोषण करण्यात धन्यता मानत आहे. यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. हे प्रश्न सोडवायचे असतील, पर्यावरणाचे संतुलन टिकवायचे असेल तर एकच रामबाण उपाय आहे तो म्हणजे वृक्षलागवड.



एका माणसाला रोज २१०० रुपयांचा प्राणवायू लागतो. तो जर ८० वर्षे जगला तर त्याचे दिवस होतात २९२००. या पूर्ण आयुष्यात त्याने घेतलेल्या प्राणवायूची बाजारभावाप्रमाणे किंमत काढली तर तो ६ कोटी १३ लाख २० हजार रुपयांचा प्राणवायू पूर्ण आयुष्यात घेतो. माझे म्हणणे आहे की, त्याने ६ कोटीची नाही, १३ लाखाची नाही, २० हजार रुपयांची नाही पण किमान २० रुपयांचे एक झाड तरी आयुष्यात लावावे आणि पर्यावरणाच्या ऋणातून मुक्त व्हावे.

## लोकसहभाग

वृक्षलागवड हे लोकसहभागातून हाती घेतलेले मिशन आहे. हे काम फक्त सरकारी राहता कामा नये. हे फक्त वनमंत्री, वन सचिव किंवा वन विभागांच्या २७ हजार कर्मचाऱ्यांनी करावयाचे काम नाही. हे वृक्षधनुष्य प्रत्येकाने उचलण्याची गरज आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्र हे वनक्षेत्र असले पाहिजे असे राष्ट्रीय वननीती सांगते. आज राज्याचे वनक्षेत्र २० टक्क्यांच्या आसपास आहे ते ३३ टक्क्यांपर्यंत न्यायचे असेल तर वनजमीन पुरेशी नाही. वनेतर जमिनीवरही आपल्याला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करावी लागेल. फक्त वृक्ष लावणे हे, या मिशनचे उद्दिष्ट नाही तर वृक्ष लावण्याच्या मानसिकतेचे बीजारोपण करणे हा त्याचा हेतू आहे. मागच्या वर्षी आपण २ कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवले. या वर्षी ४ कोटी पुढच्या वर्षी १३ कोटी आणि त्याच्या पुढच्या वर्षी ३३ कोटी अशी तीन वर्षात ५० कोटी झाडे लावायची आहेत. ज्याला वृक्ष लावायचे आहेत त्याला प्रत्येकाला यात सहभागी होता येणार आहे.

भारतीय संस्कृती ही पर्यावरणावर प्रेम करणारी, वन आणि वृक्षांशी नाते जोडा असे सांगणारी संस्कृती आहे. आपल्या प्रत्येक धर्मात वृक्षांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे साद घातली तर लोक पुढे येतात हा माझा मागच्या दोन कोटी वृक्षलागवडीचा अनुभव आहे. आम्ही १ कोटी लोकांची हरितसेना तयार करत आहोत. राज्यातला प्रत्येक नागरिक हरितसेनेचा सदस्य व्हावा आणि तो पर्यावरण रक्षणाचा सेनापती व्हावा हा प्रयत्न आहे. मला सांगायला आज आनंद होतो की, महाराष्ट्रात आज हरितसेनेमध्ये ३१ लाख लोकांनी सदस्यत्व स्वीकारले आहे.

## पर्यावरणवादी संस्कृती

आपल्या संतांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' असे म्हणत वृक्षांशी नाते जोडण्याचा संदेश दिला तर, 'वृक्ष भेद नही करते है गरिब और धनवान मे, देते सभीका साथ अंततक, जलकर भी शमशानमे', असे सांगत कुणी वास्तवाची जाणीव करून दिली गेली आहे. आपली संस्कृती ही पर्यावरणवादी संस्कृती आहे. पर्यावरणविरोधी संस्कृती नाही. जो हे जाणून घेणार नाही त्याला पर्यावरणही माफ करणार नाही. 'मृत्यूका जब खुला तांडव, मनुष्य के सामने आयेगा, क्यूँ नही बचाये हमने वृक्ष, यह सोचकर मानव पछतायेगा', अशी एक दिवस वेळ येईल. कारण, 'वृक्ष ही जीवन की मत्ता है, जाने हर इन्सान, इनके बिना संभव नही मानव का कल्याण', ही वस्तुस्थिती आहे.

हीच जाणीव आपण करून देत आहोत. लोक अतिशय छान आणि उत्साहवर्धक प्रतिसाद देत आहेत. रोज कुठून कुठून फोन येतात. सर आम्ही इतकी झाडे लावत आहोत. याचा खूप आनंद वाटतो. सोलापूरमध्ये एक डॉक्टरांचा समूह आहे. त्यांनी झाडांची भिशी हा

## जल, जमीन आणि जंगल वाचवा, ४ कोटी वृक्षलागवडीत सामील व्हा...

जल, जमीन आणि जंगल वाचवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे. एकीकडे आपण विकास करतोय पण त्याचबरोबर पर्यावरणाची हानी होते, हे प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे पर्यावरण संवर्धन हे मोठे आव्हान आहे. शासनाने ५० कोटी वृक्ष लागवड करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. या वर्षी ४ कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. जल, जमीन आणि जंगलाला आपल्या पूर्वजांनी ईश्वराचा दर्जा दिला आहे. या तिन्ही गोष्टी नष्ट झाल्या तर कुणीही जगू शकणार नाही. जगाला एका सूत्रात बांधून एकात्मता टिकवणे आवश्यक आहे. ते सूत्र आपल्या पूर्वजांना चांगले समजले होते. अलीकडच्या काही वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. तो कधी खूप पडतो, तर कुठे पडत नाही. त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. या पाठीमागे पर्यावरणाचे संतुलन बिघडणे, हेच मुख्य कारण आहे. पूर्वी गावागावांत नदीनाले, तलाव, छोटे बंधारे असायचे. त्यामुळे पाण्याचा प्रश्न नव्हता. अलीकडच्या काळात हे सर्व नैसर्गिक पाण्याचे स्रोत आपण नष्ट केले. पाणलोटाचे नुकसान केले. त्यामुळे पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली. यावर उपाय म्हणून शासनाने जलयुक्त शिवार ही योजना सुरू केली. त्यामुळे पाणीसाठा वाढला. शेकडो गावांना पाणी मिळाले. लातूर जिल्ह्यात आज एकही टँकर लागत नाही. हे जलयुक्त शिवारचे यश आहे. याला जोड हवी ती वृक्षसंवर्धनाची. त्यामुळे राज्य शासनाचा या वर्षीचा ४ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच जल, जमीन आणि जंगल वाचवण्यासाठी प्रत्येकाने मनापासून प्रयत्न करायला हवा.



**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

अनोखा उपक्रम राबवला आहे. दर महिन्याला ते २०० झाडांची भिशी काढतात. ज्याची भिशी निघते तो तितकी झाडे आपल्या साथीदारांच्या मदतीने लावतो. राजगुरुनगरच्या रानमाळा गावचे पी.टी. शिंदे नावाचे माजी सरपंच आहेत. त्यांनी सगळा गाव हिरवागार करून टाकला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने, 'अब जीडीपी, पर कॅपिटा इंकम की बात बहोत हुई अब पर कॅपिटा सॅटिसफॅक्शन की बात करते है', असे म्हणत २०३० साठी १७ उद्दिष्टे निश्चित केली. त्यात ५ मुद्दे पर्यावरणाशी संबंधित निवडले. त्यांनी भूतान देशाला सर्वात समाधानी देश म्हणून जाहीर केले. मला प्रश्न पडला..का? त्यांच्यापेक्षा जास्त सोयीसुविधा तर आपल्या देशात आहेत, मग असे का? कारण त्यांनी सर्वात जास्त वृक्ष लावून ते जगवण्याचे काम केले. राणीचा वाढदिवस असेल लावा वृक्ष, राजकुमाराचा जन्म झाला लावा वृक्ष, पास झालात लावा वृक्ष- नापास झालात लावा वृक्ष असे करत त्यांनी निसर्गाशी जुळवून घेण्याची वृत्ती वाढवली.

### फॉरेस्ट म्हणजेच जीवन

खर तर फॉरेस्ट या शब्दातच जीवन आहे. एफ स्टॅण्डस फॉर फ्रूट अ‍ॅण्ड फूड, ओ फॉर ऑक्सिजन, आर फॉर रेन, ई फॉर एनर्जी, एस फॉर सॉइल आणि टी फॉर टिक. जन्मापासून अखरेच्या श्वासापर्यंत वन आणि वनांशी आपला संबंध येतो. जीवन या शब्दातच जीव आणि वन आहे म्हणजे जिथे वन आहे तिथे जीव आहे. अमेरिका आणि चीनमध्ये 'ऑक्सिजन बार' आहेत. आपल्या देशात तरी प्राणवायू विकत घेण्याची वेळ येऊ नये. ज्या दिवशी ही वेळ येईल त्या दिवशी आपल्या देशाचा तो पराभव असेल, आपल्या पर्यावरणीय शिक्षणाचा तो पराभव असेल असे मला वाटते.

### वनक्षेत्र वाढवण्याची गरज

मराठवाड्यात पाच टक्क्यांपेक्षा कमी वनक्षेत्र आहे. त्याचा परिणाम म्हणून तिथे दर पाच वर्षात तीन वर्षे दुष्काळ असतो. सांगलीसारख्या जिल्ह्यात २८ कोटी रुपये खर्च करून, आपल्याला कृत्रिम पावसाचा प्रयोग करावा लागतो. आपला अनुभव काय सांगतो? जिथे अधिक वन आहे तिथे जास्त पाऊस आहे. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात भौगोलिक क्षेत्राच्या ७८ टक्के जंगल आहे. तिथे सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडतो. जेव्हा आपण एखाद्या डॉक्टरकडे जातो तेव्हा ते काय सांगतात? हवापालट करा.. म्हणजे काय हो? तर निसर्गाच्या सान्निध्यात जा.. जिथे शुद्ध प्राणवायू आहे, हवा उत्तम आहे तिथे जा.

आज मातीची धूप मोठ्या प्रमाणात होत आहे. १८ लाख खर्च करून मातीची धूप थांबवण्याचे जेवढे काम होते तेवढे काम एक वटवृक्ष करतो हे आपल्याला माहिति आहे का? ही धूप थांबवायची असेल, चांगला पाऊस हवा असेल तर आपल्याला आपले वनक्षेत्र वाढवावे लागेल. त्यासाठी हे काम राज्यातील ११ कोटी ९७ लाख लोकांचे झाले पाहिजे. मागच्या पिढीने आपला विचार केला म्हणून वन टिकले.





आपण पुढच्या पिढीला कशी पृथ्वी सोपवणार आहोत? 'धन इस जीवन मे काम आयेगा लेकिन वन अगले दस पिढीओं को जीवन देगा.' आज ४० ते ४५ डिग्री सेल्सिअसची उष्णता आपल्याला सहन होत नाही. काही वर्षांनंतर पाठीवर एसी लावून फिरण्याची वेळ येईल. असे जीवन आपल्याला हवे आहे का? वेळीच वृक्षाचे महत्त्व ओळखा हे सांगणारे हे मिशन आहे.

## वृक्षलागवडीच्या कामात पारदर्शकता

वृक्षलागवडीसंदर्भात अनेक लोकांच्या मनात शंकाकुशंका आणि प्रश्न आहेत. मागच्या वर्षी जिथे झाडे लावली तिथेच या वर्षी झाडे लावा असे म्हणून टीका करणारे खूप आहेत. या सगळ्या गोष्टी विचारात घेऊन वृक्षलागवडीच्या कामात मी पारदर्शकता आणली आहे. या मोहिमेत लावल्या जाणाऱ्या झाडाची अक्षांश-रेखांशासह, त्याच्या प्रजातीसह वन विभागाच्या संकेतस्थळावर नोंद होणार आहे. गुगल मॅपिंगचा आपण उपयोग करत आहोत. अतिशय शास्त्रोक्त पद्धतीने आपण हे काम करत आहोत. ४ कोटीमध्ये २.२५ कोटी वृक्ष एकटा वन विभाग लावणार आहे. ७५ लाख इतर विभाग तर १ कोटी वृक्ष ग्रामपंचायतींकडून लावले जाणार आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमीतून वन विभागाने लावलेली झाडे जगवणार आहोत. १ हजार झाडांमागे एका कुटुंबाला रोजगार देत आहोत. इतर जे विभाग, संस्था झाडे लावतील ती झाडे जगवण्याची जबाबदारी त्यांची आहे आणि त्यांनी ती घेतली पाहिजे असे मला वाटते. 'पेड काटनेवाले हाथोंसे पेड लगाने और बचानेवाले हाथों की संख्या दसगुणा बढानी है' हा या मिशनचा सार आहे. तरीही काही लोकांना शंका असतात. 'इतने पेड लगेंगे क्या, जिंदा रहेंगे क्या, बडे होंगे क्या?' मी त्यांना एका व्यक्तीचे उदाहरण सांगेन. एक व्यक्ती समुद्रकिनारी उभे राहून किनाऱ्यावर येणाऱ्या एकेका स्टार फिशला पुन्हा समुद्रात सोडत होता. त्याच्या शेजारून एक नकारात्मक मानसिकतेचा माणूस चालला होता. तो त्या माणसाला म्हणाला, 'ये क्या कर रहे हो हजारो स्टार फिश बाहर आये है किस किस को बचाओगे?' स्टार फिश समुद्रात सोडणारा माणूस त्याला म्हणाला, 'जितनो को मै बचा सकता हूँ उतनों को मै जरूर बचाऊंगा.. मुझे नकारात्मकता छू नही सकती तुम्ही पर्यावरणाचे रक्षण करा..' पर्यावरण तुम्हाला वाचवेल हा यातला साधा संदेश आहे.

## वृक्षधनुष्य

पहिल्यांदा २ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठरवले तेव्हा मनात शंका होती.. हे वृक्षधनुष्य आपण पेलू शकू की नाही. पण राज्यातील जनतेने ज्या प्रकारे एकत्र येऊन वृक्षलागवडीचा लोकोत्सव साजरा केला, त्यातून विश्वास मिळाला. मी त्याच दिवशी येत्या तीन वर्षात राज्यात ५० कोटी झाडे लावण्याचे निश्चित केले. आज विविध रोपवाटिकांमधून १६ लाख रोपे उपलब्ध आहेत. या वर्षी उद्दिष्ट कमी ठेवले कारण उत्तम वाढ झालेली दर्जेदार रोपे लागवडीसाठी हवी होती. तेवढी मिळतील. पण पुढच्या वर्षी १३ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट आहे. पुढच्या वर्षी या रोपवाटिकांमधील रोपे १८ महिन्यांपेक्षा मोठी असतील. आम्ही



२०१५ पासून रोपवाटिका तयार करण्याचे काम हाती घेतले. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला. नागपूर-जालना येथील रोपवाटिका इतक्या आधुनिक आहेत की जर समजा, आपल्याकडे एखाद्या झाडाचे बीज नसेल तर आम्ही फांदीपासून त्या रोपांची निर्मिती

केली आहे. काही झाडांच्या तर पानांपासून आम्ही रोपे तयार केली आहेत. एमआरईजीएस मधून यवतमाळसारख्या एका जिल्ह्याने १ कोटी ६ लाख झाडे तयार केली आहेत. राज्यात रोपवाटिकांची संख्या वाढते आहे. पुढच्या वर्षी आम्ही शेतकऱ्यांनाही रोपवाटिका तयार करण्यासाठी प्रोत्साहित करणार आहोत. तशी योजनाही आम्ही आणणार आहोत.

## अप्रतिम नियोजन

मी जेव्हा वृक्ष लागवडीच्या विभागवार बैठका घेतल्या तेव्हा हे महसूल विभागाचे अधिकारी आहेत की, वन विभागाचे असे वाटावे इतके सुंदर नियोजन आणि काम या अधिकाऱ्यांनी केले आहे. उस्मानाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल विभागाची जमीन वन विभागाला दिली आहे. असे फार कमी घडताना दिसते. काही उद्योजकांनी वन विभागाशी त्रिपक्षीय करार करून ७ वर्षांच्या करारावर वृक्षलागवडीसाठी जमीन घेतली आहे. अशी अनेक उदाहरणे आहेत जी खूप प्रेरणादायी आहेत. मला विश्वास आहे की, राज्यात ४ कोटी वृक्ष लागतील. कुठले टार्गेट पूर्ण करणे किंवा कोणता रेकॉर्ड मोडणे हा या मिशनचा उद्देश नाही. हे काम माझे स्वत:चे आणि समाजाच्या कल्याणाचे आहे ही भावना रुजवण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. सर्व सामाजिक, स्वयंसेवी, आध्यात्मिक संस्था, उद्योजक, व्यापारी, समाजातील प्रत्येक घटक यात जात-पात, धर्म, लिंग, रंग, ऊंची, वजन विसरून सहभागी होत आहेत. त्यांचे वृक्षलागवडीचे काम वन विभागाकडे नोंदवले जावे म्हणून 'my plant' नावाचे मोबाइल ॲप आम्ही तयार केले आहे. जे १ ते ७ जुलै या काळात ते सुरू होईल. हे ॲप डाऊनलोड करून त्यांना त्यांचे काम वन विभागाकडे नोंदवता येईल.

मी मुंबईच्या एका शाळेचे उदाहरण सांगतो. जागेअभावी मुख्याध्यापकांनी मागच्या वर्षी फक्त २८ झाडे लावली. त्यांना ते शिपायाच्या हाताने पाणी देऊ शकले असते. परंतु त्यांनी शाळेतल्या विद्यार्थ्यांना शाळा सुटल्यानंतर घरी जातांना वॉटर बॅगमध्ये राहिलेले पाणी या झाडांना टाकून जाण्याचा संस्कार दिला. यातून झाडे जगली. गोष्ट खूप छोटी पण आयुष्य घडवणारी आहे. आम्हाला शाळेत एक कविता होती. 'उचलले हे मीठ मूठभर, साम्राज्याचा खचला पाया' म्हणजे काय तर इंग्रजांच्या साम्राज्याचा सूर्य कधी अस्तास जाणार नाही वाटत असतांना मूठभर मिठाच्या सत्याग्रहाने या साम्राज्याला हलवण्याचे काम केले. सांगायचे हे की प्रत्येकाने एक वृक्ष लावून तो जगवला तरी आज आपल्याला भेडवसावणारी पर्यावरणाची समस्या दूर होऊ शकेल.



## महाराष्ट्र बनेल पायोनिअर राज्य

मला विश्वास आहे की, आपण सुरुवात २ कोटी वृक्षलागवडीपासून केली. पण ज्या पद्धतीचा प्रतिसाद मिळतो आहे ते पाहिल्यानंतर वाटते की, भविष्यात हे मिशन इतके मोठे होईल की महाराष्ट्र या क्षेत्रात देशातील 'पायोनिअर राज्य' म्हणून ओळखले जाईल. मी मागच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत वृक्षलागवड मोहिमेचे सादरीकरण केले. तेव्हा मी प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी आपापल्या जिल्ह्याचे वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा आराखडा तयार करावा असे आवाहन केले. लातूरमध्ये आज वनक्षेत्र १ टक्के आहे. तिथे आपल्याला ३२ टक्क्यांपर्यंत वनक्षेत्र वाढवायचे आहे. एकूणच मराठवाड्याचे वनक्षेत्र ५ टक्क्यांच्या आत आहे. ते जर ३३ टक्क्यांपर्यंत न्यायचे असेल तर केवळ वनजमीन त्यासाठी पुरेशी नाही. खाजगी, सार्वजनिक आणि पडीक जमिनीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होणे गरजेचे आहे. आम्ही संरक्षण- रेल्वे मंत्रालयाशी सामंजस्य करार केले. महाराष्ट्रात असणाऱ्या जमिनीवर वृक्षलागवड करण्यास त्यांनी परवानगी दिली आहे. मराठवाड्यात आपण सेवानिवृत्त सैनिकांची 'इको बटालियन' नियुक्त करत आहोत. ते या भागात वृक्ष लावून जगवण्याचे काम करणार आहेत.

## वृक्ष आणि उत्पन्नाची सांगड

लोकांना वन शाप न वाटता वरदान वाटावे हा आमचा प्रयत्न आहे. आपण वृक्ष आणि उत्पन्नाची सांगडदेखील घालत आहोत. मोहफुले, बांबूसारख्या वनोपजावरील वन विभागाचा वाहतूक परवाना रद्द केला आहे. एकट्या गडचिरोली जिल्ह्यात २२० कोटी रुपयांची मोहफुलांची उलाढाल होऊ शकते. त्यातून आदिवासी बांधव आणि शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकते. त्याचे पोषणमूल्य खूप मोठे आहे. कुठल्या भागात कोणत्या प्रजातींची रोपे लावायचे याचे मार्गदर्शन करणारी पुस्तिका सर्वांना वाटली आहे. रोपे कशी लावायची यासाठी वन विभागाचे कर्मचारी प्रशिक्षण देत आहेत. मी प्रत्येक ग्रामपंचायतींच्या सरपंचांना पत्र लिहिले आहे. 'रोप आपल्या दारी'सारखी संकल्पना २५ जून ते ७ जुलै काळात राबवत आहोत. '१९२६ हॅलो फॉरेस्ट'सारखी नावीन्यपूर्ण संकल्पना राबवली आहे. थोडक्यात काय तर प्रत्येक व्यक्ती पर्यावरणाचा सेनापती व्हावा, ही यामागची भावना आहे. 'डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन योजनेतून' आपण जंगलालगतच्या गावांचे जंगलावरचे अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहोत. मला सांगायला आनंद होतो की, पूर्वी बफर क्षेत्रातून आमची गावे वगळा अशी मागणी होत होती. आता आमची गावे बफर क्षेत्रात घ्या अशी मागणी होतेय. म्हणजेच लोकांचे वनांशी नाते जडतेय.. वाढतेय... हेच या मिशनचे यश आहे, असे मला वाटते.

**शब्दांकन: डॉ. सुरेखा म. मुळे**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

**हरित महाराष्ट्राच्या ध्येयनिष्ठ वाटचालीत लोकांचा सहभाग ही एक अमूल्य गोष्ट आहे. गेल्या वर्षी १ जुलैला एकाच दिवशी २ कोटी ८३ लाख झाडे लावून महाराष्ट्राने वृक्षलागवडीचा लोकोत्सव साजरा केला. तीन वर्षात ५० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट निश्चित करणाऱ्या वन विभागाने पुन्हा एकदा राज्यातील जनतेला येत्या १ जुलै ते ७ जुलै या काळात ४ कोटी वृक्षारोपणाच्या कामात सहभागी होण्याची साद घातली आहे. झाडे हा आपल्या जगण्याचा निरोगी श्वास आहे, उज्ज्वल भविष्याची आस आहे.**

# वृक्षलागवडीचा लोकोत्सव




**विकास खारगे**

सचिव, वन विभाग


वातावरणातील बदल, तापमानातील वाढ यासारख्या गोष्टी मोठ्या प्रमाणात होण्याचे कारण म्हणजे हवेतील प्रदूषण. वातावरणातील ग्रीन गॅस, कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते आहे. या सगळ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक उपाय आहेत. पण सगळ्यात नैसर्गिक आणि प्रभावी उपाय कुठला असेल तर तो वृक्षलागवड हा आहे. हवेतील कार्बनडायऑक्साईड वृक्ष शोषून घेतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे. वातावरणातील बदलामुळे आपण अनेक दुष्परिणाम पाहातो. यात दुष्काळ, पाणीटंचाई, पिकांवर होणारा परिणाम, गारपीट, अवेळी पाऊस, पूर यासारख्या बाबींचा समावेश आहे. हे टाळण्यासाठी वृक्ष लागवड केली तर त्यातून पर्यावरण रक्षणाबरोबर रोजगार निर्मिती होऊ शकते. म्हणून लोकांच्या सहभागातून वृक्षलागवडीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर काम करत आहोत. हरित महाराष्ट्राकडे घेऊन जाणारी ही एक ध्येयनिष्ठ वाटचाल आहे, असे मला वाटते.

## आत्मविश्वास दुणावला

छत्तीसगडमध्ये वृक्षाच्छादन ४१ टक्के तर ईशान्येकडील राज्यात ८० टक्क्यांपर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा कमी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि राष्ट्रीय वननीतीनुसार राज्याचे वनाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यासाठी अवनत वनक्षेत्राबरोबर वनेतर क्षेत्रावरही मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होणे गरजेचे आहे. राज्याचे वनाच्छादन जर ३३ टक्क्यांपर्यंत वाढवायचे असेल तर हे काम एकटा वन विभाग करू शकत नाही. त्यासाठी आपल्याला एक जनआंदोलन उभे करावे लागेल. लोकांना वातावरणीय बदलाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. त्यांच्या मनात झाडे लावण्याची सुप्त इच्छा आहे. त्यांना वनांचे महत्त्व पटले आहे. त्यामुळे काहीजण वैयक्तिक स्वरूपात तर काहीजण संस्थात्मक स्वरूपात वृक्ष लावून त्याच्या संगोपनाचे काम करताना दिसत आहेत. पण एका व्यापक जनआंदोलनासाठी एक सशक्त व्यासपीठ निर्माण करण्याची आवश्यकता होती, हे व्यासपीठ मागच्या वर्षी १ जुलै २०१६ रोजी उपलब्ध करून दिले. या, आपण सर्वजण मिळून वृक्ष लावू, आपला महाराष्ट्र हरित करू असे आवाहन मागच्या वर्षी राज्यातील जनतेला केले, त्याला जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लोकांनी वृक्षलागवडीचा लोकोत्सव साजरा केला. यातून शासनाला एक आत्मविश्वास मिळाला.

## ५० कोटी वृक्षलागवड

चांगल्या कामासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले तर लोक नक्की एकत्र येतात हे लक्षात आले. त्यातून वृक्ष लागवडीची चळवळ अशीच पुढे चालू ठेवली पाहिजे असे वाटल्याने शासनाने येत्या तीन वर्षात राज्यात लोकसहभागातून ५० कोटी वृक्षलागवडीचा संकल्प केला. तसा शासननिर्णय काढला. २०१७ मध्ये ४ कोटी, २०१८ मध्ये १३ कोटी आणि २०१९ मध्ये ३३ कोटी असे मिळून ५० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट नक्की केले. एवढेच नाही तर त्यावर अतिशय नियोजनबद्ध काम देखील सुरू केले आहे. यामध्ये शासनाच्या सर्व विभागांना सामावून घेतले. सहकारी-शैक्षणिक-आध्यात्मिक संस्थांना यात सहभागी होण्याचं आवाहन केले, स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग घेतला. समाजातील सर्व क्षेत्र आणि सर्व व्यक्ती आणि संघटनांनी या कामाला आपले मानून ते



नेटाने पुढे न्यावे यासाठी नियोजन केले. याचा उत्तम आराखडा आता तयार झाला असून त्यावर काम सुरू आहे.

### ७६ टक्के रोपे जगवण्यात यश

मागच्यावर्षी समाजातील प्रत्येक घटकाने जशी साथ दिली तशीच पावसानेही दिली. लोकांनी लावलेले वृक्ष जगतील यासाठी प्रामाणिकपणे काम केले. लावलेल्या रोपांपैकी ७६ टक्के रोपे जगवण्यात यशस्वी ठरलो आहोत. मागचे पहिले वर्ष होते. त्यामुळे वृक्षलागवडीचे उद्दिष्ट हे अंदाजे निश्चित करून दिले होते. म्हणजे प्रत्येक शाळेत पाच-दहा रोपे लावावीत, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य केंद्र यांनी इतकी रोपे लावावीत.. आता असे करून चालणार नाही. मागच्या वर्षीच्या कामाने आपल्याला काय शिकवले असे मला विचाराल तर मी म्हणेन, आपल्याकडे राज्यात वृक्षलागवडीसाठी किती जागा आहे हे आपल्या लक्षात आले. आता आपली 'लॅण्ड बँक' तयार आहे. प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आणि गावात वृक्षारोपण करण्यासाठी आता किती जागा आहे हे माहीत झाले आहे.

### शाळांचा सहभाग

मागच्या वर्षीच्या काही चांगल्या परंपरा या वर्षीही पुढे सुरू ठेवणार आहोत. यामध्ये समाजातील सर्व घटकांच्या प्रतिनिधींच्या भेटी असोत किंवा संस्थांशी करावयाचा संवाद असो.. वृक्षलागवडीमध्ये शाळांचा सहभाग खूप मोलाचा आहे. या वर्षी शालेय शिक्षण विभागाच्या राज्यभरातील अधिकाऱ्यांची मुंबईत बैठक घेतली. सर्व शिक्षणाधिकारी, प्रांताधिकारी, प्राथमिक-माध्यमिक शाळांच्या, महापालिकेच्या-नगरपालिकांच्या शिक्षणाधिकाऱ्याची वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली. शाळेतला प्रत्येक विद्यार्थी हा 'वृक्षदूत' होऊ शकतो. तो पर्यावरण रक्षणाचा संदेश घराघरात पोहोचवू शकतो म्हणून वृक्षलागवडीचा संस्कार शाळांमधून घराघरात जावा हा प्रयत्न आहे. धार्मिक संघटना, विकासक, स्वंयसेवी संस्था, सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींशी बोललो आहोत, क्षेत्रनिहाय बैठकांमधून सर्वांना वृक्षलागवडीच्या कामात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



मागच्या वर्षी वृक्षलागवडीच्या कामात माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला होता. तो यावर्षीही करणार आहोत. वृक्षारोपणाचे स्थळ आणि लावलेले झाड याची माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर पाहता येईल. त्याचे जिओ टॅगिंग केले आहे.


## वृक्ष प्रतिज्ञा

*भारत माझा देश आहे*
*वृक्ष माझे बांधव आहेत*
*त्या कोटी कोटी वृक्षांवर माझे प्रेम आहे*
*या सृष्टीतील विविध वृक्षांचा मला अभिमान आहे*
*या वृक्षांचा पाईक होण्याची पात्रता*
*माझ्या अंगी यावी म्हणून सन २०१७ ते सन २०१९ या*
*वर्षात दिनांक १ जुलै ते ७ जुलै या कालावधीत*
*मी माझ्या अंगणात, मोकळ्या जागेत, शाळेच्या आवारात,*
*रस्त्यांच्या कडेला, गायरानात, गावठाणात*
*वृक्षलागवड करीन आणि त्या प्रत्येक वृक्षाचे संरक्षण करीन*
*मी व माझे वृक्षप्रेमी बांधव यांच्या सहकार्याने*
*राज्यामध्ये ५० कोटी वृक्षलागवड कार्यक्रम यशस्वी करण्याची*
*प्रतिज्ञा करीत आहे. वृक्षांचे संगोपन व संवर्धन यातच माझे*
*हित सामावले आहे.*
*एकच लक्ष्य ५० कोटी वृक्ष*

**- महाराष्ट्र शासन, वन विभाग**

### विभागांना लागवडीचे उद्दिष्ट

जेव्हा तीन वर्षांचे ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित केले. तेव्हा प्रत्येक विभागाला त्यांचे पुढील तीन वर्षाचे वृक्षलागवडीचे उद्दिष्ट काय असणार आहे याची निश्चिती करून दिली आहे. हे करताना त्यांच्याकडील मनुष्यबळ, त्यांच्या वृक्ष लावण्याच्या क्षमता आणि जागेची उपलब्धता, त्यांची पोहोच, त्यांना असलेल्या संधी या सर्व गोष्टींचा विचार केला आहे. प्रत्येक शासकीय विभागाने या उद्दिष्टानुसार आतापासूनच कामाला सुरुवात केली



## शाळेत पहिले पाऊल झाड लावून

जुन महिना सुरू होताच शाळेच वेध लागल्याने विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या पालकांची लगबग वाढली आहे. नवीन वर्षाच्या पुस्तकांना, वह्यांना कव्हर लागत आहेत, गणवेशाची तयारी पूर्ण झाली आहे.. नवीन वॉटर बॅग, टिफिन बॉक्स देखील घेऊन झाला आहे.. दप्तराची बॅग स्वच्छ झालीय... त्याबरोबरच मनाशी एक निश्चय ही पक्का झाला आहे...

**काय आहे हा निश्चय?**

१ जुलै ते ७ जुलै या वनमहोत्सवाच्या काळात राज्यात लोकसहभागातून ४ कोटी वृक्ष लागवड होत असताना शाळेत जाणारी बच्चे कंपनी तरी मागे कशी राहणार? म्हणूनच त्यांनी ठरवलेय, नवीन शैक्षणिक वर्षात शाळेतले पहिले पाऊल.. झाड लावून टाकण्याचे... त्यांच्या या संकल्पाचे पालकांना खूप कौतुक आहे... अनेक जिल्ह्यातील शाळांमध्ये या कार्यक्रमाचे नियोजन पक्के



झाले आहे... त्यांच्या या संकल्पाला वन विभागाचे सहकार्य आहे... बच्चे कंपनीने लावलेल्या रोपांना त्यांचे नाव असलेला फ्लॅग लावल्याने ती झाडे या मुलांची ओळख बनणार आहेत. 'मी आणि माझे झाड' असे नाते तयार झाल्याने लावलेले झाड जसजसे वाढेल तसतसा विद्यार्थ्यांचा आनंदही वाढेल.

आहे. त्यांचे स्वतंत्र शासननिर्णय देखील निर्गमित झाले आहेत. क्षेत्रीय कार्यालयांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत.

वृक्षलागवडीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक शासकीय विभागांना त्यांनी केलेले काम संगणकावर अपलोड करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जेणेकरून कोणी कुठे आणि कोणत्या प्रजातीचे रोप लावले हे ऑनलाइन पाहू शकू. ही माहिती अपलोड करतांना अडचणी निर्माण झाल्या तर त्यांच्या मदतीसाठी वन विभागाच्या प्रत्येक जिल्हा कार्यालयात आय.टी सेल निर्माण केला आहे. केलेल्या कामाची सर्व माहिती ते या आय.टी सेलमध्ये नेऊन देऊ शकतात. तेथून ती संकेतस्थळावर अपलोड केली जाईल. मला खात्री आहे की प्रत्येक विभाग त्याला दिलेले उद्दिष्ट नक्की पूर्ण करेल. यामध्ये प्रत्येक विभागाचे मंत्रिमहोदय आणि सचिव उत्साहाने सहभागी होत आहेत. त्यांनी त्यांच्या अधीनस्थ कार्यालयांच्या बैठका घेऊन या कामाला गती दिली आहे.

### १६ कोटी रोपे उपलब्ध

वृक्षलागवड मोहिमेत सर्वात महत्त्वाची गोष्ट कुठली असेल तर ती म्हणजे रोपांची उपलब्धता. प्रत्येक तालुक्यात दोनपेक्षा अधिक रोपवाटिकांची निर्मिती केली आहे. या रोपांचा दर्जा चांगला राहावा म्हणून अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सहा विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी दर्जेदार रोपे निर्मितीचा कार्यक्रम होती घेतला आहे. यात विविध प्रजातींचे रोपे आहेत. स्थानिक जमीन, पाण्याची उपलब्धता, लोकांची मागणी आणि हवामान विचारात घेऊन ही रोपे तयार केली जात आहेत. कुठली रोपे कुठे लावायची याचे मार्गदर्शन करत आहोत. याची माहिती देणारी एक पुस्तिकाही तयार केली आहे. प्रत्येक रोपवाटिकेमध्ये किमान १० टक्के बांबूची रोपे उपलब्ध ठेवली पाहिजेत



अशा सूचना दिल्या आहेत. ही रोपे स्थानिक वातावरणात टिकणारी असावीत यासाठी आग्रही आहोत. आपले उद्दिष्ट ४ कोटी वृक्षलागवडीचे असले तरी आज आपल्याकडे १६ कोटीपेक्षा अधिक रोपे वेगवेगळ्या रोपवाटिकांमध्ये उपलब्ध आहेत.

### फळझाडे व उपयुक्त झाडांची लागवड

हरित महाराष्ट्रासाठी वृक्षलागवड झालीच पाहिजे हा एक भाग आहे. पण यामध्ये जास्तीत जास्त लोकांना सहभागी करून घेऊन वृक्षांचा त्यांच्या जीवनाशी संबंध जोडणे, त्यातून त्यांना आर्थिक लाभ मिळवून देणे हाही उद्देश आहे. त्यासाठी काही निर्णय घेतले आहेत. कृषी विभाग यासाठी मदतीला आला आहे. पडीक जमीन किंवा शेतीच्या बांधावर फळझाड लागवड केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. दुसरे म्हणजे बांबू आणि मोहफुलाला वन विभागाच्या वाहतूक परवान्यातून मुक्त केले आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लोक बांबू लावतील. बांबू बहुउपकारी प्रजाती आहे. यामुळे बांबूआधारित उद्योगाला चालना मिळेल. मोहफुलाला कल्पवृक्ष मानले जाते. कारण मोहफुलाच्या प्रत्येक घटकाचा काही ना काही उपयोग होतो. गडचिरोली जिल्ह्यात गोंडवाना हर्ब प्रकल्प सुरू केला आहे. मोहफुलाचे जाम, सरबत, चटणी असे पदार्थ तिथे तयार करतो आहोत. राज्यातील ११ वनवृत्तात अशा जनवन शॉपची निर्मिती केली आहे. याशिवाय

नर्सरीजमध्ये वाणिज्यिक प्रजाती निर्माण केल्या आहेत. जसे की, साग. शेतकऱ्यांना ज्या प्रजातीचे रोप पाहिजे ते लावून त्यांना उत्पन्न मिळवता येईल.

### मराठवाड्यात मोठी वृक्षलागवड

मराठवाड्याचे वनक्षेत्र हे ४.९० टक्के इतके आहे. त्यामुळे तिथे गारपीट, पाणीटंचाईसारखी परिस्थिती उद्‌भवते. दुष्काळ आणि कमी वनक्षेत्र यांचा थेट संबंध आहे. त्यामुळे मराठवाड्यावर विशेष लक्ष केंद्रित करत आहोत. औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत संरक्षण मंत्रालयाच्या मदतीने इको बटालियनची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. देशात सध्या ८ ठिकाणी अशी बटालियन कार्यरत आहेत. संरक्षण मंत्रालयातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची ही फौज असते. ते वृक्षारोपणासाठी खड्डे करणे, रोपे लावणे, जगवणे, नर्सरीज तयार करणे ही सगळी काम करतात. या माध्यमातून मराठवाड्यात १०० ते २०० हेक्टर जागेवर वृक्षारोपण करून जंगल निर्माण करू शकू. याच बैठकीत मराठवाड्यातील गायरान जमिनीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा निर्णय घेतला आहे. लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सिंचन विभागाच्या पडीक जमिनीवर वृक्ष लावण्याचा निर्णय घेतला आहे. लातूरमध्ये ज्या गावात भूकंप झाला आणि घरे पडून ढिगारे निर्माण झाले त्या जागा साफ करून आता वन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. त्या ठिकाणी वन विभागाने झाडे लावली आहेत. मराठवाड्यात 'नाम' संस्था खूप चांगले काम करत आहे. यासारख्या संस्थांना मोठ्या प्रमाणात रोपे उपलब्ध करून दिली आहेत. या वर्षीही देणार आहोत.

### रोपे आपल्या दारी

शासकीय विभागांना वन विभाग रोपे देईल. त्यासाठी त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या निधीतून ती घ्यायची आहेत. काही ठिकाणी कार्पोरेट सामाजिक दायित्व निधीतून रोपे विकत घेऊन ती लावण्यासाठी दिली जात आहेत. काही अडचण आली तर वन विभाग त्यांना रोपे देईल. नागरिकांना सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध करून देत आहोत. १ जुलै ते ७ जुलैच्या दरम्यान ही रोपे निम्म्या किंमतीत त्यांना मिळतील. यासाठी 'रोपे आपल्या दारी'सारखा कार्यक्रम शहरांमधून राबवत आहोत. अनेक ठिकाणी त्याचे उपकेंद्रेही सुरू करणार आहोत. २५ जूननंतर एक आठवड्यासाठी ही रोपे त्यांना त्यांच्या घराजवळच्या केंद्रात मिळू शकतील. ज्यांना या केंद्रावर येणे जमणार नाही, त्यांना त्यांच्या घरी रोपे पोहोचवण्याची व्यवस्थादेखील स्वयंसेवकाच्या माध्यमातून केली आहे. यासाठी त्यांनी त्यांच्या क्षेत्रातील उप वनसंरक्षकाला फोन करायचा आहे. यासाठी संपर्क आणि समन्वय अधिकाऱ्यांची नावे आणि त्यांचे संपर्क क्रमांक यांची माहिती देणारी पुस्तिका प्रकाशित केली आहे. जिथे रोपे लावायची आहेत तिथे ती ३० जूनपर्यंत पोहोचावीत यासाठी तालुका, गावनिहाय वाहतूक आराखडा तयार झाला आहे. ग्रामपंचायतींना मात्र रोपे मोफत देत आहोत.

### केंद्र सरकारशी करार

केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयाशी वृक्षलागवडीसंदर्भात सामंजस्य करार केला आहे. यात संरक्षण मंत्रालय, रेल्वे मंत्रालय, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालय या सर्वांचा समावेश आहे. रेल्वेने त्यांचे काही ब्लॉक्स वृक्षलागवडीसाठी उपलब्ध करून दिले आहेत. शिवाय रेल्वे ट्रॅकच्या दोन्ही बाजुला बरीच जागा उपलब्ध आहे, तिथेही वृक्षलागवड होऊ शकते. राष्ट्रीय महामार्गावर दुतर्फा झाडे लावण्यासाठी जागेच्या नामनिर्देशनाचे काम सुरू झाले आहे.

### हरितसेनेची फौज

आपले सैनिक जसे देशाच्या सीमेचे रक्षण करतात तसेच वातावरणीय बदलामुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी एक कोटी लोकांची हरितसेनेची फौज निर्माण करत आहोत. आतापर्यंत २९ लाखांहून अधिक लोकांनी यात स्वंयप्रेरणेने सहभाग नोंदवला आहे. यासाठी वन विभागाच्या संकेतस्थळावरून हरितसेनेत ऑनलाइन सहभागी होता येते. दिलेल्या नमुन्यात ऑनलाइन नोंदणी केली की, आपल्याला हरितसेनेचे सदस्य झाल्याचे प्रमाणपत्र मिळते. ही सेना वन विभागाच्या विविध कार्यक्रमात सहभागी होऊन हरित महाराष्ट्राच्या निर्मितीत योगदान देऊ शकते. हे स्वंयसेवक त्यांनी केलेल्या पर्यावरणपूरक कामाचे छायाचित्रेदेखील यात अपलोड करू शकतात.

'१९२६' सारखी हेल्पलाइनची नावीन्यपूर्ण योजना राबवत आहोत. 'हॅलो फॉरेस्ट' नावाने कार्यरत असलेली ही हेल्पलाइन वन, वन्यजीव आणि वनपर्यटन यासारख्या विषयांवर माहिती तर देतेच पण राज्याचे वनवैभव टिकून राहावे म्हणून सादही घालते. अशी हेल्पलाइन सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातले पहिले राज्य आहे. या क्रमांकाचा स्वीकार देशभरातील वन विकास आणि संरक्षणासाठी करण्यात येत असल्याने, महाराष्ट्रासाठी नक्कीच ही गौरवाची बाब आहे.



एकूणच हरित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी वन विभाग नियोजनबद्ध काम करत असून आता गरज आहे वन विभागाबरोबर सगळ्यांनी या कामात सहभागी होण्याची. वृक्षलागवड ही एक लोकचळवळ झाली पाहिजे. याची सुरुवात प्रतयेकाने १ जुलै ते ७ जुलै दरम्यान आपल्या घराच्या अंगणात एक झाड लावून करावी. गृहनिर्माण संस्थांनी सोसायटीच्या आवारात झाडे लावावीत. सार्वजनिक जागेवर जिथे वृक्ष लागवड होते तिथे या कार्यक्रमात

**जागतिक तापमानात होणारी वाढ, हवामानातील बदल याची तीव्रता कमी करण्यासाठी शासनाने जनतेच्या सहभागातून २०१७ ते २०१९ या तीन वर्षांच्या काळात ५० कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम निश्चित केला आहे.**

| वर्ष | वृक्षारोपणाचा कालावधी | वन विभाग | इतर विभाग | ग्रामपंचायती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २०१७ | १५ जून २०१७ ते ७ जुलै २०१७ | २.२५ कोटी | ७५ लाख | १ कोटी | ४ कोटी |
| २०१८ | १५ जून २०१८ ते ७ जुलै २०१८ | ७.५० कोटी | २.५० कोटी | ३ कोटी | १३ कोटी |
| २०१९ | १५ जून २०१९ ते ७ जुलै २०१९ | १८.७५ कोटी | ६.२५ कोटी | ८ कोटी | ३३ कोटी |
| | | २८.५० कोटी | ९.५० कोटी | १२ कोटी | ५० कोटी |

सहभागी व्हावे. इतरांनाही तशी प्रेरणा द्यावी. स्वत:पासून नातेवाईकांपर्यंत, मित्रांपासून कार्यालयातील

कर्मचाऱ्यांपर्यंत सगळ्यांनी एकत्र येऊन वृक्षारोपण करावे. लावलेली झाडे जगतील याचीदेखील काळजी घ्यावी. कारण झाडे ही आपल्या सर्वांची गरज आहे. आपल्या जगण्याचा तो निरोगी श्वास आहे. म्हणून लावलेली झाडे जगवणे आपले कर्तव्य आहे.

वन विभागाने लावलेली झाडे जसे वन विभाग जगवणार आहे. तसेच प्रत्येक संस्थेने, विभागाने आणि व्यक्तीने लावलेले झाड जगवण्याची जबाबदारी त्या त्या व्यक्ती आणि संस्थेची आहे. प्रत्येकाला जगण्यासाठी प्राणवायू लागतो आणि तो झाडांपासून मिळतो एवढे जरी प्रत्येकाने समजून घेतले तरी प्रत्येक व्यक्ती मग ती लहान असो की, मोठी ते नक्कीच मनापासून हे काम करील असा मला विश्वास वाटतो. हा माझ्या-तुमच्या संपन्न महाराष्ट्राचा-हरित महाराष्ट्राचा संकल्प आहे. या प्रवासात तुम्ही सर्वजण माझे आणि शासनाचे अमूल्य सोबती आहात.

जगण्याचा समृद्ध आनंद देणाऱ्या या प्रवासाच्या निमित्ताने माझे एवढेच सर्वांना आवाहन आहे. 'या, आपण सगळे मिळून झाडे लावू वृक्षलागवडीचा लोकोत्सव पुन्हा एकदा साजरा करताना हरित महाराष्ट्राचे स्वप्ने साकार करू.'




# झाडांची भिशी



पैशांची भिशी सामान्यपणे कशी चालते हे तुम्ही-आम्ही सगळ्यांनी ऐकले आहे. दरमहा चालणारा भिशीचा व्यवहार सर्वश्रुत आहे. पण झाडांचीही भिशी असू शकते, याची तुम्हाला कल्पना आहे का? अशी भिशी सोलापूर येथील वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या डॉक्टर यांनी चालवली आहे.

डॉ. सचिन पुराणिक व डॉ. यशवंत पेठकर हे स्वखर्चाने वृक्षारोपण करत होते. मनुष्यबळ वाढवणे व वृक्षप्रेमींना एकत्र आणणे त्यांना गरजेचे वाटले. यातूनच १८ जून २०१२ मध्ये १२ जणांचा भिशी ग्रुप 'झाडांची भिशी' या नावाने सुरू केला. आता या ग्रुपमधील सदस्यांची संख्या ४८ इतकी आहे. प्रत्येक महिन्याला रु.२००/- प्रमाणे एकूण रु.९६००/- जमा केले जातात. त्यातून दोन लकी ड्रॉ काढले जातात. ड्रॉ विजेत्यांनी सुचविलेल्या ठिकाणी ८ ते १० झाडे लावली जातात. झाडे लावण्यासाठी ५ ते ६ फूट उंचीची झाडे घेतली जातात. ठरलेल्या ठिकाणी ट्रीगार्डसह झाडे लावली जातात. श्रमदानातून ट्रीगार्ड लावले जातात. ड्रॉ विजेत्याकडून झाडांचे संरक्षण केले जाते. एखादे झाड जळाले तर तेथे नवीन झाड लावले जाते. ट्रीगार्ड निघाले तर दुरुस्ती केली जाते. आयत्या ट्रीगार्डसाठी रु.१५००/- ते रु.२०००/- लागतात म्हणून त्यासाठी अखंड जाळीचे शिट्स ४ फुटाला कापून बायडिंग वायर लावून त्याचे ट्रीगार्ड तयार करतो. ज्याची किंमत एका ट्रीगार्डला फक्त रु. २५०/- पडते. लावण्यात आलेल्या झाडांची महिन्यातून दोन वेळा तपासणी केली जाते. लागवडीस वर्ष पूर्ण झालेल्या झाडांचा वाढदिवस केक कापून साजरा केला जातो. आतापर्यंत परिसरात ३५० झाडे लावलेली आहेत. वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस अशा वेळी उस्फूर्तपणे भिशी सभासद झाडांची भिशी या उपक्रमास मदत करतात.

इंदापूर शहरात मुकुंद शहा यांनी १ लाख रोपांची नगर रोपवाटिका विकसित केली आहे . तिथून लोकांना रोपे मोफत दिली जातात. रोप देताना त्या लोकांकडून रोप जगवण्याचे हमीपत्र लिहून घेतले जाते. शिवाय दर सहा महिन्यांत एकदा दूरध्वनी करून रोपाची वाढ कशी होत आहे. झाड जिवंत आहे का? काय अडचणी आहेत? हे विचारले जाते.
१ लाख रोपे स्थानिक प्रजातीची आणि औषधी रोपे आहेत.

## लग्नात वाटली रोपे

शासनाने २०१६ मध्ये सर्व शासकीय यंत्रणा व अशासकीय संस्था यांच्यामार्फत २ कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम राबवला. २०१७-१८ व २०१९ या तीन वर्षामध्ये ५० कोटी वृक्षारोपण करण्याचे ठरवले आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी चालू असतानाच जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील संजय खंडू मेहेत्रे यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हावी याकरिता रोपे पुरवठ्याचा कार्यक्रम हाती घेतला. श्री.मेहेत्रे यांची फार वर्षापासून आपण समाजाला काहीतरी देणे लागतो अशी भावना होती. त्याअनुषंगाने काळाची गरज ओळखून त्यांनी वृक्षवाढीकरिता रोपे पुरवठा करण्याचे निश्चित केले.

श्री. मेहेत्रे यांना आपल्या निश्चयाची पूर्तता करण्याची संधी त्यांच्या सुकन्या कु.सोनल व सुपुत्र चि.अक्षय यांचे वेगवेगळ्या वेळी पार पडलेल्या विवाह सोहळ्याप्रसंगी प्राप्त झाली. त्यांची सुकन्या कु.सोनल



हिचा विवाह २०१६ मध्ये प्रणव गार्डन, नारायणगाव येथे तसेच सुपुत्र अक्षय याचा विवाह निलायम गार्डन, येथे मे २०१७ मध्ये पार पडला. या दोन्ही विवाहप्रसंगी वधुवरास आशीर्वाद देण्यास येणाऱ्या आप्तेष्ट, मित्र परिवार व हितचिंतक यांना अनुक्रमे ३००० कलमी आंब्याची रोपे व कलमी पेरूची ४००० रोपे वाटण्यात आली. अशाप्रकारे आत्तापर्यंत ७००० रोपे वाटपाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम त्यांनी राबवला आहे. याद्वारे समाजासमोर त्यांनी एक स्तुत्य पायंडा घालून दिला.

श्री. मेहेत्रे यांनी रोपे वाटप उपक्रमाच्या वेळी गुजरात येथील बाएफ संस्थेमार्फत तयार करण्यात आलेली रोपे तर आंध्र प्रदेश येथे शासनामार्फत स्थानिक शेतकऱ्यांमार्फत तयार करण्यात आलेली रोपे खरेदी करून विवाहस्थळी आणली. ही रोपे साधारण तीन वर्षाची व तीन फूट उंचीची होती. या यशस्वी उपक्रमानंतर पुढील कालावधीत श्री. मेहेत्रे यांनी साधारण १ लाख रोपे वाटप करण्याचे ध्येय ठेवले असून त्या अनुषंगाने ते प्रयत्न करीत आहेत.



# झाडे अशी लावा...

**१ ते ७ जुलै २०१७ या कालावधीत शासनाच्या ४ कोटी वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी व्हायचे आहे. रोपे लावताना गावची माती, तिथे पडणारा पाऊस आणि तिथले वातावरण या सगळ्याच गोष्टींचा विचार करून ती लावली तर ती रोपे जगण्याचे प्रमाण निश्चित वाढते. कोणता वृक्ष कोणत्या कारणासाठी उपयुक्त ठरू शकतो, याचा देखील अभ्यास महत्त्वाचा ठरतो.. जाणून घेऊ या अशा वृक्षलागवडीसंदर्भात...**

वृक्षलागवड करताना काही महत्त्वाच्या बाबी लक्षात घेऊन वृक्षारोपण केले तर ते अधिक उपयुक्त ठरते. त्याचा अधिक लाभ होतो. रोप लावताना खड्डे करून रोपे लावतो. पण रोपांसाठी खड्डे करणे हीदेखील अभ्यासपूर्ण गोष्ट आहे. रोपांसाठी शास्त्रोक्तपद्धतीने खड्डे करून रोप लावल्यास ते रोप रुजण्यास निश्चित मदत होते.

## असे लावावे रोप

१.५ फूट x १.५ फूट x १.५ फूट खड्डा करावा. त्या खड्ड्यातील सर्व माती आणि दगडगोटे बाजुला काढावेत. रोप खड्ड्यात ठेऊन तो शेणखत आणि सुपीक मातीचे समप्रमाण ठेऊन जमिनीच्या पातळीपर्यंत पूर्ण भरून घ्यावा. नंतर हलक्या हाताने माती दाबून लावलेल्या रोपाला पाणी घालावे.

रोपे सहसा प्लास्टिकच्या पिशवीत असतात. अतिशय काळजीपूर्वक प्लास्टिकची पिशवी बाजुला करून मातीसह रोप अशा प्रकारे धरावे की, ज्यामुळे रोपाची गळपट्टी बाजुच्या जमिनीच्या पातळीत येईल व संपूर्ण मूळ सरळ राहील. ते दुमडले जाणार नाही. शक्यतो रोपे सकाळी किंवा संध्याकाळी लावावीत. रोपे लावल्यानंतर त्याला नियमित खत, पाणी द्यावे. त्याची नियमित निंदणी व कोळपणी करावी. रोप चांगल्या पद्धतीने वाढण्यासाठी फांद्याची प्रमाणात छाटणी करावी.

| पर्जन्यमान | मातीची आवश्यक खोली | लावणीयोग्य झाडे |
|---|---|---|
| सुमारे २५० ते ५०० मि.मी. | ५० सें.मी किंवा अधिक | शिवण, शिरस, शिसू, खैर इ. |
| | २५ सें.मी ते ५० से.मी | शिवण, शिरस, शिसू, खैर, कडुनिंब, चंदन, ऑस्ट्रेलियन बाभूळ इ. |
| | २५ सें.मी हून कमी (निकृष्ट जमीन) | कडुनिंब, खैर, सागवान, घायपात, इ. |
| सुमारे १८०० मि.मी.पर्यंत | २५ सें.मी हून कमी (निकृष्ट जमीन) | सागवान, हळदू, सावर, बिजा, बांबू इ. |
| १८०० मिमीहून अधिक व समुद्रसपाटीपासून ८०० मी. उंचावरील प्रदेशात | २५ सें.मी हून कमी (निकृष्ट जमीन) | सुरू, कदंब, बांबू, सिल्वर ओक, सोनचाफा, सप्तपर्णी, निलगिरी |

## झाडे आणि त्यांचे उपयोग

**इमारतीच्या लाकडासाठी–** सागवान, बिजा, हळदू, शिवण, सिरस, किन्ही, ऐन (साजड), तिवस, कळस, खडसिंगी, रोहण, मोहीन, धामण, शिसम, बाभूळ, धावडा, केकड, महोगनी

**चाऱ्यासाठी–** बाभूळ, महारुख, पिंपळ, अरंग, चिंच, अंजन, सुबाभूळ, बोर, शेवगा, वड, खैर, बेल, चिंचवा, कडुनिंब, कचनार, उंबर, धामन, कुसूम, मुरुड शेंग, मोहीन, विलायती चिंच

**गवतप्रजाती–** शेडा, मोठा मारवेल, मारवेल, मुशी, डोंगरी, बेर, दिनानाथ, धामणा, गिनी, ऱ्होडस, हरळी, काळी कुसळी, फुली, पोकळ्या, फोराडी, पॅरा, घाण्या मारवेल

**फळांसाठी–** आंबा, चिंच, चिकू, नारळ, फणस, जांभूळ, कवठ, करवंद, सीताफळ, आवळा, तेंदू, बोर, काजू, खिरणी, विलायती चिंच पेरु, बैल, कुसुम, चारोळी, बेहडा, हिरडा

**इंधनासाठी–** बाभूळ, ऑस्ट्रेलियन बाभूळ, सुबाभूळ, गिलरीसिडीया, रान शेवरी, जंगली बदाम, महारूख, केशिया सेनेगल, कॅशिया सायमिया, अडुळसा, धावडा, विलायती चिंच, घाटबोर, प्रोसिफिसच्या प्रजाती, बोर, भिर्रा, बकान, विलायती मेहंदी, कुसूम, चिचवा, कखम, गराडी, शिसू, अंजन, हिवर, करंज, पार्किनसोनिया

**शेती अवजारे व शेतीकामासाठी–** बाभूळ, सागवान, शिवण, जांभूळ, बांबू, निलगिरी, आंबा, खैर, तिवस, किनी, सेमल, धावडा, धामण

पिंपळ, बेहडा, अर्जुन यांचा समावेश होतो.

| जमिनीच्या प्रकारानुसार लावावयाची झाडे | |
|---|---|
| **जमिनीचा प्रकार** | **लागवड योग्य प्रजाती** |
| करड्या व काळ्या रंगाची विविध पोताची जमीन | सिरस, कडुनिंब, अंजन, शिसू, सुबाभूळ, भेंडी, ऑस्ट्रेलियन बाभूळ, करंज, आंबा, निलगिरी, शेवगा इ. |
| ट्रॅप दगडापासून तयार झालेली मध्यम ते खोल | सागवान, बांबू, खैर, निलगिरी, सुबाभूळ, शिसू, सिरस, चिंच, बाभूळ, सीताफळ, आंबा इ. |
| चुनखडीयुक्त तपकिरी व काळ्या रंगाची जमीन | सिरस, चिंच, बाभूळ, सीताफळ, आंबा इ. |
| रेताळ जमीन | खैर, शिसू, सिरस, बकान, करंज, कडुनिंब, इ. |
| चिकन मातीची जमीन | हिवर, बाभूळ, महारूख, सिरस, जांभूळ, अर्जुन, करंज. इ. |
| क्षार व आम्लयुक्त जमीन | सिरस, करंज, अर्जुन, निलगिरी, ऑस्ट्रेलियन बाभूळ, इ. |
| तांबूस मातीची जमीन | ऑस्ट्रेलियन बाभूळ, मोहा, बिजा, सागवान, अंजन, सेमल, कांचन, शिवण, काजू, इ. |
| रुक्ष क्षेत्र (अॅरीड क्षेत्र) | बाभूळ, सिरस, कडुनिंब, शिसू, निलगिरी, सुरू, आवळा, बोर, कांचन इ. |

**प्रदूषण नियंत्रणासाठी–** वातावरणात प्राणवायूचे प्रमाण वाढवण्यासाठी– पिंपळ, अमलतास, सेमल, कदंब, गुलमोहर, बांबूसा वल्गॅरिस


**वातावरणातील प्रदूषित कण शोषून घेण्यासाठी–** उंबर, सीताफळ, जांभूळ, सप्तपर्णी, आवळा, चिंच, मोह, बेल, कडुनिंब, पुत्रंजीवा, तेंदू, आंबा, चारोळी, अमलतास, जारुळ, लेंडिया, अशोक, सेनल, पळस, गुग्गळ

**वातावरणात सुगंध पसरवून हवेतील प्रदूषण थांबवण्यासाठी–** बेल, अमलतास, लेमन ग्रास, बांबूसाट्रायोनिटीस, सफेद कचनार (अमोनियाचे प्रमाण कमी करण्यासाठी)

**सांडपाण्याच्या जागेत लावावयाची झाडे–** बोर, चिंच, जांभूळ, साजड, अर्जुन

**जैविक इंधनासाठी (बायोडिझेल) उपयुक्त झाडे–** मोहा, करंज, जेट्रोफा (रान एरंडी), कडुनिंब, सिमारुबा

**रस्त्याच्या दुतर्फा लावण्यासाठी झाडे–** यामध्ये छाया देणारे, जलद व प्रतिकूल परिस्थितीत वाढणारे तसेच वाहतुकीला अडथळा न येण्याइतके ऊंच वाढणारे वृक्ष. यामध्ये वड, शिसू, कडुनिंब, आंबा, कुसूम, निलगिरी, करंज, गुलमोहर, पेल्टोफोरम, बाभूळ, अमलतास, अंजन, जॅकरांडा, विलायती चिंच, बकान, जांभूळ, चिंच,



**शोभेसाठी लावावयाची झाडे–** यामध्ये गुलमोहर, पळस, कदंब, स्पॅथोडिया, कम्पॅन्यूलेटा, कांचन, अमलतास, कॅशीया प्रजाती, जॅकरांडा, नागचाफा, सोनचाफा, शंकासूर, पेल्टोफोरम, जारुळ, ग्लिरीसीडीया, सेमल, बॉटल ब्रश, रेन ट्री, बकान, केशिया प्रजाती, बाहुनिया प्रजाती, सिल्वर ओक, सुरू, थुजा, निलगिरी, अशोक, चंदन, महोगनी, जंगली बदाम, पुत्रंजीवा

**शेताच्या बांधावर लावावयाची झाडे–** यामध्ये वैरणासाठीच्या झाडात अंजन, कचनार, चिंच, बकान, बाभूळ, बीजा, बोर, वड, शिरस, शिसू, सुबाभूळ, पिंपळ या झाडांचा तर कुंपणासाठी लावावयाच्या झाडात एरंड, ग्लिरीसिडिया, चिल्लार, मेंदी, विलायती बाभूळ याचा समावेश होतो.

**पाट आणि विहिरीजवळ लावावयाची झाडे –** आंबा, बाभूळ, उंबर, रिठा, बेल, बांबू

**रस्ता–रेल्वेमार्ग, कालवे यांच्या दुतर्फा लावावयाची झाडे –** अशोक, आंबा, करंज, काशिद, कुसूम, चिंच, जांभूळ, निम, रेन ट्री, पिंपरी, बकूळ, मोहगणी, मोहा, वड, सिरस, शिसू, पेल्टोफोरम या झाडांबरोबरच सरळ ऊंच वाढणाऱ्या झाडांमध्ये अशोक, आकाशनीम, निलगिरी,सिल्व्हर ओक, सुरू या झाडांचा समावेश होतो.

**धार्मिक स्थळाजवळ लावावयाची झाडे–** अर्जून, आंबा, आवळा, उंबर, कदंब, कवठ, कांचन, कवठीचाफा, पारिजातक, बकूळ, बेल, रुद्राक्ष, वड, सोनचाफा, चंदन, चिंच, नारळ, पांढराचाफा.

आपले गाव, गावाचे वातावरण, तिथले पर्जन्यमान आपला उद्देश आणि आपली गरज ओळखून झाडे लावली तर त्याची उपयुक्तता आणखी वाढेल.

संदर्भ : वन विभाग



छाया: चंद्रकांत पाटील

# दुष्काळमुक्तीसाठी शाश्वत जलसंधारण

**माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित 'पाणी' या विषयावरील 'मी मुख्यमंत्री बोलतोय' कार्यक्रमाचे सह्याद्री, झी २४ तास, झी मराठी, साम टीव्हीवरून प्रसारण आणि आकाशवाणीच्या विविध वाहिन्यांवरून प्रक्षेपण करण्यात आले. पिण्यासाठी पाणी, शेतीसाठी पाणी आणि उद्योगासाठी पाणी या अनुषंगाने झालेल्या या कार्यक्रमासाठी राज्यातील १८ हजार जणांनी ई-मेल आणि एसएमएसद्वारे मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारले. चित्रीकरणावेळी सहभागी झालेल्या श्रोत्यांनी मुख्यमंत्र्यांना थेट प्रश्न विचारून पाण्यासारख्या महत्त्वाच्या विषयावर असलेली शासनाची धोरणे जाणून घेतली. शाश्वत जलसंधारण करणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेची गावागावांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करून, तसेच रखडलेले सिंचन प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करून संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली. या कार्यक्रमात झालेल्या चर्चेचा हा संपादित भाग.**

सुसंवाद



राज्य शासनाने अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी जलयुक्त शिवार योजना हाती घेतली आहे. शासन आणि लोकांच्या एकत्रित सहभागातून ही योजना प्रभावीपणे राबवली जात आहे. पिण्याच्या पाण्यासाठी या योजनेचा लाभ झाला असून, साधारण ११ हजार गावे टँकरमुक्त तथा दुष्काळमुक्त करण्यात यश आले आहे. लोकांनी या योजनेसाठी साधारण ५६० कोटी रुपयांचा जनसहभाग दिला.

शासनाने योजनेसाठी साधारण साडेपाच हजार कोटी रुपये खर्च केले. मोठ्या धरणांपेक्षा जलसंधारणाच्या छोट्या कामांना दिलेले हे प्राधान्य कमालीचे यशस्वी ठरले आहे. साडेपाच हजार कोटी रुपये खर्च करून साधारण साडेबारा लाख हेक्टर इतकी सिंचना क्षमता निर्माण केली आहे. मोठ्या पाटबंधाऱ्यांच्या माध्यमातून इतकी सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी साधारण ३० हजार कोटी रुपये खर्च झाला असता. त्यामुळे जलयुक्त शिवारच्या माध्यमातून शासनाच्या निधीची मोठ्या प्रमाणात बचत करण्याबरोबरच, लोकांना सिंचनासाठी आणि पिण्यासाठी शाश्वत जलसाठे निर्माण करण्यात शासन यशस्वी झाले आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन

आदर्शगाव हिवरेबाजारचे सरपंच पोपटराव पवार हे कार्यक्रमात श्रोत्यांमध्ये उपस्थित होते. पाटबंधाऱ्यांच्या मोठ्या कामांपेक्षा जलसंधारणाच्या छोट्या कामांना प्राधान्य दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, जलयुक्त शिवार योजनेसाठी साडेपाच हजार कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली. जलसंधारणाच्या छोट्या-छोट्या कामांसाठी देण्यात आलेले हे प्राधान्य फार महत्त्वाचे आहे. याशिवाय मुख्यमंत्र्यांनी जल आणि मृद संधारणासाठी स्वतंत्र खाते निर्माण केले. हाही फार महत्त्वाचा निर्णय असून याबद्दलही त्यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले.

वेगवेगळ्या संस्था, कॉर्पोरेटस् यांचा निधी गावांमध्ये प्रथमच पोहोचत आहे. सीएसआरच्या निधीसाठी करण्यात आलेले हे प्रभावी नियोजन असून त्या माध्यमातूनही गावांना मोठा निधी उपलब्ध होत आहे. जलयुक्त शिवारची कामे करताना ती फक्त नदी पात्रात (ड्रेनेज ट्रीटमेंट) न करता माथ्यापासून पायथ्यापर्यंत (एरिया ट्रीटमेंट) करणे गरजेचे आहे. शासनाने यावरही लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या सूचनेची दखल घेत जलसंधारणाची कामे करताना शासन निश्चितच एरिया ट्रीटमेंटवर भर देईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.




**जलयुक्त शिवार योजना राबवल्यामुळे आमच्या विहिरीत भरपूर पाणी आले आहे.जिथे २० पोती गहू निघायचा तिथे २८ पोती गहू निघाला. कपाशी १८ क्विंटलवरून २५ वर गेली. मात्र पाणी आले तसे त्याचा उपसाही वाढला आहे. शेतीसाठी पाण्याचा योग्य वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना गावपातळीवर मार्गदर्शन करण्यात येऊ शकेल काय?**

– दादाराव गावंडे, कोळेगाव, ता. भोकरदन, जि. जालना (ईमेलद्वारे)

**मुख्यमंत्री** – जलयुक्त शिवारची कामे पूर्ण झाल्याच्या ठिकाणी

जलपरिपूर्णता अहवाल (Exit Protocol) करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. सूक्ष्मसिंचन पद्धतीचा वापर आणि गावाने पाण्याच्या केलेल्या ताळेबंदाप्रमाणे पीकपद्धती निश्चित करणे या गोष्टी होणे गरजेच्या आहेत. जलयुक्त शिवारमधून जलस्वयंपूर्ण झालेल्या गावांमध्ये या दृष्टीने नियोजन करण्यात येईल.

**माझी चार एकर शेती असून पाण्याची सोय नाही, शेततळे मिळण्यासाठी काय योजना आहे ?**

**– सोलापूर जिल्ह्यातील सोयवाडी येथील एक ग्रामस्थ (व्हॉट्सअॅपद्वारे)**

**मुख्यमंत्री –** शासनाने 'मागेल त्याला शेततळे' ही योजना हाती घेतली आहे. यातून ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येत आहे. याशिवाय मनरेगाच्या माध्यमातून शेततळ्याचा लाभ देण्यात येतो. सध्या १ लाखापेक्षा अधिक शेततळी बनवण्याचे उद्दिष्ट असून ३७ हजार शेततळी बांधून पूर्ण झाली आहेत. यातून ९६ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. ९६ हजार टिसीएम इतका जलसाठा निर्माण झाला आहे. एखाद्या शेतकऱ्याने शेततळे मागितल्यास शासनाच्या जीएसडीए विभागाकडून जमिनीची पाहणी केली जाते. ती जमीन शेततळ्याच्या निर्मितीस योग्य असल्यास त्याला तातडीने मंजुरी दिली जाते. यासाठी शेतकऱ्यांनी 'आपले सरकार' वेबपोर्टलवर किंवा 'आपले सरकार' सेवा केंद्रात अर्ज करावा. या योजनेतून निश्चितच मागेल त्याला शेततळे दिले जाईल.

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचा महाराष्ट्राला कशा प्रकारे लाभ मिळत आहे ?**

**– डॉ. बाळू जैन, लोहारा, जि. जळगाव (श्रोते)**

**मुख्यमंत्री –** या योजनेंतर्गत राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाकडून साधारण २६ हजार कोटी रुपये मिळाले आहेत. याशिवाय नाबार्डच्या माध्यमातून सूक्ष्मसिंचनासाठी आपल्याला कमी व्याजदरावर कर्ज मिळणार आहे. त्याची योजना तयार करण्यात आली आहे. पुढील तीन वर्षात ड्रिपवरील क्षेत्र दुप्पट करण्याच्या दृष्टीने योजना आखण्यात आली आहे. याशिवाय ५ धरण क्षेत्रातील संपूर्ण ऊस कशा पद्धतीने ड्रिपवर आणता येईल, या दृष्टीनेही नियोजन करण्यात येत आहे.

**रेन वॉटर हार्वेस्टिंगबाबत चर्चा बरीच होते, पण कायद्याच्या कचाट्यामुळे ते होत नाही. त्याबाबत आपली काय योजना आहे ? शिरपूर पॅटर्न विदर्भात का वापरला जात नाही ?**

**– विजय गुंढार, भद्रावती, जिल्हा चंद्रपूर (व्हॉट्सअॅपद्वारे)**

**मुख्यमंत्री –** रेन वॉटर हार्वेस्टिंग आता जवळजवळ अनिवार्य करण्यात आले आहे. डिसीआरमध्ये नवीन परवानग्या देताना रेन वॉटर हार्वेस्टिंगशिवाय नकाशांना मान्यता देत नाही. यापुढील काळातही या नियमाची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, पण त्याबरोबरच यासंदर्भात जनजागृती करून पावसाचे जास्तीत जास्त पाणी अडवणे आणि ते जमिनीत मुरविण्यासंदर्भात ही व्यापक जनजागृती केली जाईल.

**विदर्भातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरू शकणाऱ्या गोसीखुर्द प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे ?**

**– सुभाष नानवटे, वाशिम (श्रोते)**

**मुख्यमंत्री –** गेली अनेक वर्षे रखडलेल्या व गैरव्यवहारांमुळे चर्चेत आलेल्या या प्रकल्पाची उर्वरित कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने गेल्या २ वर्षात नियोजन करण्यात आले आहे. गैरव्यवहारात अडकलेली आधीची सगळी कामे व सगळ्या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत. आता एनबीसीसीला काम देण्यात आले आहे. पुनर्वसन जवळपास पूर्णत्वाला नेले आहे. जुन्या पुनर्वसित गावातील प्रश्न सोडविण्यात आले आहेत. केंद्र शासनानेही या प्रकल्पास राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता दिली आहे. प्रकल्पातील कामे डिसेंबर २०१९ पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले असून ती प्राधान्याने पूर्ण केली जातील.

**बीड जिल्ह्यातील आगेवाडी येथे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत जानेवारी ते मे २०१६ या कालाधीमध्ये बऱ्यापैकी कामे करण्यात आली आहे. परंतु काही गावांमध्ये कामे अजून रखडलेली आहेत. याबाबत नेमके काय करणार आहात ?**

**– मच्छिंद्र अगाव, आगेवाडी, जिल्हा बीड (व्हॉट्सअॅपद्वारे)**

**बीड जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी जलयुक्त शिवार ही अतिशय सुंदर योजना राबवली तर नक्की फायदा होऊ शकतो. त्यातून गावे दुष्काळमुक्त झाल्याशिवाय राहणार नाही. राज्यात या योजनेबाबत नेमकी काय स्थिती आहे ?**

**– शरद वाघुलकर, टाकळगव्हान, जिल्हा बीड (व्हॉट्सअॅपद्वारे)**

**मुख्यमंत्री –** बीडसह मराठवाड्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे. एकट्या बीड जिल्ह्यात ५२७ गावांमध्ये जलसंधारणाची ९ हजार वेगवेगळी कामे करण्यात आली. त्यातून ३०६ गावे वॉटर न्युट्रल म्हणजे पाण्याने स्वयंपूर्ण झाली आहेत. जिल्ह्यातील उर्वरित गावांमध्येही ही योजना प्रभावीपणे राबवली जाईल.

**टँकरमुक्त महाराष्ट्र ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी कशा प्रकारे अंमलबजावणी केली जात आहे ?**

**– राजेंद्र चोरमुले (श्रोते)**

**मुख्यमंत्री –** सिंचनाबरोबर टँकरमुक्ती हेसुद्धा जलयुक्त शिवार अभियानाचे एक मुख्य उद्दिष्ट आहे. राज्यात ज्या ज्या ठिकाणी जलयुक्त शिवारची कामे झाली त्या त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात टँकरमुक्ती झाल्याचे दिसले. राज्यात मागच्या वर्षी मे महिन्यात जवळपास ६ हजार २०० टँकर सुरू होते. ही संख्या चालू वर्षी मे महिन्यामध्ये बाराशे टँकरपर्यंत खाली आली आहे. शासन आणि लोकांच्या एकत्रित सहभागातून राबवल्या गेलेल्या जलयुक्त शिवार अभियानाचे हे यश आहे. लातूरला मागच्या वेळी रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागला होता. पण नंतर तिथे लोकसहभागातून जलयुक्त शिवारची चांगली कामे झाली.

अनेक गावे टँकरमुक्त होऊ शकली आहेत. पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी भूजल सर्वेक्षण यंत्रणेकडून योजना तयार करण्यात आली असून, ४१ हजार स्रोतांच्या बळकटीकरणाचे काम सुरू आहे. जलसंपदा, जलसंधारण आणि पाणीपुरवठा विभागात समन्वय निर्माण करून महाराष्ट्र कायमचे टँकरमुक्त करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. पाण्याच्या स्रोतांच्या बळकटीकरणातून राज्यात आतापर्यंत १ हजार १९० गावे टँकरमुक्त झाली असून ५ हजार गावे टँकरमुक्तीच्या मार्गावर आहेत.

**महाराष्ट्रात आज अनेक सिंचन प्रकल्प वर्षानुवर्ष रखडलेले आहेत. ते जर वेळेत पूर्ण केले तर पाणीटंचाईत खूप फरक पडणार आहे. आपल्या सरकारकडून रखडलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यास काय उपाययोजना करण्यात येत आहेत ?**

**– संदीप चौधरी, जि. ठाणे (व्हॉट्सॲपद्वारे)**

**मुख्यमंत्री –** आधीच्या काळात राज्यातल्या सगळ्याच प्रकल्पांना थोडा – थोडा निधी देऊन सगळेच प्रकल्प अर्धवट करण्यात आले होते. आता त्यातील जे प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत त्यांना प्राधान्य देऊन, निधी देऊन त्यांची कामे पूर्ण करण्याचे धोरण स्वीकारले आहे. पंधरा-पंधरा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकल्पांची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली आहेत. मागील वर्षी १०० प्रकल्प पूर्ण करून घळभरणीपर्यंत आणले आहेत. यातून सुमारे १ लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता नव्याने निर्माण झाली आहे. याशिवाय १४० प्रकल्प येत्या २ वर्षात पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. वॉर रुमच्या माध्यमातून आपण स्वत: राज्यातील महत्त्वाच्या २३ प्रकल्पांच्या कामांचा वेळोवेळी आढावा घेत आहोत. पुढच्या दोन वर्षात साधारण ३२ ते ४० लाख हेक्टर इतकी अधिकची सिंचन क्षमता निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. २०१९ पर्यंत प्रकल्प मोठ्या प्रमाणात पूर्णत्वाला जातील.

जमीन अधिग्रहणाला चांगला दर देण्याचे तसेच प्रकल्पग्रस्तांचे चांगले पुनर्वसन करण्याचे धोरण स्वीकारले आहे. जमिनीसाठी पूर्वी हेक्टरी साधारण ५ लाख रुपये मोबदला देण्यात येत होता. आता तो साधारण २० लाख रुपयांपर्यंत देण्यात येत आहे. नवीन पूनर्वसन हे आदर्श झाले पाहिजे, पण त्याबरोबरच जुन्या पुनर्वसित गावांमध्ये सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी धोरण आखले आहे. जुन्या पूनर्वसनाला ५ टक्के निधी देण्याची तरतूद नव्याने करण्यात आली आहे.



**ऊस आणि पाणी याचे समीकरण नेहमीच चर्चेचा विषय राहिले आहे. ऊसासाठी सूक्ष्म सिंचन ही संकल्पना अर्थसंकल्पात मांडली. ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन कशाप्रकारे काम करत आहे.**

**– नामदेव राऊत (श्रोते)**

**मुख्यमंत्री –** राज्यातील सगळ्या साखर कारखान्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊसाचे पीक येत्या तीन वर्षात ड्रिपखाली आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. साखर कारखाना, शेतकरी आणि राज्य शासन यांच्या एकत्रित सहभागातून शेतकऱ्यांना ड्रिप मिळण्याच्या दृष्टीने व्याज सवलतीची योजना आणली आहे. यातील व्याजाचा मोठा वाटा हा साखर कारखाना आणि राज्य शासनामार्फत उचलला जाणार आहे. मिळणाऱ्या शाश्वत एफआरपीतून एक मॉडेल तयार करून शेतकऱ्याच्या संमतीने कर्जाचा भाग परत करता येईल अशी योजना आहे. सुक्ष्मसिंचनामुळे पाण्याची बचत होण्याबरोबरच जमिनीची उत्पादकताही वाढणार आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आता ड्रिपकडे वळावे.

**शहरी भागात नेहमीच रोजच्या रोज किंवा एक दिवसाआड नळाला पाणी येते. पण ग्रामीण भागात मात्र ५- ६ दिवसातून किंवा उन्हाळ्यात १५ दिवसांतून एकदा लोकांना पाणी पुरवले जाते. यावर आपण काय उपाययोजना करीत आहात?**

**– चैताली असोलकर, शेगांव , बुलडाणा (व्हॉट्सॲपद्वारे)**

**मुख्यमंत्री –** शासनाने ग्रामीण पाणी पुरवठ्यासाठी महत्त्वाकांक्षी अशी मुख्यमंत्री पेयजल योजना हाती घेतली आहे. याशिवाय जागतिक बँकेच्या सहयोगातून जलस्वराज्य प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्यात येत आहे. मुख्यमंत्री पेयजल योजनेसाठी २ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असून ९०० कोटी रुपयांच्या योजनांना मंजुरी दिली आहे.

ग्रामीण भागात पाणीपुरवठा योजना राबवताना आतापर्यंत आपण जलस्रोतांच्या बळकटीकरणावर लक्ष दिले नाही. त्यामुळे पाण्याचा स्रोत आटला की पुन्हा नवी योजना राबवली गेली. अशा पद्धतीने काही गावांसाठी चार-चार योजना तर काही गावात एकही योजना नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. आता यापुढील काळात असे न करता पाण्याचे सक्षम स्रोत निश्चित करून व त्या स्रोतांचे बळकटीकरण करूनच ग्रामीण भागात पाणीपुरवठा योजना राबवल्या जातील, जेणेकरून त्या स्रोतामधून गावांना निरंतर पाणी मिळत राहील.

सुसंवाद

**छोट्या धरणातील गाळ काढण्याचा आपण जो निर्णय घेतला तो फार महत्त्वाचा आहे. २५० हेक्टरपेक्षा मोठ्या धरणातील गाळ काढण्यासंदर्भात काही निर्णय घेणार आहात का?**

**– अमोस कुलकर्णी (ईमेलद्वारे)**

**मुख्यमंत्री –** २५० हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र असलेली किमान अर्धी धरणे येत्या ३ ते ४ वर्षात गाळमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. त्याच धर्तीवर सध्या मोठ्या ५ धरणातील गाळमिश्रित वाळू किंवा वाळूमिश्रित गाळ काढून तो तंत्रज्ञानाचा वापर करून वेगळा करण्याचे निश्चित केले आहे. यातून ही धरणे गाळमुक्त होण्याबरोबरच महसूल निर्मितीचे एक मोठे मॉडेलही तयार होऊ शकणार आहे.

**सोलापुरात पंधरा वर्षांपासून पाण्याची टंचाई आहे. तीन ते चार दिवसाआड पाणी येते. यासाठी काय उपाययोजना आपण करणार आहात?**

**– एक नागरीक (व्हॉट्सॲपद्वारे)**

**मुख्यमंत्री –** सोलापूर शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी २ योजना तयार करण्यात आल्या आहेत. अमृत योजनेंतर्गत ७२ कोटी रुपयांची योजना मंजूर करण्यात आली आहे. सध्या शहराला उजनी धरणातून पाणीपुरवठा केला जातो. हे पाणी उघड्या कॅनलमधून सोडावे लागते. शहराला अर्धा टिएमसी पाणी द्यायचे असल्यास कॅनलमध्ये साधारण १० टिएमसी पाणी सोडावे लागते. यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. हे रोखण्यासाठी आता एनटीपीसी समवेत सहयोगातून बंद पाईपलाइनने पाणीपुरवठा करण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. याद्वारे शहराला पाणीपुरवठा करून त्यानंतर निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते एनटीपीसीला विकले जाईल. यामुळे शहराला पाणी मिळण्याबरोबरच, सांडपाण्याचा प्रश्नही निकाली निघणार आहे आणि पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

**पिण्याच्या पाण्याचे स्रोत हे दिवसेंदिवस दूषित होत आहेत. उघड्यावरील हागणदारी हा एक महत्त्वाचा घटक याला कारणीभूत ठरत आहे. यासाठी शासन करीत असलेल्या प्रयत्नांविषयी सांगा? (इतर प्रश्न)**

**– शहाजी सोमवंशी (श्रोते)**

**मुख्यमंत्री –** पाण्याच्या प्रदूषणात उद्योगाचा वाटा हा १० टक्के तर शहरे-गावातील घाण, शौच, मैला आणि कचरा यांचा वाटा हा ९० टक्के इतका आहे. हे रोखण्यासाठी शासनाने स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरू केले आहे. यातून आतापर्यंत ११ जिल्हे, १५० तालुके, १६ हजार ५०० ग्रामपंचायती आणि सुमारे २८ हजार गावे हागणदारीमुक्त झाली आहेत. मागच्या एका वर्षात राज्यात २० लाख शौचालये बांधण्यात आली असून हा एक विक्रम आहे. शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शेती आणि उद्योगाला वापरण्यासाठी चालना देण्यात आली आहे. मार्च २०१८ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र राज्य हागणदारीमुक्त करण्यात येईल.

**खटाव आणि माण हे दोन्ही तालुके कायम दुष्काळग्रस्त असतात. आमच्या तालुक्यांमधील पाणी प्रश्न अतिशय गंभीर आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी आपण काय करणार आहात?**

**– सौरभ फडतरे, पेडगाव, ता. खटाव, जि. सातारा (व्हॉट्सॲपद्वारे)**

**मुख्यमंत्री –** जिहे कठापूर व उरमोडी या दोन प्रकल्पांचे काम पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकल्पांसाठी अनुक्रमे ३० कोटी व १०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. या माध्यमातून या दोन्ही तालुक्यात साधारण ५२ हजार हेक्टर इतकी सिंचनक्षमता निर्माण होणार आहे. पण या सर्वांपेक्षा या दोन्ही तालुक्यात जलयुक्त शिवारची कामे आदर्श पद्धतीने पूर्ण करण्यात येत आहेत. वॉटर कपचे कामही या भागात चांगले होत असून त्यातून दुष्काळी भागातील जलसंधारणाच्या कामाचे एक रोल मॉडेल पुढे आले आहे. या भागात लोकांच्या सहभागातून जलयुक्त शिवारला मोठी गती देण्यात आली असून त्या माध्यमातून तसेच अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करून हा भाग दुष्काळमुक्त करण्यात येईल.

**पेण तालुक्यात हेटवणेसारखे धरण असूनसुद्धा खारेपाट विभागातील ३० ते ३५ गावामध्ये पाणीटंचाई जाणवते. आमच्या विभागातील सर्व गावांना जाणवणारी पाणीटंचाईची समस्या सोडवता येईल का?**

**– समाधान पाटील, कोळवे पेण (ईमेलद्वारे)**

**मुख्यमंत्री –** या भागाला पाणी पुरवठ्यासाठी शाहपाडा प्रादेशिक योजना मंजूर करण्यात आली आहे. याची निविदासुद्धा प्रसिद्ध करण्यात आली असून लवकरच योजनेचे काम सुरू करून आणि ते निर्धारित वेळेत पूर्ण करून या भागातील पाणीटंचाई दूर केली जाईल.

**संकलन : इर्शाद बागवान**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# राजर्षी शाहू महाराजांचे जलधोरण

**जमिनीतील पाण्याची पातळी खालावत असल्याने पाण्यासाठी संघर्ष वाढत आहे. पण कोल्हापूर जिल्ह्यात यापेक्षा वेगळे चित्र आहे. माणसाची तहान भागवेल आणि शेती व उद्योगाला पुरेल एवढे पाणी आज येथे उपलब्ध आहे. याचे श्रेय जाते राजर्षी शाहू महाराजांच्या दूरदृष्टीला...**

शाहू महाराजांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे निर्णय सर्वस्पर्शी होते. मला वाटते की, शंभर वर्ष पुढच्या कोल्हापूरचे चित्र त्यांच्या डोळ्यांपुढे होते. म्हणूनच शिक्षण आणि पाणी याला महाराजांनी आपले जीवनकार्य मानले.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्वतंत्र पाटबंधारे खात्याची निर्मिती केली. खास अधिकाऱ्याची नेमणूक केली. या खात्यामार्फत प्रत्येक गावाची पाणीपाहणी करण्यात आली. नवीन विहिरी, जुन्या विहिरी, लहान-मोठे तलाव यांची तपशीलवार माहिती घेऊन त्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. नवीन योजना अमलात आणण्यात आल्या. नवीन विहिरी आणि तलावाच्या बांधकामास प्राधान्य देण्यात येऊ लागले. पावसाचा प्रत्येक थेंब थांबलाच पाहिजे, याकडे महाराजांनी कटाक्षाने लक्ष दिले. वारंवार पडणाऱ्या दुष्काळावर कायमची मात करण्याच्या विचाराने १९०२ साली आपल्या संस्थानात त्यांनी 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले.

## अचूक धोरण

महाराजांचे जलविषयक धोरण अतिशय अचूक होते. पाटबंधारे खाते निर्माण करून शंकर सिताराम गुप्ते यांची पाटबंधारे अधिकारी म्हणून त्यांनी नेमणूक केली. सन १९०६ साली संस्थानात ११७०० इतक्या विहिरी होत्या त्यांची संख्या १९२० पर्यंत १२८०० इतकी झाली. शेतकऱ्यांना जुन्या विहिरी दुरुस्त करण्यास आणि नवीन विहिरी खोदण्यासाठी संस्थानाकडून कर्जपुरवठा करण्यात येऊ लागला. शहापूर, रुकडी, शिरोळ या परिसरात तब्बल २० नवीन तलाव बांधण्यात आले. काही जुन्या तलावांची दुरुस्ती करण्यात आली.

महाराजांच्या दृष्टीने हे प्रयत्न तोकडे पडत होते. त्यामुळे शेतकऱ्यांना टंचाईला तोंड द्यावे लागत होते. कोल्हापूर जिल्ह्यातून पंचगंगा, वारणा, भोगावती यासारख्या मोठ्या नद्यांबरोबर काही छोट्या डझनभर नद्या वाहतात. या नद्यांचे समुद्राला मिळणारे पाणी महाराजांना अडवायचे होते. कुठेतरी प्रवाह थांबला पाहिजे, तो शेतीकडे वळला पाहिजे, यासाठी त्यांच्या डोक्यात मोठी योजना आकार घेत होती. त्यातूनच कोल्हापूर संस्थानात वाहणाऱ्या एखाद्या नदीवर मोठे धरण बांधावे, असे त्यांनी ठरविले. त्यानुसार आधीच आपल्या संस्थानचा पाटबंधाऱ्याच्या दृष्टीने सर्वेक्षण केले होते. राधानगरी तालुक्यात भोगावती नदीवर उभे असलेले राधानगरी धरण ही त्याचीच फलश्रुती आहे.


राधानगरी धरण, कोल्हापूर

## धरण बांधले

१९०९ साली महाराजांनी धरणाच्या बांधकामास सुरुवात केली. अनंत अडचणींवर मात करीत कधी आशेने प्रफुल्लित तर कधी निराशेच्या गर्तेत तरीही अंगी असणारी तळमळ, असामान्य जिद्द त्यामुळे हा प्रकल्प उभा राहत गेला. धरणाच्या दोन्ही बाजूची शेती आनंदाने डोलू लागली. बारमाही फुलू लागली आणि शाहू महाराजांचे हरित कोल्हापूरचे स्वप्न प्रत्यक्षात दिसू लागले. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतीचा खऱ्या अर्थाने कायापालट झाला. महाराजांच्या हयातीत दुर्दैवाने धरणाचे काम पूर्णत्वास जाऊ शकले नाही.

१९१६ सालापर्यंत १४ लाख रुपये खर्च करून ४० फुटांपर्यंत धरणाचे बांधकाम करण्यात आले. दरवर्षी ६०० दशलक्ष घनफूट पाणी शेतीसाठी उपलब्ध होऊ लागले. पुढे अनंत अडचणी येत राहिल्या आणि १९५५ साली धरणाचे काम पूर्ण झाले. हा प्रकल्प कोल्हापूर जिल्ह्याची जीवनवाहिनी ठरला. हे धरण आणि त्याखालील १३ कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे यामुळे तब्बल २६,८६० हेक्टर जमीन ओलिताखाली आली. या धरणाखाली भोगावती नदीवर ८३ आणि पंचगंगा नदीवर १४१ उपसा जलसिंचन योजना आहेत. ही आकडेवारी १९९५ पूर्वीची असून त्यात आज वाढ होण्याची शक्यता आहे. धरण दरवर्षी पूर्ण क्षमतेने भरते आणि लोकांचे जीवन समृद्ध करत या धरणातील पाणी पुढे वाहते. हे धरण म्हणजे छत्रपती शाहू महाराजांच्या कल्पकतेचे, द्रष्टेपणाचे आणि दूरदृष्टीचे स्मारक आहे.

**– संगीता राजापूरकर चौगुले**
उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

# 'जलयुक्त'ची किमया...

**महाराष्ट्राच्या निर्मितीपासून राज्यावर प्रत्येक दशकात दुष्काळाचे सावट राहिले आहे. गेल्या दोन्ही वर्षात जलयुक्त शिवार योजनेतून मोठ्या प्रमाणात कामे होत असून मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे हे अभियान जनतेचे झाले आहे. या दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी 'जलयुक्त शिवार' ही योजना प्रभावीरीत्या राबवण्यात येत आहे.**



छाया: प्रशांत गहाळे

प्रासंगिक

राज्यात २०१४ मध्ये शासन आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळावर कायमस्वरूपी उपाययोजना शोधण्याला प्राधान्य दिले. गेल्या ५० वर्षात सुरू असलेल्या लोकप्रिय घोषणांच्या राजकारणाला पायबंद घालत शेतकऱ्यांच्या नेमक्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याची फलश्रुती म्हणून जलयुक्त शिवार ही लोकचळवळ म्हणून पुढे येत आहे.

### थेट शिवारात धाव

या वर्षी गडचिरोलीपासून साताऱ्यापर्यंत एप्रिल व मे महिन्यात मुख्यमंत्र्यांनी जलयुक्त शिवार कामाची पाहणी केली. प्रत्येक जिल्ह्याच्या आढावा बैठकांना हजर राहण्यापूर्वी त्यांनी थेट शिवारामध्ये धाव घेणे पसंत केले. मुख्यमंत्र्यांनी खोलीकरणाच्या खड्ड्यांना भेट दिल्याबद्दल त्यावर टिकाटिप्पणीही झाली. त्याचे उत्तर जूनमध्ये याच खोलीकरणाच्या खड्ड्यात साठलेल्या पाण्याने मिळणार आहे. त्यांच्या या भेटीमुळे ४० फूट खोल विहिरीत पिण्याच्या पाण्यासाठी उतरणाऱ्या दुष्काळी भागातील भगिनींच्या मनामध्ये उभारी आली आहे.



### शेतकऱ्यांसोबत श्रमदान व न्याहरी

२५ मे रोजी लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात हलगरा येथे आयोजित श्रमदान कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी सहभाग घेतला. हलगरा गावातील गावकऱ्यांनी लोकसहभागातून जलयुक्त शिवारची कामे केली आहे. या लोकसहभागातून केलेल्या कामाची पाहणी त्यांनी केली. या भागातील नाल्याच्या खोलीकरणासाठी अडीच लाख टन गाळ उपसण्यात आला. ५ किलोमीटर लांब नाल्याचे खोलीकरण करण्यात आले. या खोलीकरणाच्या माध्यमातून २० हजार घनमीटर काम साकारण्यात आले. येत्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साठवल्या जाण्याची अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. या वेळी त्यांनी या सामूहिक कार्याच्या यज्ञात श्रमदानाचे काम केले. श्रमदानानंतर उपस्थित ग्रामस्थासोबत त्यांनी न्याहारी केली. तत्पूर्वी जलसंपदा विभागाच्या वतीने बांधण्यात आलेल्या औराद शहाजानी येथील कोल्हापुरी बंधाऱ्याच्या कामाची पाहणी केली. औराद शहाजानी येथील कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतर करणे सुरू आहे.

### @वर्धा

महिन्याच्या सुरुवातीस नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्यामध्ये ५ मे रोजी मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. वर्धा जिल्ह्यातील आर्वी पंचायत समितीच्या सभागृहात त्यांनी जलयुक्त शिवार योजनेचा आढावा घेतला. त्यांच्या या दौऱ्यामुळे वर्धा जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणेच्या कामाला गती आली असून, जलयुक्त शिवारसह प्रधानमंत्री घरकूल योजना, खरीप पीक कर्ज वाटप, लोअर वर्धा प्रकल्पाचे पुनर्वसन, वर्धा मेगा फूड पार्कचा आढावा, निम्नवर्धा प्रकल्पाच्या पुनर्वसनाचा प्रारंभ, राष्ट्रीय दूध विकास प्राधिकरणाच्या जिल्ह्यातील कार्याला गती मिळाली आहे. वर्धा जिल्ह्याने राबवलेल्या चारायुक्त शिवारापासून, लॅडबँक संकल्पनेबाबत त्यांनी आढावा घेतला. वर्धा जिल्ह्यातील वर्धा ड्रायपोर्ट, सेवाग्राम विकास आराखडा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासंदर्भात गती देण्याचे निर्देश वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांनी दिले.

### @यवतमाळ

अमरावती विभागातील यवतमाळ जिल्ह्याच्या विविध विकास कामांचा आढावा ६ मे रोजी मुख्यमंत्र्यांनी घेतला. आत्महत्याग्रस्त जिल्ह्याचे बिरुद झटकून यवतमाळ आता बळीराजा चेतना अभियानातून

उभे राहत आहे. या जिल्ह्यामध्ये सिंचनाच्या सोयी वाढाव्या म्हणून येथील बेंबळा सिंचन प्रकल्प आणि अन्य प्रकल्पांना मुख्यमंत्र्यांनी पाठपुरावा करणाऱ्या त्यांच्या वॉररूममध्ये स्थान दिले आहे. या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जलयुक्त शिवार योजनेंतर्गत विविध सिंचन उपाययोजना शासनाने मंजूर केल्या आहे. मागेल त्याला शेततळे ही योजना जिल्ह्यात सुरू करण्यात आली आहे. या संदर्भात काही अधिकाऱ्यांनी उल्लेखनीय कामही केले आहे. थेट शिवारात भेट देऊन मुख्यमंत्र्यांनी अशा अधिकाऱ्यांचे कौतुक केले. यवतमाळ जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबवली गेल्यामुळे २२५ गावांमध्ये ४ हजार ८७२ टिसीएम पाणीसाठा उपलब्ध झाला असून यातून ४ हजार १९३ हेक्टर शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. जलयुक्त शिवारच्या कामामुळे जिल्ह्यात भुईमुंगासह इतर दुबार पिके घेतल्यामुळे शेतकऱ्यांना ४५० कोटी रुपयांचा रब्बी मोसमात  फायदा झाला. या ठिकाणी मुख्यमंत्र्यांनी विविध योजनांचा आढावा घेतांना जिल्ह्यामध्ये समूह शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना पुढे येण्याचे आवाहन केले. तसेच वीज पंपांना जोडणी देताना अडचण येणार नाही याचीही हमी दिली.

### @गडचिरोली

महाराष्ट्राच्या टोकावरचा गडचिरोली जिल्हा गेल्या अनेक वर्षामध्ये दुर्लक्षित राहिला आहे. मात्र मुख्यमंत्री पदाची धुरा सांभाळल्यापासून मुख्यमंत्र्यांनी या जिल्ह्यातील दुर्गम भागातील नागरिकांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी कृषी, औद्योगिक, संरक्षण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले आहेत. १३ मे रोजी मुख्यमंत्र्यांनी गडचिरोली जिल्ह्यातील चार्मोशी तालुक्यातील बामनपेठ येथील मालगुजारी तलावाच्या पुर्नबांधणी व बळकटीकरणाचे भूमिपूजन केले. या जिल्ह्यातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीतून सिंचन क्षमतेत वाढ करण्याचे आवाहन त्यांनी या दौऱ्यात केले. गडचिरोली जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच लॉयड स्टिलसारख्या प्रतिष्ठित कंपनीच्या निर्मिती उद्योगाचा शुभारंभ त्यांनी केला.

### @धुळे

खानदेशातील धुळे जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानातील विविध कामांना भेटी देण्यासाठी त्यांनी जिल्ह्यातील सिंदखेडा तालुक्यातील साळवे या गावाला १७ मे रोजी भेट दिली. या ठिकाणी जलयुक्त शिवार योजनेतून साकारण्यात आलेल्या नाला खोलीकरण कामाची पाहणी केली. जिल्हा परिषदेच्या डिजिटल शाळा, फळबाग लागवड योजनेच्या कामाची पाहणी केली. जलयुक्त शिवारसोबतच जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा त्यांनी धुळे येथे घेतला.

### @बुलडाणा

यवतमाळमधील विकासकामांचा आढावा घेण्यापूर्वी त्यांनी बुलडाणा जिल्ह्यातील खारपाणपट्ट्यात येणाऱ्या जळगाव जामोद तालुक्यातील गाडेगाव, खांडवी, आसलगांव येथील शिवारात भेट देऊन शेततळ्याची व प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांची पाहणी केली. 'उन्नत शेती समृद्ध शेतकरी' या अभियानांतर्गत कृषिसमृद्धी प्रकल्पाच्या माध्यमातून खारपाण पट्ट्यातील मातीमध्ये बदल घडवून आणण्याचा ५ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प शासन राबवत आहे.

'नानाजी देशमुख कृषी समृद्धी प्रकल्प' या भागात राबवण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या भागातील नागरिकांनी शेततळ्याचा पर्याय स्वीकारावा असे आवाहन त्यांनी केले. जळगांव जामोद येथील कोल्हटकर महाविद्यालयाच्या प्रांगणात त्यांनी जिल्ह्याच्या विविध विकासकामांचा आढावा घेतला. जिगांव प्रकल्पाकडे आपण विशेष लक्ष



डॉल्बीमुक्त गणेशोत्सव राबवून जमा झालेल्या डॉल्बीसाठीच्या पैशातून पोलिसांनी उभारलेल्या सुखकर्ता बंधाऱ्याची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

## डॉल्बीमुक्तीतून पोलिसांनी साकारले 'सुखकर्ता'

सांगली जिल्ह्यातील पोलीस विभागाने पुढाकार घेऊन उभारलेल्या सुखकर्ता बंधाऱ्याचे काम मुख्यमंत्र्यांनी बघितले. पोलीस विभागाने डॉल्बी मुक्त गणेश उत्सव ही संकल्पना राबवली. जिल्ह्यातील ८६३ गणेश मंडळाकडून आलेल्या २७ लाख ८० हजार रकमेला जलयुक्त शिवार योजनेसाठी वापरले. या रक्कमेतून मलेवाडी येथे १३ लाख २४ हजार खर्च करून बंधारा बांधण्यात आला. त्याला सुखकर्ता हे नाव देण्यात आले असून १९ मे ला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण करण्यात आले. या सिमेंट बंधाऱ्याची लांबी ३० मीटर व उंची १.७५ मीटर असून पाणीसाठ्याची क्षमता ७.५० स.घ.मीटर आहे. या परिसरातील विंधन विहीर व कुपनलिकांच्या पाण्याच्या पातळीत वाढ होण्यासाठी या जलसाठ्याची मदत होणार आहे.



देणार असल्याचे सांगून आता हा प्रकल्प विदर्भातील अन्य प्रकल्पाप्रमाणे वॉररूमधील पाठपुराव्याचा महत्त्वाचा प्रकल्प, असेल असे त्यांनी या वेळी सांगितले.

### @पुणे

विदर्भ, खानदेशासोबतच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यामध्ये किरकसाल गावांमध्ये सुरू असणाऱ्या सामूहिक श्रमदानातून साकारण्यात येणाऱ्या जलयुक्त शिवार अभियानाच्या कामाची पाहणी त्यांनी १९ मे रोजी केली. जल नियोजनासोबतच पीक पद्धतीचे नियोजन आवश्यक असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. मुख्यमंत्र्यांनी या वेळी स्वत: श्रमदान करून जलयुक्त शिवार अभियानातील आपला प्रत्यक्ष सहभाग नोंदवला.

### @सांगली

सांगली जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामाची पाहणी करण्याकरीता मिरज तालुक्यातील आगट येथील लोकसहभागातून गाळ काढलेल्या तलावाची त्यांनी पाहणी केली. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जलव्यवस्थापन आजही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. सुमारे दीडशे वर्षापूर्वी मिरजेचे तत्कालीन शासक गंगाधरराव पटवर्धन यांनी मिरज शहराला आगट तलावातून पाणी पुरवठा करण्याची योजना उभारली होती. याच तलावातील गाळ काढण्याचे काम सध्या सुरू असून हा तलाव पूर्णक्षमतेने कार्यरत झाल्यास मोठा पाणीसाठा उपलब्ध होणार आहे. या कार्यक्रमानंतर त्यांनी मिरज येथे सांगली जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा घेतला.

### @सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात मालेगाव व डोंगरगाव येथील जलयुक्त शिवार योजनेची पाहणी त्यांनी केली. सांगोला तालुका हा दुष्काळी तालुका असून, या ठिकाणी जलसंधारणाच्या कामाला जनतेने लोकचळवळ केल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. या ठिकाणी जलयुक्त शिवारच्या माध्यमातून १२ लाख हेक्टर क्षेत्र संरक्षित सिंचनाखाली आले आहे. यावेळी प्रधानमंत्री आवास योजनेतून निर्माण करण्यात आलेल्या घरकुलाच्या कामाची पाहणी त्यांनी केली.

### @लातूर

गेल्यावर्षी भीषण दुष्काळाचा सामना करणाऱ्या लातूर जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी २ दिवस जिल्ह्याचा दौरा केला. यामध्ये २४ तारखेला त्यांनी जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा घेतला. या वेळी जिल्ह्यामधील दुष्काळी परिस्थिती दूर करण्यासाठी झटणाऱ्या अधिकाऱ्यांचा त्यांनी सत्कार केला. त्यांनी लातूर शहरातील पाणी पुरवठा यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर दिला. लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील सर्व शेतकऱ्यांची तूर खरेदी करण्याचे व २० जून पूर्वी जिल्ह्यातील सर्व कामे पूर्ण करण्याचे त्यांनी या वेळी निर्देश दिले.

**– प्रवीण टाके**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

## दृष्टिक्षेपात जलयुक्त शिवार

■ 'जलयुक्त शिवार'मधून १२.५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली, ११ हजार गावे टँकरमुक्त ■ अपूर्ण प्रकल्पांच्या पुर्ततेतून ९० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राइतकी सिंचन क्षमतेत नव्याने भर ■ ५० हजार शेतकऱ्यांना यातून सिंचनाचा लाभ ■ सुमारे ५० हजार शेतकऱ्यांना शेततळी तर सुमारे ६० हजार शेतकऱ्यांना सिंचन विहिरी मिळाल्या ■ शेततळी आणि सिंचन विहिरींच्या माध्यमातून १ लाख १० हजार कोरडवाहू शेतकरी झाले बागायत ■ जलयुक्त शिवार अभियानामुळे निर्मित झालेली संरक्षित सिंचन क्षमता – १२.५१ लाख हेक्टर ■ जलयुक्त शिवार अभियानामुळे निर्मित झालेली दोन संरक्षित सिंचन क्षमता – ६ लाख हेक्टर ■ राज्यात जवळपास ८२ टक्के क्षेत्र हे कोरडवाहू व ५२ टक्के क्षेत्र हे अवर्षणप्रवण ■ कोरडवाहू शेतीला शाश्वत सिंचन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाने सुरू केले जलयुक्त शिवार अभियान ■ दरवर्षी किमान ५ हजार गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट ■ आतापर्यंत ८ हजार ६०० पेक्षा जास्त गावातील कामे ८० टक्के पेक्षा जास्त पूर्ण ■ आतापर्यंत लोकसहभागातून ५६० कोटी रकमेचे काम ■ १८०९ किमी नाला खोलीकरण, रुंदीकरण ■ सुमारे ८४८ लक्ष घ. मी. गाळ काढला ■ या दोन वर्षात झालेला एकूण खर्च – ५,२२२ कोटी ■ सन २०१५-१६ मधील निर्मित पाणीसाठा क्षमता – ११.८२ लाख टीसीएम ■ मोठीधरणे, कॅनॉल, त्यासाठीचे भूसंपादन, पुनर्वसन करून इतकेच क्षेत्र सिंचनाखाली आणावयाचे झाल्यास त्यासाठी लागले असते साधारण ३० हजार कोटी रुपये ■ जलयुक्त शिवारच्या धोरणातून केली जवळपास २५ हजार कोटी रुपयांची बचत. शिवाय निर्माण केले तितकेच शाश्वत सिंचन.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी

**केंद्र व राज्य शासन यांच्यावतीने कृषी क्षेत्राच्या विकासासंदर्भात विविध योजना कार्यरत आहे. शेती उत्पादन वाढण्यासाठी, पिकांचे संरक्षण करण्यासाठी, पिकांवरील कीड नियंत्रण करण्यासाठी कार्यक्रम आणि प्रयोगशाळांची उभारणी, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत ऊस योजना यांचा यामध्ये समावेश आहे.**

## सघन कापूस विकास कार्यक्रम

कापसाचे उत्पादन वाढवण्यासाठी सुधारित मशागत पद्धती व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रतिहेक्टरी उत्पादन वाढवणे यासाठी सन २०१३-१४ पर्यंत कापूस तंत्रज्ञान अभियान - २ अंतर्गत केंद्र पुरस्कृत सघन कापूस विकास कार्यक्रम राबवण्यात येत होता. १२ व्या पंचवार्षिक योजनेत ही योजना बंद करण्यात आली. २०१४-१५ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके या अंतर्गत कापूस आधारित पीक पद्धतीस चालना देण्यात येत आहे. या अंतर्गत (देशी आणि अती लांब धाग्याचा कापूस / अती लांब धाग्याच्या कापसाचे बीजोत्पादन,



कापूस पिकात आंतरपिके - सोयाबीन, मूग, उडीद इत्यादी आणि देशी वाणाच्या कापसाची अतिघन लागवड पद्धतीच्या चाचण्या घेण्यात येतात.

**कार्यक्रमाची उद्दिष्टे :** ■१२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांची गरज भागवण्यासाठी कापूस पिकांतर्गत अन्नधान्य पिकांचा समावेश करण्यात आला आहे. ■ या अंतर्गत कापूस आधारित पीक पद्धतीस चालना देणे. ■ कापूस पिकात मूग, उडीद यासारख्या कडधान्याच्या तसेच सोयाबीन इ. आंतरपिकास प्रोत्साहन देणे. ■ कापूस पिकात एकात्मिक कीड व्यवस्थापन, कापसाच्या देशी वाणांची अतिघन लागवड, देशी / अधिक लांब धाग्याच्या कापसाच्या वाणांच्या बीजोत्पादनाची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादनास चालना देणे.

**समाविष्ट जिल्हे -** बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर

## पीक संरक्षण

विविध केंद्र /राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत पिकसंरक्षण औषधांचा ५० टक्के अनुदानावर कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषदेमार्फत औषधांचा पुरवठा केला जातो. विविध योजनांतर्गत एकात्मिक कीड रोग / व्यवस्थापन प्रात्यक्षिक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेमार्फत दाखविली जातात. कृषी उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नात पिकावर पडणाऱ्या किडी, रोग, तणे इत्यादिचे नियंत्रण करून होणारे संभाव्य नुकसान टाळणे महत्त्वाचे आहे. तसेच जर एखादी कीड / रोग विस्तृत प्रमाणावर आढळला तर त्याच्या नियंत्रणासाठी पीक संरक्षण मोहीम हाती घ्यावी लागते.

जैविक कीटकनाशकांचा वापरावर प्रामुख्याने भर देण्यात येत आहे. राज्यात सुमारे ३० जैविक कीटकनाशके उत्पादन प्रयोगशाळा खाजगी क्षेत्रात कार्यान्वित असून त्याच्या व्यतिरिक्त शासकीय ११ प्रयोगशाळा व कृषी विद्यापीठाच्या प्रयोगशाळा २००९-१० मध्ये सुमारे २० लाख हेक्टर क्षेत्रावर जैविक कीटकनाशकाचा वापर करण्याचे लक्ष निर्धारित केले आहे. राज्यात जैविक कीटकनाशके उपलब्धतेनुसार विविध केंद्र / राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी वापर वाढत आहे.

## कीडनाशक उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मालाची निर्यात करण्यासाठी कीडनाशक उर्वरित अंश तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे, मालाची साठवण योग्यप्रकारे करण्याकरिता तसेच पॅकिंग, ग्रेडिंग, वाहतूक इ.साठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी सुविधा निर्माण करणे, या बाबी

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाची मूल्यवृद्धी होण्यासाठी गरजेच्या आहेत. याकरिता पुणे व नागपूर येथे कीडनाशक उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या. परदेशात कीडनाशक उर्वरित अंश विरहित अथवा सहनशक्ती कमाल मर्यादेच्या आत असलेल्या शेतमालाला मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीमाल पाठवण्यापूर्वी कीडनाशक उर्वरित अंशाची तपासणी करून त्याची गुणवत्ता तपासल्यास शेतकरी व निर्यातदारांना त्याचा निश्चित फायदा होतो. ही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत म्हणून राबवण्यात येत आहे. प्रयोगशाळेत अद्ययावत उपकरणांमुळे एका नमुन्यात १७२ कीटकनाशकांची उर्वरित अंश तपासणी केली जात असल्याने, परदेशी बाजारपेठेत निर्यात करण्यात येणाऱ्या मालाच्या नाकारण्याच्या प्रमाणात घट झाली आहे.

## गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेचे बळकटीकरण

(बीज परीक्षण, खत नियंत्रण, कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा व कीडनाशक उर्वरित अंश चाचणी प्रयोगशाळा)

राज्याच्या कृषी विभागात बीज परीक्षण, खत नियंत्रण व कीटकनाशकांच्या एकूण १२ प्रयोगशाळा आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.



**बीज परीक्षण प्रयोगशाळा –** राज्यात पुणे, परभणी व नागपूर येथे या प्रयोगशाळा आहेत. प्रत्येक प्रयोगशाळेची १६,००० बियाण्यांचे नमुने तपासण्याची वार्षिक क्षमता आहे. या सर्व प्रयोगशाळांमध्ये गुणवत्ता निरीक्षकांनी घेतलेले व बीज प्रमाणिकरणासाठी उत्पादकांनी पाठवलेले खासगी नमुने तपासले जातात.

**कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा –** राज्यात पुणे, ठाणे, औरंगाबाद व अमरावती येथे कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा आहेत. त्यांची नमुने तपासण्याची वार्षिक क्षमता अनुक्रमे २२१०, ११३०, ११३० व ११३० आहे. अशाप्रकारे एकूण ५६०० नमुने तपासली जावू शकतात. या प्रयोगशाळेमधून गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी घेतलेल्या तसेच मोहिमेंतर्गत घेतलेल्या कीटकनाशकांचे नमुने तपासले जातात.

**(संदर्भ – कार्यक्रम अंदाजपत्रक २०१७-२०१८, कृषी पदुम)**

**संकलन : मंगेश कोळी**

## ऊस विकास योजना

ऊस हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे नगदी पीक आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून ग्रामीण भागाची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती झाली आहे. ऊसाच्या वाढीस लागणारे अनुकूल हवामान राज्यात आहे. महाराष्ट्र देशात साखर उत्पादन व साखर उताऱ्याबाबत आघाडीवर आहे. परंतु, सरासरी प्रतिहेक्टरी ऊस उत्पादन वाढविण्यासाठी प्रगत ऊस शेती तंत्रज्ञान जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे अगत्याचे आहे. राज्यात ऊसाखाली सरासरी ९.७८ लाख हेक्टर क्षेत्र असून सरासरी उत्पादकता ८७ मे.टन प्रती हेक्टर आहे. २०१६-१७ मध्ये ऊस पिकाचा उत्पादन खर्च कमी करून उत्पादकतेत ८९ मे.टनापर्यंत वाढ करण्याच्या दृष्टीने राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान – व्यापारी पिके कार्यक्रमांतर्गत ऊस विकास योजना कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या अंतर्गत एक डोळापद्धत, पट्टा पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. आंतरपिकाची प्रात्यक्षिके, उती संवर्धित रोपांची निर्मिती, मनुष्यबळ विकास हे घटक राबवण्यात येतात. उती संवर्धनामुळे ऊसाच्या सुधारित वाणांची निरोगी रोपे तयार करून ठिकठिकाणी त्यापासून बेणे मळे तयार करणे सुलभ होते.

**योजनेची उद्दिष्टे –** ■ ऊसाच्या उत्पादन खर्चात कपात करून उत्पादकता वाढवणे. ■ दर्जेदार बेण्याच्या वापरास प्रोत्साहन देणे व बेणे निर्मितीसाठी वसंतदादा साखर संस्थेमार्फत उती संवर्धनाद्वारे बीजोत्पादन व बियाणे वितरण कार्यक्रम राबवणे. ■ तंत्रज्ञान प्रसारासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे. ■ तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी क्षेत्रीय स्तरावर आंतरपिकांच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे.

**समाविष्ट जिल्हे –** औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली.



**समाजाच्या तळागाळातील विविध घटकांना न्याय मिळावा, त्यांच्या जीवनाचा स्तर उंचवावा, यासाठी सामाजिक न्याय विभागाचा मंत्री म्हणून अजूनही मोठा पल्ला गाठायचा आहे, याची जाणीव होत आहे. अनुसूचित जाती, जमाती व भटक्या विमुक्तांसाठी विविध योजनांमधून काही ना काही काम करण्यावर सातत्याने भर दिला आहे. शिष्यवृत्ती, वसतिगृह किंवा श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान या समस्यांवर तोडगा काढण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला असल्याचे सांगताहेत सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग मंत्री राजकुमार बडोले..**



**राजकुमार बडोले**
सामाजिक न्याय व
विशेष साहाय्य विभाग मंत्री

# सक्षमीकरणाची नवी दिशा

गेल्या अडीच तीन वर्षात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम वेळेत मिळावी, यासाठी प्राधान्याने लक्ष दिले आहे. तसेच मागासवर्गीय समाजातील जास्तीत जास्त तरुण उद्योजक व्हावेत, यावर लक्ष केंद्रित केले. राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा साडेचार लाखावरून ६ लाख करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे १ लाख ७९ हजार ३७७ विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासूनची ही मागणी पूर्ण करण्याचा आनंद मला वाटत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

मागासवर्गीय शासकीय विद्यार्थी वसतिगृहात अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. तसेच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमाचा कालावधी कमाल चार वर्ष किंवा यापेक्षा कमी असलेला प्रत्यक्ष कालावधीस मंजुरी देण्यात आली आहे. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांसाठीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना घोषित करण्यात आली आहे. या योजनेद्वारे देण्यात येणारे अनुदान अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट वितरित करण्यात येणार आहे. या योजनेसाठी विद्यार्थ्यांना १०वी / १२वी / पदवी / पदविका परीक्षेमध्ये ६०% पेक्षा जास्त गुण असणे अनिवार्य आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ही मर्यादा ५०% असेल. या योजनेंतर्गत राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर (इयत्ता ११ वी, पदवी, पदव्युत्तर पदवी) शिक्षण घेण्यासाठी शासकीय वसतिगृहात प्रवेशित नसणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक खर्चासाठी साठ हजार ते ४३ हजार रुपयापर्यंतचे अनुदान देण्यात येणार आहे.

## परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती



अनुसूचित जाती व नवबौद्ध जातीतील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना परदेशातील विविध विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळतो, मात्र आर्थिक अडचणींमुळे परदेशात उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात येते. जास्तीत जास्त तरुणांना याचा फायदा व्हावा, यासाठी या शिष्यवृत्तीच्या निकषामध्ये बदल करण्यात आला आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक तरुणांनी घ्यावा, असे आवाहन मी यानिमित्त करत आहे.

छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने शिष्यवृत्ती सुरू केली. अनुसुचित जातीतील ५० महिलांना एम.फिल व पीएच.डीसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने कनिष्ठ संशोधकासाठी २५ हजार तर वरिष्ठ संशोधकांसाठी २८ हजार रुपयांची फेलोशीप सुरू केली आहे. यामुळे या महिलांना उच्च शिक्षणासाठी मदत होत आहे. ५० विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने एम.फील व पीएच.डी.साठी फेलोशीप सुरू केली.

## सनदी सेवेचे प्रशिक्षण आणि कौशल्य विकास

अनुसूचित जाती, जमातीतील जास्तीत जास्त तरुणांनी सनदी सेवेत प्रवेश करावा, त्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, म्हणून औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या तयारीसाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील ५० तरुणांना मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. तसेच दिल्लीतही नामांकित प्रशिक्षण केंद्रात दरवर्षी ५० विद्यार्थ्यांचे मोफत प्रशिक्षण सुरू केले. यातून या वर्षी १४ विद्यार्थी हे भारतीय सनदी सेवेत दाखल झाले आहेत.

प्रासंगिक

या शिवाय बार्टीच्या वतीने तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षण मिळावे, म्हणून विशेष कार्यक्रम आखला आहे. यानुसार प्रत्येक जिल्ह्यात मागासवर्गातील तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. यासंबंधी विविध १५ संस्थांशी करार करण्यात आले आहेत.

## अपंग वित्त व विकास महामंडळास राष्ट्रीय पुरस्कार

दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने वेगवेगळ्या उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. दिव्यांगांच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळास, केंद्र शासनाच्या दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारामुळे दिव्यांग बांधवांसाठी आणखी चांगले काम करण्यास बळ मिळाले आहे.

गेल्या दोन वर्षात महामंडळाचे अध्यक्ष या पदावर काम करत असताना विदर्भातील १ हजार दिव्यांगांना कर्ज वाटप, राज्यस्तरीय साहित्य, कला व उद्योजकता संमेलनाचे नागपूरमध्ये आयोजन करण्यात आले. त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला. उद्योग क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या १३ दिव्यांग व्यक्तींना उद्योजकता पुरस्कार देण्यास प्रारंभ केला. दिव्यांगांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीची व्यवस्था महामंडळाच्या वतीने सुरू करण्यात आली. याशिवाय राष्ट्रीय अपंग वित्त व विकास महामंडळाकडून राज्याच्या महामंडळास २१ कोटी रुपयांचा निधी मिळवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या निधीतून दिव्यांगांना व्यवसायासाठी कर्जवाटप तसेच शंभर दिव्यांगांना मोटारसायकलींचे वाटप करण्यात आले. राज्यभर दिव्यांग स्वावलंबन अभियान राबवण्यात येत आहे. दिव्यांगांच्या खासगी १२३ विशेष निवासी व अनिवासी शाळा व कर्मशाळांना अनुदान तत्त्वावर मंजुरी देण्यात आली आहे.

२०१५-१६ हे वर्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष होते. हे वर्ष समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरा करण्यात आला. या वर्षभरात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन, त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब

## 'विश्वशांती परिषद'

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने महाकारुणिक तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्याचा प्रथमच निर्णय घेण्यात आला. त्यानिमित्त बौद्ध पौर्णिमेच्या दिवशी मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया या ठिकाणी विश्वशांती परिषद झाली.



महाकारुणिक तथागत भगवान बौद्ध यांचा जन्म वैशाख पौर्णिमेला झाला असून त्यांना ज्ञानप्राप्ती व त्यांचे महापरिनिर्वाण सुद्धा वैशाख पौर्णिमेलाच झाले. त्यामुळे वैशाख पौर्णिमेचे महत्त्व तथागत भगवान बुद्धाच्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनात अनन्यसाधारण आहे. त्याच दिवशी ही विश्वशांती परिषद म्हणून साजरी करणे याला वेगळे महत्त्व प्राप्त होते. या परिषदेत वैश्विक शांतता, विविध देशांतील संस्कृतीचे दर्शन, बौद्ध व आंबेडकरी तत्त्वज्ञानाच्या साराचे दर्शन विविध मान्यवरांनी आपल्या मौलिक विचारतून घडवले. सध्याच्या अस्वस्थतेच्या परिस्थितीत जगाला शांततेचा संदेश देणारे बौद्ध तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोचण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय गृह राज्यमंत्री किरण रिजीजू, शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे, सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, पशुसंवर्धन मंत्री महादेव जानकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, श्रीलंकाच्या राजदूत श्रीमती सरोजा सिरीसेना, थायलंडचे राजदूत एकापोल पोलपीपट आदी मान्यवर उपस्थित होते. श्रीलंका, म्यानमार, थायलंड, चीन इत्यादी देशांचे राजदूतही या वेळी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान बुद्धाच्या प्रज्ञा, शील आणि करुणा या धम्म सूत्रातील साराचे; स्वातंत्र्य, समता व बंधुता या बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध देशांतील संस्कृतींचे दर्शन घडले. बौद्ध तत्त्वज्ञानाचे, आंबेडकरी तत्त्वज्ञान व भारतीय घटनेचे स्वरूप या सर्वांचा संगम साकार झाला. तसेच भारतीय सांस्कृतिक संपन्नतेचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. या परिषदेपूर्वी मुंबईतील काळा घोडा परिसर ते गेट वे ऑफ इंडिया यामार्गावर विश्वशांती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

आंबेडकर समता प्रतिष्ठानची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. नोकरी करणाऱ्या महिलांसाठी मुंबई, नागपूर आणि पुणे येथे वसतिगृहे सुरू करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांसाठी ठिकठिकाणी वसतिगृहे उभारण्यात येत आहेत.

### घटनास्थळांचा विकास

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित असलेली घटनास्थळे व महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देऊन या स्थळांचा विकास करण्याचा निर्णय घेऊन; त्यासाठी निधी देण्यात आला आहे. निवडक अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा सर्वंकष विकासाची योजना तयार करण्यात आली आहे. पाली-त्रिपिटकचे मराठी भाषांतराचे काम सुरू झाले आहे.

### आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम सुरू

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारकासाठीची जागा आता राज्य शासनाच्या ताब्यात आली आहे. या स्मारकाची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली असून येत्या दोन वर्षात भव्य स्मारक उभे राहील. या बरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडन येथे शिकत असताना त्यांचे १० किंग हेन्री मार्गावरील राहते घर राज्य शासनाने विकत घेतले आहे. त्या घराचे स्मारकात रूपांतर करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

### ऐतिहासिक स्थळांचा विकास

तळेगाव दाभाडे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान ऐतिहासिक स्मारक म्हणून विकसित करण्यात येत आहे. साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे सांगली जिल्ह्यातील वाटेगाव आणि मुंबईतील घाटकोपरमधील चिरागनगर येथे स्मारक उभारण्याचा आणि क्रांतिवीर लहुजी साळवे यांचे पुण्यातील संगमवाडी येथे स्मारक उभारण्याचा प्रस्ताव आहे. आंबेडकरी चळवळीचे ऐतिहासिक केंद्र असलेले सिद्धार्थ विहार वसतिगृह पुन्हा उभारण्याचा मानस आहे.

### आंतरराष्ट्रीय विचार परिषद आणि संविधान दिन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्र, महिला सक्षमीकरण, मानववंशशास्त्र, राष्ट्रीय सुरक्षा, विदेशनीती, जलनीती, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात दिलेल्या योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी १४ व १५ एप्रिल, २०१६ रोजी मुंबई विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विचार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. २६ नोव्हेंबर,२०१५ हा दिवस संविधान दिवस म्हणून राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. सुमारे सव्वा लाख विद्यार्थ्यांनी या संविधान दिन कार्यक्रमात उपस्थिती लावली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर राज्यात प्रथमच असा कार्यक्रम झाला.

### प्रलंबित विषयांचा पाठपुरावा

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केंद्र शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम तातडीने मिळावी, यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री यांच्याबरोबर स्वतंत्र बैठका घेऊन त्याचा आढावा घेण्यात आला आहे. गेल्या काही वर्षापासून प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम लवकरच विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

अनुसूचित जातीतून धर्मांतरित झालेल्या बौद्ध समाजातील नागरिकांना केंद्र शासनाच्या नोकरी, शिक्षण व इतर योजनांच्या सवलती लाभ मिळावेत, यासाठी मी सातत्याने पाठपुरावा केला होता. गेल्या २६ वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री थावरचंद गेहलोत व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याशी यासंबंधी चर्चा करून हा प्रश्न सोडवण्याची विनंती केली. त्यांनी तत्काळ सुधारित जात प्रमाणपत्र काढण्याच्या सूचना मंत्रालयातील अधिकाऱ्यांना दिल्या. त्याचे फलित म्हणून केंद्र शासन लवकरच सुधारित जात प्रमाणपत्राचा नमुना काढणार आहे.

### संजय गांधी निराधार योजनेंतर्गत मिळणाऱ्या अनुदानात वाढ

विशेष साहाय्य योजनेंतर्गत संजय गांधी निराधार योजना अनुदानात ६०० रुपयावरून ७०० रुपये अशी वाढ करण्याचा निर्णय घेतल्याने संबंधितांना दिलासा मिळणार आहे. दिव्यांगांच्या कर्मशाळेत कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करणे, दिव्यांगांसाठी राखीव ३ टक्के निधी खर्च व्हावा यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर समितीची स्थापना करणे, राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या दिव्यांग खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देणे, नवीन शासकीय व

विभागीय स्तरावरील शासकीय वसतिगृहामध्ये ॲट्रोसिटी ॲक्ट अंतर्गत अन्यायग्रस्त मुलामुलींना राखीव जागा ठेवणे आदी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

### ज्येष्ठ नागरिकांसाठी कल्याणकारी धोरण

ज्येष्ठ नागरिकांकरिता कल्याणकारी धोरण तयार करण्यात आले असून या धोरणानुसार जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय समित्यांचे गठन करण्यात आले आहे. या धोरणामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी समुपदेशन केंद्र, विरंगुळा केंद्र, आरोग्य सुविधा केंद्र, तक्रार निवारण केंद्र, यांचा समावेश आहे. वृद्धाश्रमांना अद्ययावत करण्यात येत आहे. ज्येष्ठ नागरिकांना आत्मसन्मानाने जीवन जगता यावे यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोमर्यादा ६५ वर्षांवरून ६० वर्षे करण्याबाबतची कारवाई जलद गतीने सुरू आहे. ज्येष्ठ नागरिक धोरणाच्या मसुद्यावर तज्ज्ञ, नागरिक, या क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते यांच्या सूचना आल्यानंतर त्याचे अंतिम प्रारुप तयार होईल. या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी होईल, याकडे स्वतः लक्ष देणार आहे.

### व्यसनमुक्तीचा संकल्प

विभागाने राज्य व्यसनमुक्त करण्याचा संकल्प हाती घेतला असून विभागाच्या वतीने राज्यस्तरीय व्यसनमुक्ती साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले. व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्यरत समाजसेवक आणि संस्थांचा सन्मान करण्यात आला आहे. राज्यात व्यसनमुक्ती कार्य प्रभावी व्हावे यासाठी १२ स्वयंसेवी संस्थांना अनुदान देऊन व्यसनमुक्ती केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. भविष्यात व्यसनमुक्त झालेल्या व्यक्तींच्या यशस्वी जीवनाच्या यशोगाथेवर आधारित दूरदर्शन मालिका तयार करण्यात येत आहे.

### अंधश्रद्धा निर्मूलनासाठी विशेष प्रयत्न

राज्यात अंधश्रद्धेचे उच्चाटन व्हावे यासाठी जादुटोणा विरोधी विधेयक मंजूर करण्यात आले असून या विधेयकाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी याकरिता निर्देश देण्यात आले आहेत. या विधेयकाबाबत जनजागृती व्हावी म्हणून ठिकठिकाणी जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे.

**शब्दांकन: नंदकुमार वाघमारे**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

## सातारा टू वर्ल्ड ट्रेड सेंटर

यश कथा

सातारा शहरातील नीता भोसले यांना शासनामार्फत फायबरपासून मूर्त्या बनवण्यासाठीचे प्रशिक्षण मिळाले. त्याचबरोबर उद्योग उभारणीसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत १ लाख रुपयांचे कमी व्याजदराचे कर्जही मिळाले. यातून त्यांनी सातारा येथे छोटा कारखाना सुरू केला. त्यांनी तयार केलेल्या मुर्त्यांसाठी महामंडळाने पहिल्या वेळी मुंबई येथे प्रदर्शनासाठी स्टॉलची व्यवस्था करून दिली. येण्याजाण्याचा खर्च दिला. आता त्यांचा मूर्तीनिर्मिती आणि विक्रीमध्ये जम बसला आहे.



नीता भोसले

श्रीमती भोसले आता त्यांचा मूर्त्यांचा स्टॉल देशभरात होणाऱ्या प्रदर्शनांमध्ये लावतात. त्यांनी बनवलेल्या मूर्त्यांसोबतच ज्वेलरी, फुलदाण्यांनाही चांगली मागणी असते. शासनामार्फत स्टॉलचे भाडे आकारले जात नसल्याचे समाधानही त्या व्यक्त करतात. महामंडळाच्या सहकार्यामुळे बंगळूरू, चेन्नई, दिल्ली या महानगरांमध्ये जाऊन मूर्त्यांची विक्री करता येत असून महिन्याला साधारणतः २५ हजार रुपयांचा नफा होत असल्याचे त्या सांगतात. खादीभंडारला देखील त्या या वस्तू पुरवतात. त्यासोबतच वर्ल्ड ट्रेड सेंटरमधील इमारतीच्या पहिल्या माळ्यावरही त्यांनी आपला स्टॉल उभारला आहे. काही महिने निर्मिती आणि काही महिने विक्री असे त्यांनी कामाचे स्वरूप ठेवले आहे. दिवसेंदिवस मूर्ती व भेटवस्तूविक्रीचा व्यवसाय वाढत असल्याचे त्या सांगतात.

**– राजाराम देवकर**
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय


### वार्षिक वर्गणी

वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, **नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२** या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्च अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत. **पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२**



* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# शिका आणि समर्थ व्हा...

**सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती, जमाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती-जमाती या प्रवर्गातील शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात.**

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क

**योजनेचा उद्देश –** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन/उच्च शिक्षण घेता यावे, विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

**प्रवर्ग –** अनुसूचित जाती

**प्रमुख अटी –** नवबौद्ध विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न २ लाखपेक्षा जास्त, मात्र उच्च उत्पन्न मर्यादा नाही. विद्यार्थी शालांत परीक्षेत्तर व पुढील शिक्षण घेत असलेला असावा. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.

**लाभाचे स्वरूप –**

- शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे उत्पन्न विचारात न घेता सर्व मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर विहित केलेले शुल्क देण्यात येते.

**अर्ज करण्याची पद्धत –** या योजनेसाठी http//mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक

**संपर्क –** संबधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण आणि महाविद्यालयाचे प्राचार्य.



### सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

**योजनेचा उद्देश –** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा, सैन्यदलात भरती होण्याचे गुण विद्यार्थीदशेतच त्यांच्यात निर्माण व्हावे, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, शौर्य, सांघिक वृत्ती, नेतृत्व, देशभक्ती इत्यादी गुणांची जोपासना होण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

**प्रवर्ग –** अनुसूचित जाती

**प्रमुख अटी –** नवबौद्ध विद्यार्थी ५ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गात शिकत असलेला असावा. पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. २.०० लाख पेक्षा जास्त नसावे.

**लाभाचे स्वरूप –**

- नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शुल्क शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क आणि भोजन, निवास, कपडे, घोडेस्वारी इत्यादीवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते.
- इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रतिविद्यार्थी प्रतिवर्षी १५०००/- शिष्यवृत्ती देण्यात येते.

**अर्ज करण्याची पद्धत –** या योजनेसाठी http//mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक

**संपर्क –** संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण संबंधित सैनिक शाळेचे प्राचार्य

## उच्च शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्ती

### अनुसूचित जाती व नवबौद्ध १०० विद्यार्थ्यांना देशांतर्गत शिष्यवृत्ती

**योजनेचा उद्देश –** अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे कौशल्य व ज्ञान उपलब्ध व्हावे व त्यांची स्पर्धात्मक युगामध्ये जडणघडण व्हावी यासाठी देशातील उत्तमोत्तम शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश मिळालेल्या या घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

**प्रमुख अटी –** विद्यार्थी पालकांचे सर्व मार्गांनी वार्षिक उत्पन्न रु. ६ लाख पर्यंत असावे. या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेल्या संस्थेत संबंधित विद्यार्थ्याला प्रवेश मिळालेला असावा.



**लाभाचे स्वरूप –**

- संस्थेचे आकारणी केलेले शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क.
- क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य यांच्या खर्चासाठी प्रतिवर्षी रु. १०,०००/–

**अर्ज करण्याची पद्धत –** विहित नमुन्यातील अर्ज भरावा.

**संपर्क –** आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

## अनुसूचित जाती व नवबौद्धाच्या मुलामुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती



**योजनेचा उद्देश –** या घटकातील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापिठामध्ये प्रवेश घेता येत नाही. या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे अशा ५० (पीएच.डी.–२४ व पदव्युत्तर –२६) विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.

**प्रमुख अटी –** या घटकातील विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विद्यार्थ्याचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखापेक्षा जास्त नसावे. पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवीमध्ये किमान ५०% गुण व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी पदवीमध्ये किमान ५५% गुण मिळालेले असावे. प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण असावा. विद्यार्थ्यांने परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेला असावा. परदेशातील विद्यापीठ हे मान्यताप्राप्त विद्यापीठ असावे व ३०० च्या आत असावे.

**लाभाचे स्वरूप –**

- विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षण शुल्काची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो.
- विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका व इतर राष्ट्रासांठी १४००० अमेरिकेन डॉलर, तर इंग्लंडसाठी ९००० पौंड इतका अदा करण्यात येतो.
- विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी अमेरिका व इतर देशांसाठी १३७५ अमेरिकन डॉलर व इंग्लंडसाठी १००० पौंड इतके देण्यात येतात.
- पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे. विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम झाल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च तिकीट सादर केल्यानतंर मंजूर करण्यात येतो.

**अर्ज करण्याची पद्धत –** जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचा अर्ज आयुक्तालयास सादर करावा

**संपर्क –** आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

**योजनेचा उद्देश –** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन/उच्च शिक्षण घेता यावे यासाठी केंद्र शासनाच्या वतीने ही शिष्यवृत्ती दिली जाते.

**प्रवर्ग –** अनुसूचित जाती व नवबौद्ध

**प्रमुख अटी –** विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे. विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्यापुढील शिक्षण घेत असलेला असावा. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.

**लाभाचे स्वरूप –**

- विद्यार्थ्यास निर्वाह भत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबीवरील शुल्क प्रदान.
- अभ्यासक्रमाच्या वर्गवारीनुसार वसतिगृहात न राहणाऱ्यांना रु २३० ते ४५० या दराने निर्वाह भत्ता.
- वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दरमहा रु. ३८० ते १२०० निर्वाह भत्ता.

**अर्ज करण्याची पद्धत –** या योजनेसाठी http//mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक

**संपर्क –** संबधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती



**योजनेचा उद्देश –** अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे.

**प्रवर्ग –** अंध, अंशत: अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद, मानसिक आजार व कुष्ठरुग्ण मुक्त अपंग विद्यार्थी

**प्रमुख अटी –** इ.१० वी पुढील सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रम, पदविका प्रमाणपत्र, तांत्रिक, औद्योगिक व व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणारा अपंग विद्यार्थी असावा. मागील वर्षी परीक्षेत नापास झालेला नसावा. अपंगत्व ४० टक्के व त्यापेक्षा जास्त असावे, अपंगत्वाचा दाखला. वैद्यकीय मंडळाकडील असावा. उत्पन्नाची अट नाही.

**लाभाचे स्वरूप –** योजनेतील दर पुढीलप्रमाणे राहतील.

अ) शिष्यवृत्ती

| अभ्यासक्रमाचा गट | शिष्यवृत्तीची रक्कम | |
|---|---|---|
| | वसतिगृहात राहणारे | वसतिगृहात न राहणारे |
| गट अ (वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी शिक्षण, ॲग्रीकल्चर, व्हेटरनरीमधील पदवी व पदव्युत्तर शिक्षण) | दरमहा रुपये १२००/- | दरमहा रुपये ५५०/- |
| गट ब (अभियांत्रिकी, तांत्रिक स्थापत्य, वैद्यकशास्त्र, पदविका अभ्यासक्रम) | दरमहा रुपये ८२०/- | दरमहा रुपये ५३०/- |
| गट क (कला, विज्ञान, वाणिज्य मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच व्यवसायिक पदविका अभ्यासक्रम) | दरमहा रुपये ८२०/- | दरमहा रुपये ५३०/- |
| गट ड (द्वितीय वर्षे व त्यानंतर पदवीपर्यंतचा अभ्यासक्रम) | दरमहा रुपये ५७०/- | दरमहा रुपये ३००/- |
| गट इ (११ वी, १२ वी व पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम) | दरमहा रुपये ३८०/- | दरमहा रुपये २३०/- |

**वाचक भत्ता –** अभ्यासक्रमाचा गट मासिक रुपये
गट- अ, ब, क १००/-, गट- ड ७५/-, गट- इ ५०/-

**शैक्षणिक शुल्क –** मान्यता प्राप्त संस्थेचे / विद्यापीठच्या सक्तीच्या शैक्षणिक शुल्काची रक्कम.

**टंकलेखन खर्च –** रु. ६००/- (वार्षिक)

**अभ्यास दौरा खर्च –** रु. ५००/- (वार्षिक)

**अर्ज करण्याची पद्धत –** विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करणे.

**संपर्क –** जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सर्व जिल्हा परिषद व साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर

### भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

**योजनेचा उद्देश –** अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबधित सफाईगार, कातडी सोलणे,कातडी कमावणे या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना आणि कागद, काच, पत्रा वेचकांच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

**प्रवर्ग –** ही शिष्यवृत्ती सर्व जाती-धर्माला लागू आहे.

**प्रमुख अटी –** उत्पन्नची अट नाही. अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना ग्रामसेवक व सरपंच, नगरपालिका मुख्याधिकारी, महानगरपालिका आयुक्त/उपायुक्त/प्रभाग अधिकारी यांच्याकडून अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीमध्ये समावेश केलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी जातीचा दाखला आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप –**

- इयत्ता १ली ते २री च्या वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रु ११० /- व तदर्थ अनुदान रु. ७५० /-
- इयत्ता ३री ते १०वी च्या वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रु ११० /- व तदर्थ अनुदान रु. ७५०/-
- इयत्ता ३री ते १०वी च्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रु ७०० /- व तदर्थ अनुदान रु. १००० /-

**अर्ज करण्याची पद्धत –** या योजनेसाठी http// mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक

**संपर्क –** संबधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी आणि शाळेचे मुख्याध्यापक.

## माध्यमिक शिक्षण

### सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

**१) योजनेचा प्रवर्ग –** अनूसूचित जाती

**योजनेचा उद्देश –** इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने अनुक्रमे सन १९९६ व २००३ पासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे.

**प्रमुख अटी –** उत्पन्न व गुणांची अट नाही. अर्ज करण्याची आवश्यकता नाही

**लाभाचे स्वरूप –**

- इयत्ता ५ वी ते ७ वी दरमहा ६० रुपये (१० महिन्यासाठी ६०० )
- इयत्ता ८ वी ते १० वी दरमहा १०० रुपये (१० महिन्यासाठी १०००)

**अर्ज करण्याची पद्धत –** संबधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी मुलींची यादी तयार करून संबधित जिल्ह्याच्या जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे पाठवावी.

**संपर्क –** संबधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

**२) योजनेचा प्रवर्ग –** विमुक्त जाती व भटक्या जमाती/ विशेष

मागास प्रवर्ग

**योजनेचा उद्देश –** माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विजा, भज व विमाप्र प्रवर्गाच्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी राज्य शासनाने २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून ही योजना लागू केलेली आहे.

**प्रमुख अटी –** संबंधित घटकातील विद्यार्थिनीने शासनमान्य माध्यमिक शाळेत प्रवेश घेतलेला असावा व ती इ.८ वी ते १० वीपर्यंत वर्गात नियमित शिकत असावी. उत्पन्नाची अट नाही.

**लाभाचे स्वरूप –**

- इ.८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या या प्रवर्गातील विद्यार्थीनींना दरमहा रु.१०० /- या प्रमाणे १० महिन्यांसाठी रु. १०००/- एवढी शिष्यवृत्ती संबंधित शाळेमार्फत त्यांचे उत्पन्न व गुणांची अट लक्षात न घेता देण्यात येते.

**अर्ज करण्याची पद्धत –** या योजनेचे संगणकीकरण झालेले असून ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी https://mahaeschol. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन इ.८वी ते १० वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या या प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना या योजनेच्या पात्र विद्यार्थिनींचे अर्ज भरून संबंधित साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे सादर करावेत.

**संपर्क –** संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण. संबंधित शाळा.

## शिक्षण/परीक्षा/अन्य शुल्क प्रदान

**योजनेचा प्रवर्ग –** विमुक्त जाती व भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग.

**योजनेचा उद्देश –** या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, वाचनालय शुल्क, प्रयोगशाळा व क्रीडांगण शुल्क प्रदान करण्यात येते.



**प्रमुख अटी –** विद्यार्थी हा मान्यताप्राप्त शाळेत शिक्षण घेत असलेला असावा. विद्यार्थ्याचे वय व उत्पन्नाची अट नाही. एक वेळ नापास झालेल्या विद्यार्थ्याला देखील या योजनाचा लाभ देता येतो. त्याच वर्गात दोन वेळा नापास झालेल्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

**लाभाचे स्वरूप –**

- शासनमान्य खासगी अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळेमधील इयत्ता १ली ते १०वी मधील व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यांना शहरी/ग्रामीण क्षेत्रानुसार द.म. रु.१००/- ते २००/- या दराप्रमाणे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केली जाते.
- शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, वाचनालय आणि प्रयोगशाळा शुल्क दिली जाते. इतर कोणतीही शैक्षणिक सवलत / लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

**अर्ज करण्याची पद्धत –** संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयास सादर करावेत. बृहन्मुंबई बाबतीत साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, यांनी हे अर्ज सादर करावेत.

**संपर्क –** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर.

संबंधित शाळेचे मुख्याध्यापक.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती

**योजनेचा उद्देश –** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचा दर्जा सुधारावा व त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, तसेच सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये ते टिकून राहावेत यासाठी या विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या दृष्टीने ही योजना सुरू करण्यात आली आहे.

**प्रवर्ग –** अनुसूचित जाती

**प्रमुख अटी –** इयत्ता १० वी मध्ये ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या या घटकातील मुला-मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. ही शिष्यवृत्ती योजना इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयातील अनु. जातीच्या मुला-मुलींसांठी आहे.

**लाभाचे स्वरूप –**

- ११ वी रु. ३००/- दरमहा (१० महिन्यांसाठी रु.३०००/-)
- १२ वी रु. ३००/- दरमहा (१० महिन्यांसाठी रु.३०००/-)

**अर्ज करण्याची पद्धत –** या योजनेसाठी http//mahaeschool. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक

**संपर्क –** संबधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण आणि महाविद्यालयाचे प्राचार्य.

# मिशन कुपोषण निर्मूलन

**आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांनी नुकतीच जव्हार तालुक्यातील आरोग्य उपकेंद्राला भेट दिली. तेथील आरोग्यव्यवस्थेची पाहणी केली. आदिवासी नागरिकांशी चर्चा केली. मुलांच्या आरोग्याची आपुलकीने चौकशी करून त्यांना दिलासा दिला. या दौऱ्याचा आँखोदेखा हाल....**



'पुनरागमन आरोग्य तपासणी' शिबिराच्या शुभारंभाप्रसंगी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत.

गावात डॉक्टर येतो का?..अंगणवाडी ताई, आशा ताई रोज येतात का..मुलाला बरे नसले तर भगताकडे नेत नाहीस ना.. मूल बरे होण्यासाठी दवाखान्यात जा..जव्हार आणि मोखाड्यातील तालुक्यात काही पाड्यांवर काल असे संवाद कानी पडत होते. निमित्त होते आरोग्यमंत्री आणि कुपोषण निर्मूलन टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांच्या जव्हार तालुक्याच्या दौऱ्याचे.

जव्हारपासून १५ ते २० किलोमीटर अंतरावरील न्याहाळे बुद्रुक गावातील आरोग्य उपकेंद्राला आरोग्यमंत्री भेट देतात. या ठिकाणी सरपंच, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पाड्यावरच्या ग्रामस्थांकडून ते आरोग्यविषयक समस्या जाणून घेतात. सर्पदंशांची औषधे पुरेशी आहेत का? याची स्वत: खात्री करतात. पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या गावांसाठी काय व्यवस्था केली याची माहिती करून घेतल्यानंतर आरोग्यमंत्री पायीच पाड्यांवरील ग्रामस्थांच्या भेटीसाठी बाहेर पडतात.

गर्दीतील कुणीतरी समोरच्या घराकडे बोट करून 'साहेब, इथे 'मॅम' (मध्यम कुपोषित) चे बालक आहे', असे सांगत त्या बालकाची विचारपूस करण्यासाठी आरोग्यमंत्री त्या घराकडे वळतात. मध्यम कुपोषित गटात असलेल्या या बालकाच्या आईशी ते संवाद साधतात. खुर्ची आणा. असे कुणीतरी सांगत असतानाच आरोग्यमंत्री जमिनीवरच बसतात. तेवढ्यात घरातील एक महिला घाईघाईने चटई आणते. मात्र त्यावर न बसता आरोग्यमंत्री शेणाने सारवलेल्या ओसरीतच बसणे पसंत करतात. बाळाला काय झाले? त्याला वेळेवर औषधे देतेस का..? अंगणवाडी सेविकेला समोर बोलावून हिला ओळखतेस का..? बाळाचे वजन घ्यायला या येतात का..? असे प्रश्न विचारून आरोग्यमंत्री कुपोषण निर्मूलनाच्या उपाययोजना अगदी गावपाड्यापर्यंत प्रभावी राबवल्या जातात का याची खातरजमा करतात. घरातील सदस्यांशी संवाद साधून ते बालकाच्या आरोग्याची, आहाराची, स्वच्छतेची काळजी घ्यायला सांगायचे विसरत नाहीत. यंत्रणा आपल्या मदतीला आहेच परंतु आपणदेखील त्यांना सहकार्य केले पाहिजे. दिलेल्या सूचनांचे पालन केले पाहिजे, असेही ते आवर्जून सांगतात.

जव्हार, मोखाडा तालुक्यातील कौलाने आणि कुडाने शाकारलेली स्वच्छ बसकी घरे.. पावसाळ्याला तोंड देण्यासाठी सज्ज झाली आहेत. सारवलेलं अंगण..जनावरांचा राबता..असे चित्र बहुतांशी पाड्यांवर दिसते.

## आरोग्य तपासणी शिबिराचा शुभारंभ

कुपोषणाची समस्या सोडविण्यासाठी आरोग्य विभागाने महत्त्वाकांक्षी पावले उचलली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पालघर जिल्ह्यात, 'पुनरागमन आरोग्य तपासणी' शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. साधारणत: याभागातील आदिवासी बांधव ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात रोजगारासाठी शहरांमध्ये स्थलांतरीत होतात. माता-पित्यासोबत कुपोषित बालकेदेखील असतात. अशा बालकांना वेळेवर आहार, आरोग्य सुविधा मिळत नाही मग त्यांची प्रकृती अजूनच बिघडते. अशी स्थलांतरित झालेली आदिवासी कुटुंबे पुन्हा पावसाळ्याच्या तोंडावर आपल्या पाड्यावर जून महिन्यात येतात. आधीच मध्यम कुपोषित असलेल्या बालकांची प्रकृती स्थलांतरामुळे बिघडते. अशा स्थलांतरीत झालेल्या कुटुंबातील

बालकांची आरोग्य तपासणी करावी जेणेकरून त्यांच्यावर वेळीच उपचार करून, कुपोषणापासून त्यांचे रक्षण करता येईल या हेतूने आरोग्यमंत्र्यांनी 'पुनरागमन' शिबिराची संकल्पना प्रत्यक्षात आणली. जव्हार येथील पतंगशाह कुटीर रुग्णालयाच्या प्रांगणात पहिले पुनगरामन शिबिर झाले. या शिबिरात दिवसभरात जवळपास ६५० ते ७०० बालकांची तपासणी करण्यात आली.

रुग्णालयाच्या प्रत्येक विभागाची पाहणी आरोग्यमंत्र्यांनी यावेळी केली. बालकांसाठीचा अतिदक्षता विभाग, माता-बाल सुविधा केंद्रांतील रुग्णांच्या कुटुंबियांशी संवाद साधत विचारपूस केली. बाळाला घरी घेऊन जायची घाई करू नका..पूर्ण उपचार होऊ द्या.. असे सांगत त्यांनी डॉक्टरांनाही सूचना केल्या. यावेळी डॉ. सावंत यांनी आरोग्यासह, एकात्मिक बालविकास, आदिवासी, शिक्षण, पाणी पुरवठा, ग्रामविकास, जिल्हा परिषद, अन्न व नागरी पुरवठा आदी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची समन्वय बैठक घेतली. सर्वच विभागांच्या अधिकाऱ्यांनी समन्वयातून काम केल्यास कुपोषण निर्मूलनाचे उद्दिष्ट साध्य होईल असे सांगितले. पावसाळ्यात ज्या ४२ पाड्यांचा संपर्क तुटतो अशा ठिकाणी अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती यांच्या माध्यमातून औषधांचा पुरेसा साठा, धान्याचा साठा पुरविला पाहिजे. पावसाळ्याच्या तीन महिन्यात आदिवासी बांधवांना रोजगार नसतो त्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. भरारी पथकातील डॉक्टरांच्या भेटीचे वेळापत्रक तयार करण्याच्या सूचना त्यांनी या वेळी दिल्या.

## उपकेंद्र आणि पाड्यांना भेट

कुपोषण निर्मूलन उपाययोजनांच्या गावपातळीवरील अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी डॉ. सावंत यांनी दर आठवड्याला उपकेंद्र आणि पाड्यांना भेटी देण्याचे नियोजन केले आहे. कुपोषणासाठी संवेदनशील असलेल्या २६ पाड्यांना ते टप्प्याटप्प्याने भेटी देत आहेत. आरोग्यमंत्री स्वत: येतात हे पाहून पाड्यावरचे आदिवासी बांधव हरखून जातात.. मात्र गाड्यांच्या ताफांचा बडेजाव नाही.. सायरनचा आवाज



**आदिवासी पाड्यावर माता व बालक यांच्या आरोग्यासंबंधी विचारपूस करताना आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत.**

नाही. एवढेच काय, पाडा दिसताच लांब अंतरावरच वाहन थांबवून चालतच ते ग्रामस्थांच्या भेटीला जातात. आरोग्य यंत्रणेतील अधिकाऱ्यांचा फौजफाटादेखील फारसा नसतो.



त्या तालुक्याशी संबधित वैद्यकीय अधिकारी आणि उपकेंद्रांचे अधिकारी एवढीच मंडळीसोबत घेऊन आरोग्यमंत्री पाड्यापाड्यावर जात आहेत.. मंत्रिपदाचा बडेजाव न मिरवता पाड्यावरच्या घरात दिलेला बिनदुधाचा चहाही आवडीने पितात. मूल आजारी पडले तर भगताकडे घेऊन न जाता त्याला डॉक्टरकडे न्या..असे प्रत्येक पाड्यावर ते आवर्जून सांगतात.

## बालक-पालक योजनेंतर्गत कुपोषित बालक दत्तक घ्यावे

पालघर भागातील कुपोषित बालकांना विविध विभागांच्या योजनांचा लाभ मिळतोय की, नाही याच्या संनियंत्रणासाठी विविध विभागातील शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बालक-पालक योजनेंतर्गत एक कुपोषित बालक दत्तक घ्यावे, असे आवाहन डॉ. सावंत यांनी केले. या भागात जवळपास सहा हजार शिक्षक असल्याचे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यावर प्रत्येक शिक्षकांनी एक बालक दत्तक घेतले तरी अतितीव्र कुपोषित व मध्यम कुपोषित असलेल्या सुमारे ७००० बालकांपैकी सहा हजार बालकांना फायदा होईल, असे त्यांनी सांगितले.

## स्वच्छतादूत मुले

'पुनरागमन' शिबिराचे उद्घाटन करून आरोग्यमंत्री जव्हार जवळच्याच काळीधोंड गावात भेटीसाठी गेले. तेथे अन्न दिनानिमित्त लाभार्थ्यांना घरपोच धान्य पोहोचवण्याच्या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी कुपोषित बालकांच्या कुटुंबीयांना अंत्योदय योजनेंतर्गत धान्याचे वाटप करण्यात आले. गावात असलेल्या प्राथमिक शाळेला भेट देऊन त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही असे शिक्षकांना सांगत विद्यार्थ्यांना स्वच्छतेची निगा राखण्यासाठी मार्गदर्शन करत राहा. लहान मुलेच खऱ्या अर्थाने स्वच्छतादूत असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

या भेटीत आरोग्यमंत्र्यांनी न्याहाळे उपकेंद्र, काष्टीपाडा, कुंडाचा पाडा, सांबरपाडा, गिवंडा या पाड्यांना भेटी दिल्या. सावटपाडा अतिदुर्गम भागात आहे. तेथे जाण्यासाठी जवळच्या अंतराचा रस्ता नाही, नदीला पाणी असल्याने तेथे जाणे शक्य नाही असे अधिकाऱ्यांनी सांगितल्यावर डॉ. सावंत यांनी काष्टीपाड्यापासून पायी जात एका उंच टेकडीवरून दुर्गम पाड्याची पाहणी केली. प्रचंड खोल दरी पार करून त्या पाड्यात पोहोचणे म्हणजे आव्हानच असल्याचे लक्षात आले. तरीदेखील आशा कार्यकर्ती आणि अंगणवाडी सेविकांच्या मदतीने या पाड्यात गरेजेची औषधे ठेवावी, असे त्यांनी सांगितले.

**- अजय जाधव**

विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

## एसटीवर आता 'जय महाराष्ट्र'



**मुंबई सेंट्रल** येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा ६९ वा वर्धापन दिन साजरा झाला. या वेळी प्रवाशांसाठी सुखसुविधा असलेल्या व जय महाराष्ट्र हे बोधचिन्ह असलेल्या शिवशाही बसचे उद्घाटन परिवहन मंत्री दिवाकर रावते यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचारी, कामगार यांच्या हिताच्या अनेक योजना या वेळी जाहीर करण्यात आल्या. एस.टी. महामंडळाच्या माध्यमातून 'जय महाराष्ट्र' हा जनतेचा आवाज पोहचविण्यासाठी आता महाराष्ट्र राज्य परिवहन या बोधचिन्हात बदल न करता जय महाराष्ट्र या बोधचिन्हाचा वापर केला आहे. डिसेंबर पर्यंत एक हजार शिवशाही बस उपलब्ध होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री श्री रावते यांनी दिली.

## ग्रामीण पर्यटनाला मान्यता



**राज्यातील** सर्व माध्यमांच्या तसेच सर्व मंडळाशी संलग्नित शाळांतील इयत्ता ५ ते १० मधील विद्यार्थ्यांना ऐतिहासिक,भौगोलिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विषयाच्या ज्ञानवाढीसाठी शैक्षणिक सहल अथवा ग्राम पर्यटनाला मान्यता देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहल अथवा ग्राम पर्यटनाच्या वेळी ऐतिहासिक,भौगोलिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक माहिती मिळावी, तसेच त्या गोष्टी प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळावी यासाठी एका शैक्षणिक वर्षामध्ये एक शैक्षणिक सहल अथवा ग्रामीण पर्यटनाचे आयोजन करण्यास शाळांना मान्यता देण्यात आली आहे. मात्र अशा सहलीच्या आयोजनासाठी विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यात येणार नाही. सहलीमध्ये सहभागी होण्याकरिता संबंधित पालक आणि विद्यार्थ्यांची संमती असणे आवश्यक राहील. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलबध असून त्याचा संकेताक ०१७०५२०१५००५८१३२१ असा आहे.

## महास्वयंम पोर्टल

**कौशल्य** विकास विभागाच्या महारोजगार, एमएसएसडीएस व महास्वयंरोजगार या तिन्ही वेबपोर्टलचे एकत्रिकरण करून महास्वयंम हे वेबपोर्टल विकसित करण्यात आले आहे.

कौशल्य विकास (एमएसएसडीएस), रोजगार (महारोजगार) व उद्योजकता (महास्वयंरोजगार) याबाबत तीन स्वतंत्र वेब पोर्टल होती. हे तिन्ही वेबपोर्टल एकाच ठिकाणी एकत्रित करून 'महास्वयंम' हे वेबपोर्टल विकसित करण्यात आले.

महास्वयंम पोर्टल वन स्टॉप शॉप म्हणून काम करणार आहे. हे सर्व प्लॅटफार्म एकाच ठिकाणी वापरता येणार आहेत. या वेबपोर्टलवर कौशल्य प्रशिक्षित लोकांची यादी ठेवता येईल. ज्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्यांना नोंदी करता येतील. बेरोजगारांना नोंदी करता येतील. उद्योगधंद्यांना मागणीप्रमाणे नोंदणी करता येणार आहे. उमेदवारास एकाच ठिकाणी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताविषयक माहिती एकत्रित उपलब्ध होणार आहे. प्रशिक्षण संस्थाना उमेदवारास प्रशिक्षण व प्रशिक्षणाचे देयक त्याचप्रमाणे रोजगारबाबत संपूर्ण माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. उद्योजकास सीएनव्ही ॲक्ट अन्वये रिक्त असलेली पदे अधिसूचित करणे, प्रसिद्धी देणे, योग्य उमेदवाराची निवड तयार करणे, मुलाखतीचा एसएमएस पाठवणे, अनिवार्य विवरणपत्र सादर करणे इ.सुविधा उपलब्ध आहेत. उमेदवारांना नोकरीबाबतची माहिती एकाच बटनवर उपलब्ध आहे. याबाबत एस.एम.एस. उपलब्ध होण्याची सुविधा आहे. उमेदवार, उद्योजक यांना रोजगार मेळाव्यात सहभागी होणे सुलभ होणार आहे. उमेदवार, उद्योजक यांना प्रशिक्षण नोंदणी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

उमेदवारास नोंदणी, रोजगार उपलब्धतेबद्दल माहिती व अर्ज भरणे, प्रशिक्षणाबाबतची माहिती, स्वयंरोजगाराबाबतची माहिती अर्ज भरणे, रोजगार मेळावे माहिती व सहभागी होण्याची सुविधा, रिक्त पदासाठी अर्ज करणे आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

प्रशिक्षण संस्थांसाठी नोंदणी, शासनाच्या कौशल्य विकास योजनेत सहभागी होणे, प्रशिक्षण शुल्क देयक, प्रशिक्षण शुल्क इसीएस पद्धतीने प्राप्त होते. तसेच उद्योजकांसाठी नोंदणी, रिक्तपदे प्रसिद्ध करणे, सुयोग्य उमेदवारांची यादी काढणे आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. एका बटणावर एकूण नोंदणीकृत उमेदवार/ उद्योजक/प्रशिक्षण संस्था, एकूण कौशल्य विकास झालेले उमेदवार, एकूण नोकरी प्राप्त व स्वयंरोजगार करीत असलेल्या उमेदवार आदींची माहिती शासनास उपलब्ध होणार आहे.

## शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेच्या व्याप्तीत वाढ

**राजर्षी** छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या योजनेच्या लाभासाठी निश्चित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या यादीत कृषी व संलग्न पदवी या अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गुणांची अट शिथिल करण्यात आली आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागासह कृषी – पशुसंवर्धन – दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ देण्यात येतो. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सहा लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पात्रतेसाठी दहावी अथवा बारावीच्या परीक्षेत ६० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक असल्याची अट शिथिल करण्यात आली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील काही पदविकाधारक विद्यार्थी निवडक व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतात अशा विद्यार्थ्यांसाठी १० वीच्या परीक्षेत ६० टक्के गुणांच्या अटींऐवजी संबंधित पदविका अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळविणे आवश्यक करण्यात आले आहेत. या निर्णयांमुळे पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम सुलभ आणि तत्काळ मिळावी यासाठी ती पात्र लाभार्थ्यांच्या आधारसंलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल.

## पर्यटनस्थळी दर्जेदार निवास सुविधा

**आदरातिथ्य** क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय



पातळीवरील एअर बीएनबी ही कंपनी आणि राज्य शासनाचा पर्यटन विभाग यांच्यामध्ये १३ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. एअर बीएनबी ही पर्यटकांना वाजवी दरात निवास व्यवस्था आणि स्थानिक अनुभव मिळवून देणाऱ्या सेवासुविधा पुरविणारी कंपनी असून तिचे जगभरातील १९१ देशांमध्ये जाळे विस्तारले आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून देशातील पर्यटकांना महाराष्ट्रात येण्यासाठी एक खात्रीचे व्यासपीठ उपलब्ध झाले असल्याचा विश्वास पर्यटन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

पर्यटनाचा व्यवसाय हा आता बहुतांश ऑनलाइन शिफ्ट झाला आहे. बरेच पर्यटक पर्यटनाला जाण्यापूर्वी सर्व सोयी–सुविधांचे ऑनलाइन बुकिंग करतात. या पार्श्वभूमीवर एअर बीएनबी समवेत झालेला सामंजस्य करार महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्रात ऐतिहासिक पर्यटनस्थळे, सांस्कृतिक वैविध्य मोठ्या प्रमाणात आहे. या पर्यटनस्थळांवर आंतरराष्ट्रीय पर्यटकांना दर्जेदार आणि आंतरराष्ट्रीय मानके असलेली निवासव्यवस्था उपलब्ध होण्यास या सामंजस्य करारामुळे चालना मिळणार आहे.

## आदरातिथ्य क्षेत्रात ५० हजार लघुउद्योजक

एअर बीएनबी ही कंपनी पर्यटकांना निवासाचा आगळा–वेगळा अनुभव उपलब्ध करून देते. स्थानिकांशी समन्वय साधून पर्यटकांना निवासाच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांना स्थानिक संस्कृती, खाद्यपदार्थ, कला–संस्कृती आदींचे दर्शन घडविते. महाराष्ट्रातील घरगुती निवास व्यवस्थांना एअर बीएनबीच्या माध्यमातून जागतिक व्यासपीठ मिळणार आहे. या भागीदारीच्या माध्यमातून राज्यभरात आदरातिथ्य (हॉस्पिटॅलिटी) क्षेत्रात किमान ५० हजार लघुउद्योजक तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

अमरावती येथे विकसित होत असलेला डिअर पार्क, चिपळूण येथील क्रोकोडाइल पार्क, भंडारदरा, चिखलदरा, सिंधुदुर्ग,



सह्याद्रीच्या रांगा, दुर्लक्षित किल्ले, समुद्रकिनारे, थंड हवेची ठिकाणे अशा विविध ठिकाणी स्थानिकांसमवेत भागीदारी करून निवास व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. यामुळे स्थानिकांना रोजगार मिळण्याबरोबरच पर्यटकांनाही दर्जेदार आणि खात्रीची निवासव्यवस्था मिळू शकेल.

## शिक्षक पात्रता परीक्षा

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा –२०१७ (MAHA-TET 2017) २२ जुलै २०१७ रोजी घेण्यात येणार आहे.

इयत्ता पहिली ते पाचवी आणि इयत्ता सहावी ते आठवीसाठी सर्व व्यवस्थापने, सर्व मंडळे, सर्व माध्यमे, अनुदानित, विना अनुदानित, कायम विना अनुदानित इत्यादी शाळांमध्ये शिक्षण सेवक/शिक्षक पदावर नियुक्तीसाठी उमेदवारांना प्रथमत: ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असणार आहे. या परीक्षेसंबंधी सर्व शासन निर्णय, अनुषंगिक माहिती, सूचना तसेच ऑनलाइन अर्ज भरणे, अर्ज स्वीकृती, परीक्षेची वेळ व इतर सविस्तर माहितीचा तपशील www.mahatet.in आणि www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

## अभिरूप मुलाखतीच्या उपक्रमातील ४९ विद्यार्थी यशस्वी

**महाराष्ट्र** सरकार तर्फे दिल्लीच्या महाराष्ट्र सदनामध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खास प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. यंदाही या विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन महाराष्ट्र सदनात करण्यात आले होते. या वर्गाचा लाभ घेतलेल्या विश्वांजली गायकवाडसह ४९ विद्यार्थ्यांना अंतिम निकालात यश मिळाले आहे.

राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांसाठी प्रयत्न करणाऱ्या महाराष्ट्रातील उमेदवारांचे प्रशासनातील प्रतिनिधित्व वाढावे, त्यांच्यातील वैयक्तिक त्रुटी दूर करणे, सामाजिक विषयांना अद्ययावत करणे तथा यूपीएससीच्या मुलाखतीकरिता आत्मविश्वास वाढवणे यासाठी उमेदवारांना गुणात्मक प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण विभागामार्फत मागील ३ वर्षांपासून दिल्ली येथे अभिरूप मुलाखत क्षमता वृद्धी उपक्रम राबवण्यात येत आहे. याचा विद्यार्थ्यांना मुख्य मुलाखतीकरिता मोठा फायदा झाला.

२०१६-१७ करिता २५ मार्च ते ३० एप्रिल, २०१७ दरम्यान प्रत्येक शनिवार व रविवारी अभिरूप मुलाखत कार्यक्रम उमेदवारांकरिता राबवण्यात आला. एकूण ११ दिवस चाललेल्या व १७ पॅनल्सने १३६ उमेदवारांची अभिरूप मुलाखत अनुभवी व तज्ज्ञांमार्फत घेऊन उमेदवारांना मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षण वर्गामध्ये डॉ. श्रीकर परदेशी (आय ए एस) व सदानंद दाते (आपीएस) यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

## रस्ते अपघाताबाबत सामंजस्य करार



**राज्यातील** रस्ते अपघात रोखण्यासाठी ५ जून रोजी परिवहन मंत्री दिवाकर रावते यांच्या उपस्थितीत अमेरिकेतील वर्ल्ड रिसोर्स इन्स्टिट्यूट या जागतिक संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार ही संस्था राज्यातील अपघातांचे विश्लेषण करून विनामूल्य उपाययोजना सुचवणार आहे.

रस्ते अपघातांची वाढती संख्या लक्षात घेता ते कमी होण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार रस्ता सुरक्षा समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीने सुचवलेल्या उपाययोजनांनुसार राज्यातील अपघातांचा अभ्यास करून अपघात विषयक धोरण निश्चित करणे, सुरक्षात्मक उपाययोजना आखणे यासाठी वर्ल्ड रिसोर्स इन्स्टिट्यूट या संस्थेची मदत घेण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार हा सामंजस्य करार करण्यात आला असून ही संस्था विनामूल्य मदत करणार आहे. राज्यातील अन्य संस्थांशी समन्वय साधून ही संस्था उपाययोजना सुचवणार आहे.

## प्रा. सुखदेव थोरात यांना डॉ. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार

**प्राध्यापक** सुखदेव थोरात यांना राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते वर्ष २०११ चा 'डॉ. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. विज्ञान भवन येथे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयांतर्गत येणाऱ्या डॉ. आंबेडकर प्रतिष्ठानाच्या वतीने दुर्बल घटकांच्या उत्थानासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या मान्यवरांना राष्ट्रपतीच्या हस्ते 'डॉ. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार' वितरित करण्यात आले. या सोहळ्यात वर्ष २०११, वर्ष २०१२ तसेच वर्ष २०१४ साठी देशभरातील तीन संस्था आणि एका व्यक्तीला या वेळी सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप १० लाख रूपये रोख प्रशस्तिपत्र असे आहे.

प्रा. सुखदेव थोरात हे मूळचे महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्याचे आहेत. त्यांनी अर्थशास्त्र विषयात दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून पीएच.डी. केली. १९८९ ते १९९१ पर्यंत अमेरिकेतील आईओवास्टेट विद्यापीठ येथे अभ्यागत प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. यासह इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इंस्टिट्यूट, वॉशिंग्टनमध्ये सल्लागार म्हणून कार्यरत होते. २००६ ते २०११ दरम्यान विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली. प्रा. थोरात यांना २००८ मध्ये भारत सरकारने पद्म पुरस्कार देऊन सन्मानित केले. सध्या ते भारतीय समाज विज्ञान संशोधन परिषद (आईसीएसएसआर) चे अध्यक्ष आहेत. यासह जवाहरलाल नेहरू विद्यापीठात मानद प्राध्यापक म्हणुनही कार्यरत आहेत.

प्रा. थोरात हे जाती, प्रथा, जातीय भेदभाव, अर्थव्यवस्था आणि गरिबी या विषयाचे विश्लेषक आहेत. डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या पुस्तकांचे ते गाढे अभ्यासक आहेत. प्रा. थोरात यांनी आतापर्यंत २१ पेक्षा अधिक शैक्षणिक पुस्तके लिहिलेली आहेत, यासह त्यांचे १०० पेक्षा अधिक लेख प्रकाशित झाले आहेत.



## मोलगी: अतिदुर्गम भागातील पहिले पोषण पुनर्वसन केंद्र



मोलगी येथे कुपोषित बालकांच्या उपचाराचा आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

**सातपुड्याच्या** दुर्गम व अतिदुर्गम भागातील कुपोषित बालकांच्या पोषण- उपचारासाठी मोलगी येथील ग्रामीण रुग्णालयात उभारण्यात आलेल्या राज्यातील पहिल्या ग्रामीण पोषण पुनर्वसन केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

युनिसेफच्या माध्यमातून या पोषण पुनर्वसन केंद्राची निर्मिती करण्यात आली असून मोलगी येथील ग्रामीण रुग्णालयात हा कक्ष उभारण्यात आला आहे. अतिदुर्गम भागातील कुपोषणाची समस्या दूर करण्यासाठी पोषण पुनर्वसन केंद्र उपयुक्त ठरेल. या ठिकाणी सहा वर्षे वयापर्यंतच्या कुपोषित बालकांचा सर्वांगीण शारीरिक विकास होण्यासाठी उपचार करण्यात येणार आहेत. या केंद्रामध्ये शून्य ते सहा वर्षे वयोगटातील कुपोषित बालकांवर १४ ते २१ दिवसांपर्यंत उपचार करण्यात येणार आहे. या ठिकाणी दाखल करताना बालकाचे जे वजन असेल, त्यात १५ टक्क्यांपर्यंत वाढ होईतो त्याच्यावर उपचार करण्यात येतील. या बालकांना त्यांच्या घरी पाठवल्यानंतर पुढील दोन महिन्यांपर्यंत त्यांची दर १५ दिवसांनी तपासणी करण्यात येईल. या केंद्रामध्ये बालकांसाठी उपचाराबरोबरच पोषण आहार, खेळण्याची साधने, कुपोषित बालकाच्या पालकांचे समुपदेशन, बालकांच्या आईला आरोग्य सुविधा पुरवण्यात येणार आहेत. तसेच नातेवाइकांसाठी भोजनाची व्यवस्था व बालकाच्या पालकाला बुडणाऱ्या रोजगाराची भरपाई म्हणून रोज १०० रुपये देण्यात येणार आहेत.

## मृद व जलसंधारण आयुक्तालय

**औरंगाबाद** येथे मृद व जलसंधारण आयुक्तालयाच्या स्थापनेचा शासन निर्णय १ जून रोजी लागू करण्यात आला. त्यानुसार मृद व जलसंधारण आयुक्तालयांतर्गत आस्थापनेकरिता एकूण १६ हजार ४७९ पदांच्या आकृतिबंधास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयानुसार औरंगाबाद येथील जल व भूमि व्यवस्थापन संस्थेच्या (वाल्मी) स्वायत्ततेला बाधा न आणता या संस्थेस मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारित आणण्यात आले असून वाल्मीच्या परिसरातच हे आयुक्तालय स्थापन करण्यात येणार आहे.



## महाराष्ट्राला गोपालरत्न आणि कामधेनू पुरस्कार

**धुळे** जिल्ह्यातील विक्रांतसिंह रावल यांना गोपाल रत्न तर पुण्यातील 'वृंदावन थारपरकर देसी काऊ क्लबला राष्ट्रीय कामधेनू पुरस्काराने केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री राधा मोहन सिंग यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावर्षीपासूनच 'राष्ट्रीय गोकुळ मिशन' अंतर्गत राष्ट्रीय गोपालरत्न आणि कामधेनू पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. प्रथम पुरस्कार महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा येथील विक्रांतसिंह रावल यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप ५ लाख रूपये रोख प्रशस्तिपत्र, स्मृतिचिन्ह व शाल असे आहे. श्री. रावल हे महाराष्ट्र राज्य दुग्ध उत्पादक सहकारी संघ मर्यादित, (महानंद) मुंबईचे संचालक आहेत. अस्सल गिर जातींच्या गायीचे पालन रावल कुटुंब करते. पुण्यातील 'वृंदावन थारपरकर देसी काऊ क्लब'ला राष्ट्रीय कामधेनु पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप ३ लाख रूपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, प्रशस्तिप्रत्र असे आहे. काही मित्रांनी मिळून ३ वर्षापूर्वी सुरू केलेल्या या क्लबमध्ये सुरुवातीला केवळ ६ थारपरकर जातीच्या देसी गायी होत्या. आता त्यांची संख्या वाढून १४७ इतकी झाली.



केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री राधा मोहन सिंग यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना विक्रांतसिंह रावल.

**संघ लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) मुख्य परीक्षेचा निकाल काही दिवसांपूर्वीच लागला. या परीक्षेत पुण्याची विश्वांजली गायकवाड हिने देशात अकरावा, तर राज्यात पहिला क्रमांक पटकावला आहे. शक्यतो यूपीएससी परीक्षेत सर्वोच्च स्थानी येणारे विद्यार्थी आयएएससाठी पहिली पसंती देतात. पण विश्वांजली हिने आपले प्राधान्य आयएफएसला असेल असे स्पष्ट केले आहे. परराष्ट्र सेवेत दाखल होऊन देशसेवा करण्याचा ध्यास असणाऱ्या विश्वांजली गायकवाडशी साधलेला संवाद..**

# आत्मविश्वास आणि चिकाटी

### विश्वांजली तुझ्या आतापर्यंतच्या शैक्षणिक प्रवासाविषयी सांग..

मुळातच माझ्या घरी शिक्षणाचे चांगले वातावरण आहे. कारण माझी आई डॉ. ज्योती गायकवाड आणि वडील डॉ. मुरलीधर दोघेही एमएमसीसी कॉलेजात प्राध्यापक आहेत, तर भाऊ चैतन्यसुद्धा माझ्यासारखेच इंजिनिअरिंग करतो आहे. चैतन्य व्हीआयटी कॉलेजमध्ये मेकॅनिकल शाखेत अंतिम वर्षाला आहे. दहावी आणि बारावी यासारख्या महत्त्वाच्या वर्षांनाही मी कधी क्लास लावला नाही तर स्वअध्ययन यालाच महत्त्व दिले. मला बारावीत ९६.३३ टक्के गुण होते. मी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी आहे. मी शाळेपासून अभ्यास, वेगवेगळे उपक्रम यामध्ये आघाडीवर होते. बारावीत चांगले गुण मिळाले. पुण्यातील शासकीय अभियांत्रिकीत प्रवेश घेतला. संगणक अभियांत्रिकीच्या शिक्षणाबरोबरच अजून काही करायला हवे असे मला वाटत होते.

खरे तर यूपीएससी परीक्षा मी दुसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण झाले आहे. माझे शिक्षण शासकीय इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये (सीओईपी) कॉम्प्यूटर शाखेमध्ये झाले आहे. मी २०१४ मध्ये सीओईपीमधून कॉम्प्यूटर इंजिनीअरिंग पूर्ण केले आहे. गेल्या ३ वर्षांपासून ती यूपीएससीची तयारी करीत होते. मला परराष्ट्र सेवेत अर्थातच 'इंडियन फॉरेन सर्व्हिस' (आयएफएस) करीअर करायचे आहे. परराष्ट्र सेवेत असतानाही तुम्हाला देशसेवा करता येते असे मला वाटते.



**विश्वांजली गायकवाड**

### यूपीएससी परीक्षेचा अभ्यास आणि एकंदरीतच या परीक्षेविषयी तू काय सांगशील?

यूपीएससी परीक्षेचा अभ्यास आणि एकंदरीतच या परीक्षेची तयारी करीत असताना विद्यार्थ्यांनी या परीक्षेचे स्वरूप समजून घेणे खूप आवश्यक आहे. या परीक्षेचा अभ्यास करीत असताना आपल्यातील क्षमता नेमक्या काय आहेत, आपण कोणत्या विषयात चांगले आहोत हे ओळखणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी स्वयंअध्ययनाला महत्त्व देण्याची आवश्यकता आहे. मी या परीक्षेच्या अभ्यासाची तयारी २०१४ पासून सुरू केली होती. यापूर्वी दिलेल्या परीक्षेत काही टक्क्यांनी मला पूर्वपरीक्षा उत्तीर्ण करता आली नव्हती. मग मी स्वयंमूल्यमापन केले आणि मी कुठे कमी पडले त्याचा अभ्यास केला. पूर्वपरीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मुख्य परीक्षेचा आणि मुलाखतीचा कसून अभ्यास केला. मुख्य परीक्षेसाठी राज्यशास्त्र हा विषय निवडला होता.

### तू एक चांगली रोव्हर खेळाडू आहेस याबद्दल काय सांगशील?

मी सीओईपीच्या बोट क्लबची सक्रिय सदस्य होते. कॉलेजमध्ये शिकताना मी विविध उपक्रमांमध्ये सहभागी व्हायचे आणि मग त्यातूनच मला रोव्हरची आवड निर्माण झाली. मी रोव्हिंग या क्रीडाप्रकारात सीओईपीच्या संघाचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व केले होते. काही वर्षांपूर्वी मी फिलिपाइन्समध्ये झालेल्या ॲमेच्युअर्स रोव्हिंग स्पर्धेत सीओईपीचे प्रतिनिधित्व केले होते. मला राफ्टिंग या खेळात राष्ट्रीय स्तरावर ब्रॉंझ पदकही मिळाले आहे. या खेळाबरोबरच मला वेगवेगळ्या विषयावरील पुस्तके वाचायला खूप आवडतात.

### परराष्ट्र सेवेतच जायचे असे तू ठरवले आहेस याविषयी..

यूपीएससी परीक्षेत सर्वोच्च स्थानी येणारे विद्यार्थी आयएएसला प्राधान्य देतात. पण माझे प्राधान्य आयएफएसला आहे. माझे ध्येय हेच आहे की, परराष्ट्र सेवेत दाखल होऊन भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध बळकट करण्यासाठी भरीव काम करण्याचे. त्यासाठी कष्ट करण्याची माझी तयारी आहे आणि आव्हानांना सामोरे जाण्याचा कणखरपणा मी ठेवला आहे! मला लहानपणापासून असलेली वाचनाची आवड, माझ्या वाचनात आलेले आंतरराष्ट्रीय राजकारण या सगळ्याचा उपयोग मला आता भारतीय विदेश सेवेत जाताना होणार आहे. भारतीय विदेश सेवेत काम करीत असताना परराष्ट्र धोरण यात मला सुरुवातीपासूनच रस वाटत होता. प्रत्येक सेवा ही महत्त्वाची आहे. राष्ट्रीय विकास आणि परराष्ट्र धोरण, परदेशी गुंतवणूक हे माझे आवडीचे विषय होते. आज भारत हा देश महासत्ता होऊ शकेल इतकी क्षमता आपल्यात आहे त्यामुळे आयएफएस म्हणून काम करताना जागतिक पातळीवर आपल्या देशाचे पर्यायाने आपल्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करायला मिळणे ही माझ्यासाठी मोठी संधी आहे, असे मी मानते.

### तुझे आयएफएसचे प्रशिक्षण सुरू झाले आहे का?

आता साधारण ऑगस्टपासून आमचा सर्व सेवांसाठी असलेला

पायाभूत अभ्यासक्रम सुरू होईल. तो साधारण चार ते पाच महिने चालेल. मग 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन सर्व्हिसेस'मध्ये साधारण दीड वर्ष माझे प्रशिक्षण असेल आणि मग मला पोस्टिंग मिळेल. आयएफएसमध्ये थर्ड सेक्रेटरी, सेकंड सेक्रेटरी, फर्स्ट सेक्रेटरी अशी पदे असते तर एखाद्या विदेशी दूतावासात राजदूत किंवा उच्चायुक्त अशी पदे मिळतात. एकदा तुम्ही तुमची शाखा निवडली की, कायम तुम्हाला त्याच शाखेत राहावे लागते. आयएफएसमध्ये सर्वात वरचे पद परराष्ट्र सचिव हे असते. आता आयएफएस प्रशिक्षण सुरू झाले की, मग आपल्या आवडीप्रमाणे परदेशी भाषा शिकणार आहे. चिनी आणि स्पॅनिश भाषा शिकण्याकडे माझा अधिक कल असणार आहे.

चांगले व्यक्तिमत्त्व, आत्मविश्वास, चौकसपणा, चिकाटी, ध्येय हे गुण जसे यूपीएससी परीक्षा पास होण्यासाठी आवश्यक असतात तसेच लागतील ते कष्ट करण्याची तयारी, सारासार विचार करण्याची क्षमता आणि त्याला आत्मविश्वासाची जोड आवश्यक असते असे मला वाटते.

### अनेकांना मुलाखतीमध्ये अपयश येते याविषयी...

प्रशासकीय सेवेचे आकर्षण लहानपणापासून होते. मात्र प्रशासकीय सेवेत जायचे हे मी अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षांचे शिक्षण घेत असताना ठरवले. स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली पण पहिल्या प्रयत्नात पूर्वपरीक्षेत मी पात्र झाले नाही. मग मी पुन्हा जिद्दीने अभ्यास सुरू केला. पहिल्या प्रयत्नात मिळालेल्या अपयशाने मी अधिक 'फोकस' झाले. काय चुकलं, काय करायला हवे याचा नीट विचार करून तयारी सुरू केली. मी माझ्या आवडीने हे क्षेत्र निवडले होते. त्यामुळे यश मिळणार याबाबत विश्वास होता.

लेखी परीक्षेमध्ये पास होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक क्षमता असते. तर हेच विद्यार्थी जेव्हा मुलाखतीला समोरे जातात तेव्हा त्यांच्या बुद्धीचा कस लागतो असेच म्हणावे लागेल. त्यामुळे अशा मुलाखतींना सामोरे जाताना आत्मविश्वास तितकाच महत्त्वाचा. मी जेव्हा मुलाखतीला सामोरे गेले तेव्हा मलासुद्धा खूप भीती वाटत होती. पण नंतर एकदा पॅनेलसमोर गेल्यावर आणि त्यांनी प्रश्न विचारायला सुरुवात केल्यावर भीती राहिलीच नाही. पॅनेलमधील व्यक्ती तुमच्या उत्तरांवरून तुमचे व्यक्तिमत्त्व कसे आहे हे तपासत असतात. त्यामुळे मी तर असे सांगेन की, जे विद्यार्थी मुलाखतीला जातात त्या विद्यार्थ्यांनी मुलाखतीचा कोणताही ताण न घेता पॅनेलने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे द्यावी. मुळात दडपण न घेता आपल्याला जे येते ते सांगावे.

**– वर्षा फडके**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय


सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (महाराष्ट्र शासन)
समाज कल्याण कार्यालय,बीड व गुरुकिल्ली ॲकॅडमी प्रा.लि.
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षा – २०१७

प्रवेश शुल्क ₹ २००/-
एकूण ५ लक्ष रुपयांची भव्य बक्षिसे
त्वरा करा प्रवेश मर्यादित

प्रथम बक्षीस ₹ १ लक्ष
व्दितीय बक्षीस ₹ ५१ हजार
तृतीय बक्षीस ₹ २१ हजार

सहभागी विद्यार्थ्यांना
१) १०० विद्यार्थ्यांना : प्रत्येकी ₹ १ हजारचे बक्षीस
२) २०० विद्यार्थ्यांना : प्रत्येकी ₹ ५०० चे बक्षीस
३) १००० विद्यार्थ्यांना : प्रत्येकी ₹ १०० चे बक्षीस
४) २००० विद्यार्थ्यांना : प्रत्येकी सामान्यज्ञान पुस्तिका बक्षीस

मोफत नोंकरी अपडेट आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी 9422060303 हा क्रमांक आपल्या ग्रुपवर ॲड करा,

अर्ज करण्याचे संकेत स्थळ
www.maharecruitment.mahaonline.gov.in
अर्ज करण्याचा अंतीम दिनांक : ३० ऑगस्ट २०१७

स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास प्रतिमाह ₹ ३००/- ची शिष्यवृत्ती

संपर्क क्रमांक : 02442- 221122, 233393

# पावसाळ्यात तब्येत सांभाळा...

**पावसाळ्याच्या आगमनाने उन्हाळ्यातील उष्ण आणि दमट हवामानापासून लगेच आराम मिळतो. हा ऋतू कविमनालासुद्धा प्रेरणा देतो. आपण सर्वसामान्य पावसाळ्यात गरम चहा आणि भज्यांचा आस्वाद घेतो. तथापि या हंगामात त्यासोबत विविध आरोग्यविषयक समस्याही जाणवू लागतात. या ऋतूमध्ये संपूर्ण देशभरातील विविध दवाखाने, रुग्णालये आणि प्रयोगशाळा व्यस्त होतात.**

पावसाळ्याशी संबंधित आजार सामान्यतः दोन प्रकारामध्ये वर्गीकृत केले जाऊ शकतात. १) डासांमार्फत पसरवले जाणारे रोग मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया इत्यादी २) जलजन्य आजार टायफॉइड (विषमज्वर), हैजा (कॉलरा) इत्यादी.

## हिवताप

हिवताप ॲनाफिलीस डासांच्या मादीद्वारे पसरतो. हिवतापाची सामान्य लक्षण थंडी वाजून चक्रीय ताप हे आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की कोणताही ताप हिवताप असू शकतो. म्हणूनच सामान्य रक्त चाचणीद्वारे निदान करणे आवश्यक असते. योग्य वेळी



निदान आणि उपचारांमुळे हानिकारक गुंतागुंत, जसे की, कावीळ, अनेमिया, रक्तस्राव, मूत्रपिंड निकामी होणे, सेरेब्रल मलेरिया यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होत नाहीत.

## डेंग्यू

डेंग्यू हा आणखी एक डासांमुळे पसरवला जाणारा महत्त्वपूर्ण रोग आहे. हा रोग चार संबंधित डेंग्यू विषाणूंपैकी एकामुळे होतो. सामान्यत: संक्रमण झाल्यानंतर ४-६ दिवसांनी या रोगाची लक्षणे सुरू होतात. रुग्णाला सर्व शरीरामध्ये तीव्र वेदना होतात आणि उच्च तापदेखील येतो. म्हणूनच याला ब्रेक बोन ताप म्हटले जाते. रुग्णांना त्वचेवर लाल चट्टे, तीव्र डोकेदुखी, अतिसार, उलट्या किंवा ओटीपोटात वेदना होऊ शकतात. रुग्णांचा रक्तदाब कमी होतो. प्लेटलेट संख्येत अकस्मात घट होऊ शकते. पॅरासिटामोल किंवा तत्सम औषधे यांसारख्या वेदनाशामक औषधांसह वैद्यकीय सल्ला घेणे आणि स्वयंऔषध टाळणे महत्त्वाचे आहे. सौम्य आजारांमध्ये विश्रांतीसह खूप जलपदार्थ घेणे पुरेसे असू शकते. तथापि गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये रुग्णालयात भरती होणे आवश्यक असते.


## हेपॅटायटीस 'अ' व 'ई'

हेपॅटायटीस 'अ' आणि 'ई' (कावीळ) मळमळ, उलटी होणे, डोळे आणि त्वचा पिवळी होणे या लक्षणातून समजून येते. हा विषाणुजन्य रोग दूषित पाणी आणि अन्न यांच्याद्वारे पसरतो. गर्भवती महिलांना अधिक गंभीर प्रमाणात हा आजार होऊ शकतो. तरी गर्भवती महिलांनी हा आजार होऊ नये यासाठी विशेष काळजी घ्यावी. हेपॅटायटीस 'अ'च्या विरुद्ध लस उपलब्ध आहे.

## लेप्टोस्पायरोसिस

लेप्टोस्पायरोसिस लेप्टोस्पाइरा नावाच्या स्प्रिंग आकाराच्या जीवाणूमुळे होतो. संक्रमित जनावरांच्या मूत्रमिश्रित दूषित पाणी किंवा मातीशी संपर्क पसरण्याने होतो. पावसाच्या साचलेल्या पाण्यातून चालताना त्वचेत असलेल्या छोट्या जखमांमधून हा रोग शरीरात शिरकाव करतो. उंदीर, कुत्रे आणि गुरांच्या मूत्र माध्यमातून संक्रमित होतो. बहुतेक रुग्णांना ताप येण्याच्या पहिल्या टप्प्यानंतर बरे होतात जे इतर व्हायरल तापाची साधार्मिक असतात परंतु काही रुग्ण दुसऱ्या आणि अधिक धोकादायक अवस्थेत पुन्हा आजारी पडू शकतात.

दुसऱ्या टप्प्यात गंभीर कावीळ, मूत्रपिंड निकामी होणे आणि फुफ्फुसांचा रक्तस्राव असे गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात. दूषित पाण्यातून चालणे टाळण्याने लेप्टोस्पिरोसिस टाळता येऊ शकतो. संभाव्य अकारण असुरक्षित संसर्ग झाल्यास आपले डॉक्टर प्रतिरोधक औषधे देऊ शकतात.



## चिकनगुनिया

चिकनगुनिया हा डासांद्वारे पसरणारा आणखी एक रोग आहे. या आजारात तीव्र सांधेदुखी होते आणि तापदेखील येतो. सांधेदुखी ही सहसा काही दिवसांपर्यंतच टिकते परंतु काही रुग्णांमध्ये ती खूप महिने राहू शकते. सर्वात विषाणूजन्य रोगांप्रमाणे या रोगांवरही कोणताही इलाज नाही. रुग्णांना लक्षणांनुसार उपचार दिले जातात.

डासांद्वारे होणारे रोग मच्छरदाणी वापराने टाळता येतात. लांब बाह्यांचे कपडे परिधान करून आणि डास प्रतिबंधक इतर उपाय योजणे उपयुक्त आहे. आपल्या घरी किंवा शेजारी डासांचे प्रजनन होईल अशा प्रकारचे पाणी साचू देऊ नये. विविध शासकीय प्राधिकरणांकडून याबाबत आलेल्या सूचनांचे पालन करावे. आपल्या घराच्या आसपास नियमितपणे डास प्रतिबंधक औषधांची फवारणी करून घ्यावी. डेंग्यूची लस चाचणीच्या अखेरच्या टप्प्यात आहे. लवकरच ती उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.



## टायफॉइड

टायफॉइड (विषमज्वर) पावसाळ्यात अनेकांना नित्याने होतो. दूषित अन्न आणि पाण्याद्वारे हा प्रसारित होतो. उच्च दर्जाचा ताप जो दिवसभर हळूहळू वाढतो याचे ठराविक लक्षण आहे. रुग्णांना बद्धकोष्ठता, ओटीपोटात दुखणे आणि अशक्तपणादेखील जाणवू शकतो. उपचार न केल्यास टायफॉइड जीवघेणा ठरू शकतो. म्हणून आपल्या डॉक्टरांचा सल्ला घेणे खूप महत्त्वाचे आहे. जे तुम्हाला योग्य प्रतिजैविकांचा (अँटिबॉयोटिक्स) उपचार करतील. टायफॉइडची लसदेखील उपलब्ध असून डॉक्टरच्या सल्ल्यानुसार ती आपण घेऊ शकता.

## कॉलरा

पावसाळ्यामध्ये हैजा (cholera) आणि अन्य संक्रमक अतिसार देखील सामान्यपणे आढळतात. यात रुग्णास अतिसार (loose motions) होतो. यामुळे शरीरातील पाणी आणि क्षार कमी होऊन रक्तदाब कमी होतो. पर्यायाने विविध अवयवांना पुरेशा प्रमाणात रक्तपुरवठा होत नाही. सौम्य संक्रमण झालेल्या रुग्णांचा उपचार ओआरएस पावडर पाण्यातून देऊन केला जाऊ शकतो. खूपच कमी प्रकरणांमध्ये अँटिबायोटिक्स आवश्यक असतात. कॉलरा प्रतिबंधक लसदेखील उपलब्ध आहे.

विविध दवाखाने आणि रुग्णालयात मोठ्या संख्येने येणाऱ्या रुग्णांना हाताळण्याकरता मुंबई महानगरपालिकेने दरवर्षी प्रमाणे या वर्षीही तयारी केली आहे. सर्व रुग्णालये विशेष बाह्यरुग्ण विभाग चालवतात. या रुग्णांना प्रवेश देण्यासाठी विशेष कक्ष तयार करतात. रुग्णांना सर्व औषधे मोफत दिली जातात. रुग्णांसाठी रक्त आणि प्लेटलेटसह पुरेशी औषधं आणि इतर उपकरणे, जसे व्हेंटिलेटर उपलब्ध करून दिली जातात.

## असे टाळा जलजन्य आजार





सहज सोप्या मार्गाने काही जलजन्य रोग टाळता येतात. आपण नेहमी खाण्यापूर्वी, अन्न हाताळण्याआधी आणि शौचानंतर आपले हात साबणाने धुवायला हवे. रस्त्यावरील खाद्यपदार्थ टाळावे. स्वच्छ आणि ताजे शिजवलेले घरगुती पदार्थांच शक्यतो खावेत. फळे आणि भाज्या ताज्या असाव्यात. वापरण्यापूर्वी त्या स्वच्छ धुऊन घ्याव्यात. सर्वांनी स्वच्छ आणि शुद्ध (उकळलेले किंवा फिल्टर केलेले) पाणी प्यावे.

पावसाळ्यातील आजारावर नियंत्रण मिळवणे हे डॉक्टरपेक्षा आपल्याच जास्त हातात आहे. आपणच आपली थोडी काळजी घेतली तर आपण या सर्व रोगांपासून स्वतःला वाचवू शकतो.

– डॉ. मिलिंद य. नाडकर, प्राध्यापक
– डॉ. विशाल गुप्ता, साहाय्यक प्राध्यापक
औषध वैद्यकशास्त्र विभाग, सेठ गो. सु. वैद्यकीय महाविद्यालय आणि
के. इ. म. रुग्णालय, मुंबई



**कुठलाही हल्ला म्हटला की, सावधगिरीही आलीच. हल्ला म्हणला की जीव आणि मालमत्तेचे नुकसान होईल, एवढीच भीती कुठल्याही सामान्य माणसाच्या मनात निर्माण होते. मात्र आधुनिक काळातील सायबर हल्लाही तेवढीच धडकी भरवणारा असतो.**

# सायबर हल्ल्यापासून सावधान

सायबर हल्ला सायबर स्पेस म्हणजे इंटरनेटमध्ये होतो म्हणून याला सायबर हल्ला म्हणतात. हा हल्ला दहशतवादी किंवा परकीय सैन्य आपल्यावर करत नसतात तर आतापर्यंतचा इतिहास आहे की असे हल्ले सायबर गुन्हेगार करतात. असे सायबर गुन्हेगार कुठल्यातरी देशात बसून सामान्य लोकांवर, कंपन्यांनवर किंवा आपल्या संवेदनशील इमारतीवर, भौगोलिक भागांवर जसे विजेचे मनोरे, रुग्णालय, रेल्वे लाइन, विमानतळ ह्यावर हल्ला करतात. जेणेकरून हल्ल्यामुळे सार्वजनिक व्यवस्था ढासळते आणि हल्लेखोरांच्या मागण्यांच्या आपण आहारी जातो. अशा हल्ल्यांच्या मागे दोन उद्देश असतात, एक तर मानहानी आणि दुसरा म्हणजे पैसे उकळणे.

जेव्हा एक देशातून दुसऱ्या देशाची संकेतस्थळे बदनाम केली जातात तेव्हा संकेतस्थळाच्या पानावरील मूळ मजकूर काढून बदनामीकारक मजकूर टाकला जातो. ह्यापाठी उद्देश हा मानहानीचा असतो. त्यांना दाखवायचे असते की तुमच्या घरात, तुमच्या संकेतस्थळावर शिरून तुम्हाला आम्ही बदनाम करू शकतो.

## रॅन्समवेअरच्या टोळ्या

'व्हायरसचे जे ॲटक होतात, ते परदेशातून होतात. रॅन्समवेअरच्या टोळीमध्ये रॅन्समवेअर बनवणारी एक टोळी वेगळी आणि ती विकणारी एक टोळी असते तर तिचा वापर करणारी टोळी वेगळी असते. तिचा वापर केल्यानंतर पैसे वसूल करणारी टोळी वेगळी असते. अशा वेगवेगळ्या टोळ्या आतंरराष्ट्रीय स्तरावर काम करत असतात.

## खंडणीचे साधन

सायबर हल्ला हा कुठलाही सीमारेषा जाणत नाही. त्यांच्यासाठी सर्व जग एक सायबर स्पेस आहे. ते या सायबर स्पेसवर सारखा हल्ला करत रहातात. त्यांचे कुठल्याही देशाशी काहीही देणेघेणे नसते. सायबर गुन्हेगार खंडणी बीटकॉइन चलनात मागतात. बीटकॉइन एक जगव्यापी चलन आहे. इंटरनेटवर वापरण्यासारखे असते. भारतात आपण बीटकॉइन कायदेशीर मानत नाही. हे असे गुन्हेगार जेव्हा रॅन्समवेअरचा वापर करून हल्ला करतात. तेव्हा तुमच्याकडे असणारे सर्व संगणक निकामी होऊन जातात. याचा अर्थ असा की, तुमच्या संगणकातील हार्ड-डिस्कमधील सर्व डेटा एनक्रिप्ट केला जातो. एनक्रिप्टशनचा अर्थ म्हणजे' तुमचा सर्व डेटा अर्थहीन होतो. एनक्रिप्टशन करतात म्हणजे, हल्ला करणारी मंडळी अशी काही चावी वापरतात की, तुमच्या सर्व डेटाला टाळे लागते! त्याची चावी हल्ला करणाऱ्या लोकांकडे असते, त्यांची इच्छा एवढीच असते की, तुम्ही त्यांनी मागितलेली खंडणी द्यावी. मग ती चावी ते तुमच्यापर्यंत पाठवतात, ती चावी वापरून तुम्ही तुमचा सर्व डेटा पूर्ववत करू शकता.

अशा प्रकारे खंडणी उकळणे हा एक आंतरराष्ट्रीय गोरखधंदा आहे, आणि सर्रास तो तुम्हा आम्हांला त्रास देत राहतो. भारतात तर सी.ए., कंपनी सेक्रेटरी, वकील, छोटे व्यवसायिक असे कित्येक लोक माझ्याकडे रॅन्समवेअर हल्ला झाला की येऊ लागतात. ह्या ॲटकला बँका आणि मोठे व्यावसायिक मुळीच अपवाद नाहीत. रॅन्समवेअरचे प्रकरण हे वाढत जाणार आहे, वाढत राहणार आहे.

## पायरेटेड सॉफ्टवेअर टाळा

अनेकजण पायरेटेड सॉफ्टवेअर म्हणजे, पैसे न देऊन विकत घेतलेले सॉफ्टवेअरचा वापर करतात. अनधिकृतरीत्या घेतलेले सॉफ्टवेअर आपण वापरले तर आपल्याला व्हायरसचा कायम धोका असतो. सॉफ्टवेअर विकणाऱ्या कंपन्या इंटरनेटवरती एखादा व्हायरस अथवा मोठ धोका निर्माण झाला तर त्याच्या बचावासाठी जो अपडेट रिलीज करतात तो अनधिकृत सॉफ्टवेअर वापरणाऱ्याला मिळू शकत नाही. हे अपडेट मिळवण्याचा प्रयत्न जर पायरेटेड सॉफ्टवेअर वापरणारे घ्यायला गेले तर सॉफ्टवेअर कंपन्यांना आपल्या पायरेटेड सॉफ्टवेअरची माहिती कळते, मग ते तुमचे सॉफ्टवेअर बंद करून टाकतात किंवा तुम्ही जर



खूप सारे संगणक वापरात असाल तर तुमच्यावरती कायदेशीर कारवाई करतात, किंवा तुम्हांला सर्व सॉफ्टवेअर संगणकांसाठी घेण्यास भाग पाडतात. आपल्याकडे, हे तुटपंजे पैसे वाचवण्यासाठी आपण पायरेटेड सॉफ्टवेअर वापरतो आणि मोठ्या संकटाला सामोरे जातो.

### सायबर हल्ल्यापासून असा करा बचाव

- आपण वापरत असलेली ऑपरेटिंग सिस्टम अपडेटेड असावी.
- तुमच्याकडे एखादातरी अँटीव्हायरस असायलाच पाहिजे. अँटीव्हायरस नेहमी अपडेटेड असावा. तुमच्याकडे जुना अँटीव्हायरस असेल तर तो काहीच कामाचा नसतो.
- तुमच्याकडे फायर वॉल असायला पाहिजे. फायर वॉलमुळे इंटरनेटवरील अश्लील आणि धोकादायक संकेतस्थळावर तुम्ही तुमच्या कार्यालयातील स्टाफला जाण्यापासून मज्जाव करू शकता, आणि तरीही जर कुणी अशा संकेतस्थळावर उघडण्याचा प्रयत्न केलाच तर तुम्हांला ते इंटरनेटच्या अहवालात मिळू शकते.
- सायबर हल्ला झाला आणि तुमचे संगणक कोलमडले, तर मग काय करणार? मग तुमचा बचाव फक्त तुमची एक चांगली सवय करू शकते आणि ती म्हणजे आपल्या डेटाचा नियमितपणे बॅकअप घेणे.

सायबर महागुरू

## डीडीओएस व रॅन्समवेअर हल्ला

पैसे उकळण्यासाठीच्या उद्देशाने जे सायबर हल्ले होतात त्यात अजून दोन प्रकार आहेत, एक म्हणजे डीडीओएस हल्ला आणि दुसरा रॅन्समवेअर हल्ला. डीडीओएस हल्ल्यामध्ये एकाच वेळी टार्गेटेड सर्व्हरवरती वेगवेगळ्या संगणकातून वेगवेगळ्या भागातून हल्ला केला जातो. अर्थात असंख्य रिक्वेस्ट पाठवल्या जातात. सर्व्हरला असे वाटते की तो अधिकृत रिक्वेस्टने सर्व्ह करण्यात गुंग आहे. प्रत्यक्षरीत्या मात्र सर्व खोट्या रिक्वेस्ट पाठवत असतात जेणेकरून तो सर्व्हर असंख्य रिक्वेस्टने लोड होतो आणि खऱ्या अधिकृत रिक्वेस्टला तो सेवा पुरवू शकत नाही. डीडीओएस हल्ला करणारे सॉफ्टवेअर हे इंटरनेटचा दुसरा भाग म्हणजे 'डार्क वेब' यात मिळतो. 'डार्क वेब' हा इंटरनेटपेक्षा जास्त मोठा आहे. याची




उलाढाल जास्त पटीने होत असते. डीडीओएस हल्ला करणारे सॉफ्टवेअर किंवा बॉटनेट याची रीतसर विक्री होते. असे सॉफ्टवेअर विकल्यानंतर त्याच्या पुढची ग्राहक सेवाही ते पुरवतात. सगळे अगदी रीतसर सुरू असते. याचा जो व्यवहार त्यात पैसे हे 'बीटकॉइन' स्वरूपात, रोख स्वरूपात किंवा वस्तुविनिमयाच्या स्वरूपात म्हणजे 'तुम्ही मला सॉफ्टवेअर द्या, मी तुम्हाला अमलीपदार्थ देतो' इत्यादी रूपात होतो. पैसे उकळण्याचा दुसऱ्या प्रकारचा हल्ला म्हणजे ' रॅन्समवेअर', याचा मराठीमध्ये अनुवाद असा होईल की, खंडणी उकळणारा कुठलाही संगणकीय प्रोग्राम ज्याला आपण 'व्हायरस' म्हणू शकतो.

### बॅकअप ठेवा




बॅकअप घेताना काही गोष्टींची काळजी घेतली पाहिजे जसे लहान ऑफिसमध्ये दोन हार्ड डिस्क ठेवणे गरजेचे आहे एक ऑफिसमध्ये आणि एक घरात. त्या हार्ड डिस्कचा रोज बॅकअप घेऊन त्या अपडेटड ठेवाव्या. असे जर तुम्ही करत असाल किंवा करायला लागलात तर कितीही मोठा सायबर अॅटक झालाच तर सर्व मशीन तुम्ही फॉरमॅट करून दुसऱ्या दिवशीपासूनच तुम्ही तुमचे काम पूर्ववत करू शकता. पण जर बॅकअप नसेल तर दोन गोष्टी होतात, आपला व्यवसाय पूर्ववत होत नाही आणि आपले क्लायंट, ग्राहक यांच्या समोरही आपण तोंडघशी पडतो. ग्राहकाला असे वाटू शकते की ह्या व्यक्तीला ह्या कंपनीला मी माझा डेटा मोठ्या विश्वासाने देतो आणि हा माझ्या डेटाशी खेळतो किंवा आपल्या डेटाला सुरक्षित ठेवण्याची ह्या कंपनीची कुवत नाही. कुठल्याही डेटाचे बॅकअप घेणे गरजेचे आहे. जर तुम्हांला हार्ड डिस्कवर बॅकअप घेणे जमत नसेल तर, तुम्ही क्लाउड वर बॅकअप घेऊ शकता. हल्ली स्वस्त दरात क्लाऊड बॅकअप पर्याय सर्व नागरिकांसाठी उपलब्ध आहेत. जेवढा चांगला बॅकअप तेवढा जास्त तुमचा डेटा सुरक्षित राहातो.

### सायबर सुरक्षा संस्कृती

सायबर हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी सायबर सुरक्षेची संस्कृती तुम्ही जर तुमच्या कार्यालयात अथवा कंपनीत करू शकला तर डेटाची सुरक्षा हा दुय्यम भाग होईल. सर्वजण डेटा आणि त्याच्या सुरक्षेबाबत सजग राहतील.सायबर सुरक्षा हा जीवनाचा एक भाग बनून जाईल मग कुठलाही सायबर हल्ला मग तो देशातून वा परदेशातून झाला तरी तुमची टीम असे सायबर हल्ले परतून लावायला सक्षम असेल.

**– अॅड. प्रशांत माळी**
सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ

# एका आगळ्या लग्नाची गोष्ट



सिन्नर तालुक्यातील हिवरे गाव हागणदारी मुक्त करण्याच्या प्रशासनाच्या प्रयत्नांना यश येत नव्हते. अशा वेळी तरुण ग्रामसेवक किशोर विभुते यांनी गाव हागणदारीमुक्त होईपर्यंत विवाह न करण्याचा निश्चय केला. बाहेरच्या जिल्ह्यातील तरुण आपल्यासाठी वैयक्तिक आयुष्यातील आनंदाचाही त्याग करीत असल्याचे पाहून ग्रामस्थदेखील पुढे सरसावले....आणि अवघ्या काही महिन्यातच गाव हागणदारीमुक्त झाले.

सिन्नरपासून साधारण १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हिवरे गावात एकूण ३५१ कुटुंब आहेत. त्यापैकी १७४ कुटुंबांकडे शौचालय होते. उर्वरित १७७ कुटुंब शौचालय बांधण्यासाठी पुढे येत नव्हते. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी सुखदेव बनकर यांनी सिन्नर

> विभुते यांनी चांगले उदाहरण प्रस्तुत केले आहे. एखाद्याच्या समर्पण भावनेने चांगले काम कसे होते हे हिवरे गावात दिसून आले आहे. सिन्नर तालुक्यात इतरही ग्रामसेवकांनी चांगले काम केले आहे. त्यामुळे तालुका लवकरच हागणदारीमुक्त होईल.
>
> **– रत्नाकर पगार, गट विकास अधिकारी**

पंचायत समिती येथे घेतलेल्या बैठकीत शौचालय उभारणीसाठी ग्रामस्थांना तयार करण्याचे आव्हान कोण स्वीकारेल, असा सहज प्रश्न उपस्थित केला असता श्री. विभुते यांनी आव्हान स्वीकारले. एवढेच नव्हे तर गाव हागणदारीमुक्त होईपर्यंत लग्न न करण्याचा निश्चय बोलून दाखवला. काहींनी त्यांना यापासून परावृत्त करण्याचादेखील प्रयत्न केला. मात्र ते आपल्या निश्चयावर



ठाम राहिले.

श्री. विभुते हे मुळचे लातूर जिल्ह्यातील नळेगावचे. एक हुशार आणि धडाडीचे ग्रामसेवक म्हणून आपल्या कारकिर्दीच्या सुरवातीलाच त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. हीच धडाडी दाखवीत त्यांनी ग्रामस्थांना तत्कालीन सरपंच लता सहाणे, विद्यमान सरपंच विमल बिन्नर यांच्यासह घरोघरी जाऊन समजवण्याचा प्रयत्न केला. वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. विविध बैठकातून मार्गदर्शन केले. विस्तार अधिकारी प्रल्हाद बिब्बे आणि ग्रामविकास अधिकारी संजय गिरी यांनीदेखील बैठकांमधून श्री. विभुते यांचे उदाहरण देत ग्रामस्थांनी गावासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. श्री. विभुते

> गाव हागणदारीमुक्त झाल्याशिवाय विवाह न करण्याचा निश्चय केल्यावर ग्रामस्थांनीदेखील माझ्यावरच्या प्रेमापोटी शौचालय बांधण्यास सहमती दर्शवली. सर्वांनी सहकार्य केल्यानेच हे शक्य होऊ शकले. गावाच्या विकासात काहीतरी योगदान दिल्याचा आनंद आहे.
>
> **– किशोर विभुते, ग्रामसेवक**

यांच्या निर्णयामुळे ग्रामस्थांच्या मानसिकतेत हळूहळू परिवर्तन झाले.

दरम्यान जून २०१६ मध्ये श्री. विभुते यांचा साखरपुडा झाला. तत्पूर्वी गावात २०१४-१५ मध्ये १४ आणि २०१५-१६ मध्ये १०७ कुटुंबांनी शौचालय बांधले होते. या कुटुंबांना रुपये १२ हजाराप्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आले. उर्वरित ५६ कुटुंबांकडे शौचालय नसल्याने त्यांनी विवाहाचा मुहूर्त निश्चित करण्यास नकार दिला. गावात त्यांच्या विवाहाची आणि त्यासाठी शौचालय बांधण्याची चर्चा होऊ लागली. अखेर ऑगस्ट २०१६ मध्ये राहिलेल्या सर्व शौचालयांचे काम पूर्ण होऊन गाव हागणदारीमुक्त जाहीर झाले. उद्दिष्ट पूर्ण झाल्याने विभुते यांनी विवाह निश्चित केला. २१ एप्रिल रोजी त्यांचा विवाह उदगीर तालुक्यातील संगम येथे संपन्न झाला.

गाव हागणदारीमुक्त होण्याच्या आनंदाएवढाच आनंद ग्रामस्थांना श्री. विभुते यांच्या विवाह सोहळ्याचा आहे. आज संपूर्ण गाव त्यांच्या वैवाहिक जीवनातील आनंदाची कामना करीत त्यांना शुभेच्छा देत आहे. त्यांच्या प्रतिज्ञेने गावाला एकत्र होऊन चांगले काम करण्याची ऊर्जा दिले आहे.

**– डॉ. किरण मोघे**
जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक

# जलसमृद्ध गोळेगाव

**दुष्काळी परिस्थितीत भीषण पाणीटंचाईचा सामना करणारे आणि टँकरवर अवलंबून असणारे गोळेगाव (ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद) टँकरमुक्तीकडे वाटचाल करत आहे. पहिल्या वर्षी झालेल्या जलयुक्त शिवारच्या कामानंतर आणि आता पाणी फाउंडेशनच्या वॉटर कप स्पर्धेत सहभागी होऊन गोळेगावने जलसंधारणामध्ये महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. मान्सूनपूर्व पहिल्याच पावसाने शिवार 'जलयुक्त' झाले आहे.**



एकजुटीने गोळेगाव दुष्काळमुक्त तयार करण्याचा संकल्प गावाने केला आहे. जलयुक्त शिवार व वॉटरकप स्पर्धेच्या माध्यमातून गोळेगाव जलसमृद्धीकडे वाटचाल करत आहे. गोळेगावमध्ये सुरू असलेल्या जलस्वावलंबन जनजागृती कार्यक्रमातून गावाचे शिवार पाणीदार होत आहे. श्रमदानातून तसेच यंत्रसामुग्रीतून झालेल्या कामांतर्गत वर्षाकाठी जवळपास २३ कोटी ५० लाख लीटर पाणीसाठा येथे होणार आहे. गावचे सरपंच संतोष जोशी यांनी ग्रामस्थांना पाण्याचे महत्त्व पटवून देत या मोहिमेत सहभागी करून घेतले.

## लोकसहभाग

टँकरमुक्तीकडे वाटचाल करताना गावातील प्रत्येक कुटुंबाचे वॉटर बजेट (पाणी अर्थसंकल्प) तयार करण्यात आले. जलयुक्त शिवारच्या कामासाठी भारतीय जैन संघटनेने जेसीबी, पोकलेन मशीन उपलब्ध करून दिले. कृषी विभागाने डीप सीसीटी, समतलचर, लघुसिंचन विभागाने सिमेंट बंधारे बांधून पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवण्यासाठी प्रयत्न केले. गावाजवळील नदी-नाले खोलीकरणाचे काम करण्यात आले. वॉटर कप स्पर्धेतून प्रेरणा घेऊन ८ एप्रिल ते २२ मे या दरम्यान ४५ दिवस श्रमदानातून तर ६४० तास पोकलेनच्या मदतीने तंत्रशुद्ध काम करण्यात आले. राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या ६५० मुलामुलींनी तसेच विविध स्वयंसेवी संस्थांनी श्रमदान केले. तर ९ मे रोजी बुद्धपौर्णिमेच्या दिवशी औरंगाबादचे जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांसह श्रमदानातून अवघ्या दोन तासात वृक्षारोपणासाठी साडेपाच हजार खड्डे खोदून विक्रम नोंदवला.

## विहिरींना पाझर

कृषी विभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे झाली. गोळेगावच्या शेतशिवारात मान्सूनपूर्व झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून शिवार जलयुक्त झाले आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या विहिरींना पहिल्याच पावसात पाझर फुटला आहे. शेतकऱ्यांच्या विहिरींची, बोअरवेलच्या पाण्याची पातळी वाढली आहे. या वर्षी चांगला पाऊस पडला तर गोळेगाव शिवारात २३ कोटी ५० लीटर पाण्याचा साठा होणार आहे. पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आता गोळेगावकरांना येणार नाही. पाणी फाउंडेशनची वॉटर कप स्पर्धा तर केवळ एक माध्यम आहे. ग्रामस्थांनी एकजुटीने विकासाची वाट स्वतःहून निवडल्याने पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या शेतीच्या सिंचनाची अडचण दूर होण्यास मदत होणार आहे. गोळेगाव येथील जलसंधारणाच्या चळवळीला अनेकांनी भेट देऊन गावकऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

### संकल्पसिद्धी

पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना वणवण भटकंती करावी लागते. हा त्रास कायमचा दूर करण्यासाठी गोळेगाव जलसमृद्ध करण्याचा आम्ही संकल्प केला आहे. पाणी फाउंडेशनने शास्त्रशुद्ध तंत्र पद्धतीने मार्गदर्शन केल्यामुळे माथा ते पायथा काम झाले आहे. पाच वर्षे सतत काम केले जाणार असून शिवारात साडेपाच हजार झाडे लावून गोळेगाव दुष्काळमुक्त गाव तयार करण्याचा आमचा संकल्प आहे.



– संतोष जोशी, सरपंच गोळेगाव

**– विजय चौधरी**
खुलताबाद



# स्मार्ट शाळा

**गेल्या दोन वर्षांपासून अर्थाने तांडे, वाडी, पाडे, वस्त्या तसेच गावोगावींच्या जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षणाचे वारे जोमाने वाहू लागले आहेत. हा बदल 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या अभियानामुळे दिसून येतो. शाळा डिजिटल झाल्या आहेत. रचनावाद, कृतियुक्त अध्यापन पद्धती, मोबाइल डिजिटल शाळा यासह अजून नवीन शैक्षणिक संकल्पनांचा समावेश करण्यात आला. प्रत्येक मूल आवडीने शिकले पाहिजे हा हेतू ठेवून काम केले गेले. त्यामुळे जि.प.च्या शाळेकडे बघण्याचा पालकांचा दृष्टिकोन बदलू लागला आहे.**

राज्यात शिक्षण विभागामार्फत गुणवत्तेसाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. २२ जून २०१५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री विनोद तावडे व शिक्षण विभागाचे प्रधान सचिव नंदकुमार याच्या प्रयत्नातून 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' हा शासन निर्णय अस्तित्वात आला. प्रत्येक मूल शिकले पाहिजे हा विचार केला गेला. म्हणून हे अभियान खऱ्या अर्थाने 'शाळा-समाज-शिक्षक-विद्यार्थी यांना जोडणारा 'शैक्षणिक सेतू' ठरले आहे.

अभियानाच्या सुरुवातीला जून महिन्यात शिक्षण विभागाचे प्रधान सचिव नंदकुमार यांनी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन, हे अभियान काय आहे हे शिक्षकांना समजावून सांगितले. एकांगी शिक्षण पद्धतीत केवळ पुस्तक एके पुस्तक असे होते, त्यामुळे कितीतरी मुले या प्रवाहापासून दुरावली होती. मात्र गेल्या वर्षभरापासून विविधांगी शैक्षणिक वादातून मुले स्वतःला काय येतेय हे सांगू लागली व शाळेत रमू लागली. या अभियानामुळे मुले शिकायला लागली तीही आपल्या अनुभवातून. त्यांना हे स्वातंत्र्य या अभियानामुळे मिळाले. शाळेत बालस्नेही वातावरण तयार झाले.

## सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर

हे अभियान उभे राहण्यामागे व यशस्वीतेकडे नेण्यामागे सोशल मीडियाचा खूप मोठा वाटा आहे. सोशल मीडियाचा उपयोग प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियानामुळे झाला. शिक्षण विभागाचे प्रधान सचिव नंदकुमार हे स्वतः शिक्षकांच्या विविध सोशल ग्रुपमध्ये सहभागी झाले. त्यांनी शिक्षकांना जिथे अडचण येईल तिथे हमखास वेळ काढून मार्गदर्शन केले. आजमितीला राज्यात व्हाट्स ॲपचे विविध शैक्षणिक गट तयार झाले असून यातून शिक्षक आणि शाळा नवीन काय करतायेत याची माहिती तर समजतेच. मुलांनी राबवलेले उपक्रम, नावीन्यपूर्ण बाबींचा यातून प्रसार होतो आहे.

या वर्षी मे महिन्यात ॲक्टिव्ह टीचर्स फोरम, कृतिशील शिक्षक महाराष्ट्र व महाराष्ट्र ॲडमिन पैनल, सृजन शिक्षण सांगली व आता करके देखो या व्हाट्सॲप ग्रुपची संमेलने पार पडली. यातून प्रकर्षाने एक निदर्शनास आले ते म्हणजे एकून सात लाख शिक्षकांपैकी मोजकेच होतकरू शिक्षक स्वखर्चाने अशा ठिकाणी जाऊन ज्ञान घेताना दिसत आहेत. यात महिला शिक्षिकाही ठामपणे भूमिका मांडताना दिसून येतात.

## शाळा एका क्लिकवर

जिल्हा परिषदेच्या शाळांची माहिती एका क्लिकवर आपणांस उपलब्ध होते. या अभियानांतर्गत 'सरल' प्रणालीच्या माध्यमातून हे शक्य झाले. सरलच्या माध्यमातून शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची

## शाळा भेटीतून स्वयंप्रेरणा

जूनपासून अभियानाची सुरुवात झाली आणि यात मुलांना रचनावादी वर्ग पद्धतीने शिकवावे असे सांगितले गेले. २०१० मध्ये शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी झाली यानुसारच मुलांना रचनावादी पद्धतीने शिकवावे असे नमूद केले असताना यंत्रणेने व शिक्षकांनी ही बाब गांभीर्याने घेतली नाही. अशा वेळी रचनावादी पद्धती कशी आहे हे शिक्षकांना प्रत्यक्ष अनुभवता यावे यासाठी सातारा जिल्ह्यातील 'कुमठे बिट' बघावयास राज्याच्या कान्याकोपऱ्यांतून शिक्षक यायला लागले.



मागील तीन वर्षापासून कुमठे येथे ज्ञानरचनावादी रीतीने मुले स्वतः कसे शिकतात व शिक्षक केवळ सुलभकाची भूमिका बजावतो हे इतर शिक्षकांनी पाहिले. दगड, चिचोंके, काड्या यासह अनेक परिसरात सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्यातून व रचनावादी आरेखने यातून येथील मुले १०० टक्के प्रगत झाली. हे स्वानुभव घेऊन शिक्षक आपापल्या शाळेत गेले. तिथे जाऊन वर्गातील बाकडी बाहेर काढून मुलांसाठी हाताने रचनावादी आरेखने आखली. मुले शिकायला सुरुवात झाली. आजपावेतो कुमठे बीट, चंद्रपूर जिल्हातील ताडाळी, नाशिक जिल्हातील निफाड, हवेली, तसेच लातूर, मिरज व कृतियुक्त अध्यापन पद्धतीने कसे शिकवावे हे सांगणारी केंजळ या प्रेरणादायी शाळांना; एकूण सात लाख शिक्षकांपैकी दोन लाख शिक्षकांनी भेट देऊन, स्वंयप्रेरणा घेतली. याचा फायदा गावोगावी झाला. लोकसहभाग व शिक्षक सहभागातून २५४.१७ कोटींचा निधी उभा राहिला. यातूनच मुले शिकायला लागली. आज खेडेगावातील मुले तीन शब्दांवरून आठशे शब्दात गोष्ट तयार करायला लागली आहेत. सोबतच छोटी छोटी नाटिका लिहून ते सादर पण करतात.

इत्थंभूत माहिती संकलित केली गेली. प्रवेश निर्गमसारखे अभिलेखदेखील याद्वारे संगणकीकृत झाले.

एव्हढ्यावरच न थांबता या अभियानात घेतल्या गेलेल्या चाचण्यांचे गुणदेखील सरलच्या माध्यमातून प्रथमच ऑनलाइन भरून गुणवत्तेबाबतही अधिकाधिक पारदर्शकता आणली. विद्यार्थी पोर्टलच्या माध्यमातून बोगस पटसंख्या दाखवून अनुदान लुटणाऱ्या बऱ्याच खासगी शिक्षण संस्थांनादेखील चाप बसला.

### शाळा डिजिटल झाल्या...

या अभियानात प्रामुख्याने डिजिटल शाळा करण्याकडे भर देण्यात आला. २००५ पासून जालना जिल्ह्यातील अनिल सोनुने या शिक्षकाने याची मुहूर्तमेढ रोवली होती. तिला मूर्त रूप देण्याचे काम संदीप गुंड या ठाणे जिल्ह्यातील एका शिक्षकाने करून दाखवले. त्यांनी पस्टेपाडासारख्या दुर्गम भागातील आदिवासींच्या मुलांना इंटरॲक्टिव्ह पद्धतीने शिकवून डिजिटल अभियानास गती दिली. याचाच फायदा असा झाला की, गावोगावीच्या गुरुजींनी गावात फिरून ई-क्लाससाठी विविध माध्यमातून लोकवर्गणी जमा करून मुलांना या आधुनिक प्रवाहाशी जोडते केले.

गौरी पाटील या नाशिक जिल्ह्यातील महिला शिक्षिकेने 'बालस्नेही' संकेतस्थळ तयार करून अभियानास गती देण्यात मोलाची भूमिका बजावली. आजमितीस राज्यात ३४००० मोबाइल डिजिटल शाळा तर ३३००० शाळा डिजिटल झाल्यात. यातून मुले विज्ञान, भूगोल या विषयातील कठीण संबोध तर सहज समजावून घेत आहेत. यामुळे उपस्थितीचे प्रमाणही वाढलेले आहे.

### दुष्काळतही कोट्यवधींचा लोकसहभाग

दुष्काळी भागातील मराठवाड्यात शिक्षक आमच्या मुलांसाठी जिवाचे रान करत आहेत हे बघून पालक शाळेच्या पाठीमागे उभे राहिले.

काही तालुक्याची प्रातिनिधिक उदाहरणे द्यावयाची झाल्यास परभणी जिल्ह्यातील पूर्णा येथील गटशिक्षणाधिकारी विठ्ठलराव भुसारे यांनी 'जागर शिक्षणाचा' या उपक्रमातून चार महिन्यात दोन कोटींचा लोकसहभाग गोळा करून संपूर्ण तालुक्यातील शाळांचे रूपडे बदलले. नांदेड जिल्ह्यातील हदगाव या ठिकाणी गटशिक्षिणाधिकारी येरपुलवार यांनी असेच लोकसहभागातून शाळांचे रूपडे बदलले. या ठिकाणी आदिवासी भागातील गरीब महिलांनी मोळी विकून शाळांसाठी देणगी दिली. हे उदाहरण या अभियानाची यशस्वीता दर्शवते. पुणे जिल्ह्यातील केंजळ येथील मुख्याध्यापक जे.के. पाटील यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने गावातच देशातील पहिली सोयीसुविधायुक्त दोन कोटी रुपयांची शाळा इमारत उभारून मुले समृद्ध बनवली.

२६४६ आयएसओ शाळांच्या माध्यमातून शाळांची प्रतवारी सुधारण्याचे महत्त्वपूर्ण काम या अभियानातून झाले आहे. जानेवारी २०१७ पर्यंत राज्यातील १३९९६ शाळा स्वंयघोषित १०० टक्के प्रगत म्हणून घोषित झाल्यात. गावोगावी शैक्षणिक वातावरण तयार झाले. समाज-शाळा-अधिकारी-शिक्षक हे घटक याकडे सकारात्मकेने बघत आहेत. यातूनच नवीन शैक्षणिक स्थित्यंतर घडवण्यास महाराष्ट्र सज्ज झाला आहे.

**- संतोष मुसळे**
सहशिक्षक जि.प.प्रा.शा.गुंडेवाडी, जालना



# मतदार राजा: लोकशाहीचा धागा

**विविध जाती, धर्म, प्रांत, भाषा, हवामान, भौगोलिक भिन्नता अशा वैविध्याने नटलेल्या आपल्या देशाकडे जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून बघितले जाते. लोकशाही प्रक्रियेत निवडणूक हे अत्यंत महत्त्वाचे अंग असते. त्यात सर्वाधिक महत्त्वाचा घटक मतदार असतो. मतदारांच्या सक्रिय सहभागामुळे लोकशाहीला बळकटी प्राप्त होते. त्यासाठी मतदार जागृती आणि मतदार शिक्षणाची प्रक्रिया निरंतर सुरू ठेवण्याच्या उद्देशाने आता दरवर्षी ५ जुलै हा 'राज्य मतदार दिवस' म्हणून साजरा करण्यात येणार आहे.**

भारतीय राज्य घटनेच्या कलम ३२४(१) अन्वये २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. भारत निवडणूक आयोगाचा हीरक महोत्सव २०११ मध्ये पार पडला. तेव्हापासून आयोगाचा २५ जानेवारी हा स्थापना दिवस 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. मतदार जागृती निर्माण करणे आणि मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवणे हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.

## मतदार जागृती

राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते; परंतु मतदार जागृतीचे काम निरंतर सुरू राहणे आवश्यक आहे. म्हणून प्रत्येक राज्याच्या स्तरावर स्वतंत्ररीत्या 'राज्य मतदार दिवस' साजरा आणि जिल्हास्तरावर 'जिल्हा मतदार दिवस' साजरा करण्यात यावा, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाने प्रत्येक राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिले होते. भारत निवडणूक आयोगाचे प्रत्येक राज्यात स्वतंत्र कार्यालय आहे. त्याचे प्रमुख म्हणून 'मुख्य निवडणूक अधिकारी' कार्यरत असतात. आयोगाच्या निर्देशानुसार आता आपल्या राज्यात ५ जुलै हा 'राज्य मतदार दिवस' म्हणून साजरा केला जाणार आहे; तसेच याच दिवशी प्रत्येक जिल्ह्यात 'जिल्हा मतदार दिवस'देखील साजरा केला जाणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने राज्य मतदार दिवस साजरा करण्याचा आदेश दिल्यानंतर आपल्या राज्यात १ जुलै राज्य व जिल्हा मतदार दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता; परंतु राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांची १ जुलै रोजी जयंती असते. त्यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरा केली जाते. त्यामुळे १ जुलै ऐवजी अन्य दिवशी राज्य मतदार दिवस साजरा करण्यात यावा, अशी मागणी वस्तू व सेवा करासंदर्भात झालेल्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात सदस्यांकडून करण्यात आली होती. त्यानुसार आता १ जुलै ऐवजी ५ जुलै हा राज्य व जिल्हा मतदार दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे.

## लोकशाहीचे बळकटीकरण

भारत निवडणूक आयोगाने लोकशाहीच्या अधिकाधिक बळकटीसाठी मतदारांमध्ये जागृती करून त्यांचा मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग

वाढविण्याच्या हेतूने 'स्वीप' (SVEEP- Systematic Voters and Education Electoral Participation) हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याअंतर्गत विविध माध्यमातून मतदारांशी संपर्क साधून लोकशाहीचे महत्त्व विशद करणे आणि कुठलाही मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी सातत्याने प्रतत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आता राज्य व जिल्हा मतदार दिवस साजरा केला जाणार आहे. भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार या दिवशी कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार असून त्याची जबाबदारी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांवर असणार आहे.

आपल्या देशात संसद, विधिमंडळ आणि स्थानिक स्वराज्य संस्था अशी त्रिस्तरीय लोकशाही व्यवस्था आहे. या व्यवस्थेत निवडणुका हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधानपरिषदांच्या निवडणुका भारत निवडणूक आयोगातर्फे घेतल्या जातात.



लोकसभेच्या राज्यात ४८; तर विधानसभेच्या २८८ जागा आहेत. त्यासाठी दर ५ वर्षांनी मतदान होते. या मतदानाकरिता विधानसभा मतदार संघनिहाय मतदार यादी तयार केली जाते. मतदार यादी तयार करण्याचे काम मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या स्वतरावरून सतत सुरू असते. वेळोवेळी मतदार नोंदणी आणि मतदार याद्या अद्ययावतीकरण मोहीमदेखील राबवली जाते. वयाची १८ वर्ष पूर्ण करणारा प्रत्येक पात्र नागरिक आपले नाव मतदार यादीत नोंदवू शकतो किंवा नावात अथवा पत्त्यात दुरुस्ती असल्यास त्याही करू शकतो.

## संविधानात्मक जबाबदारी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची संविधानात्मक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक बळकटी देण्यात आली. त्याचबरोबर या घटना दुरुस्तीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रत्येक राज्यात स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने संविधानातील अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए अन्वये आपल्या राज्यात २६ एप्रिल १९९४ रोजी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. राज्य निवडणूक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली राज्य निवडणूक आयोगाचे कामकाज चालते.

## मतदार दिवसाची उपयुक्तता

राज्य निवडणूक आयोगाकडून महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हापरिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातात. या निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदारसंघांचीच मतदार यादी वापरली जाते. ती केवळ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी प्रभागनिहाय विभागली जाते. या बाबींचा विचार करता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीनेदेखील मतदार नोंदणी आणि मतदानाचे प्रमाण वाढवण्याकरिता राज्य आणि जिल्हा मतदार दिवस उपयुक्त ठरू शकेल.

**– जगदीश मोरे**
जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

## विशेष मतदार नोंदणी

भारत निवडणुक आयोगाने जे पात्र व प्रथम मतदार आहेत परंतु काही कारणाअभावी त्यांचा मतदार यादीत समावेश झाला नाही (१८-२१ वर्षे) त्यांचा मतदार यादीत समावेश करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. मतदार नोंदणी करण्यासाठी विशेष मोहीम १ ते ३१ जुलै २०१७ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. याच दरम्यान ८ जुलै २०१७ (दुसरा शनिवार) व २२ जुलै, २०१७ रोजी (चौथा शनिवार) या दोन दिनांकास विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत शाळा महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवेश अर्जासोबतच मतदार नोंदणी अर्जही देण्यात येणार आहेत. तरुण मतदारांची संख्या वाढावी. या उद्देशाने भारत निवडणुक आयोगाच्या सूचनेनुसार महाविद्यालयात प्रवेश घेतानाच विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्जासोबतच नमुना-६ सुद्धा घेण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांकडून भविष्यातील मतदार म्हणून प्रतिज्ञा पत्र लिहून घेण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक गृहनिमार्ण संस्थेमध्ये जाऊनही नांव नोंदणीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

अधिकृत मृत्यू नोंदवहीमधील मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव मतदार यादीमधून वगळण्याची कार्यवाहीसाठी विहीत पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

**– दत्तात्रय कोकरे**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

स्मरण

# येथे कर माझे जुळती...

**सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात २३ जुलै रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि १ जुलै रोजी वसंतराव नाईक यांची जयंती साजरी होत आहे, त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती...**

## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



थोर भारतीय नेते, भगवद्गीतेचे आधुनिक भाष्यकार व प्राच्यविद्या पंडित. त्यांचा जन्म रत्नागिरी येथे २३ जुलै १८५६ रोजी झाला. त्यांचे जन्मनाव केशव; परंतु बाळ हेच नाव पुढे रूढ झाले. टिळक कुटुंबाचे मूळ गाव चिखलगाव (ता. दापोली, जि. रत्नागिरी) टिळकांचे वडील गंगाधरपंत व आई पार्वतीबाई. १८७६ मध्ये ते बी.ए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांनी एल.एल.बी. ही पदवी घेतली. डेक्कन कॉलेजमध्येच टिळक आणि आगरकर यांचा स्नेह जमला. याच सुमारास निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी सरकारी नोकरी सोडून शाळा काढण्याचे ठरवले होते; तेव्हा टिळक व आगरकर दोघेही त्यांच्या सोबतीला होते. १ जानेवारी १८८० रोजी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली. चिपळूणकर, टिळक व आगरकर यांनी १८८१ मध्ये आर्यभूषण छापखाना काढला आणि केसरी (मराठी) व मराठा (इंग्रजी) ही दोन वृत्तपत्रे सुरू केली. प्रारंभी आगरकर केसरीचे व टिळक मराठाचे संपादक होते.

१८८४ मध्ये वेडरबर्न, वर्डस्वर्थ, मंडलिक, तेलंग, दांडेकर, य.मो. केळकर, भांडारकर वगैरे प्रभृतींच्या मदतीने टिळक-आगरकरांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेतर्फे १८८५ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

नेमस्तांची भूमिका सोडून 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच', या भूमिकेपर्यंत लोकांना नेण्याचे कार्य, हा लोकमान्यांचा संकल्प होता. लोकजागृतीची साधने म्हणून गणपती व शिवजयंती या उत्सवांना सार्वजनिक स्वरूप देण्याची कल्पना त्यांनी पुढे आणली.

मंडालेच्या तुरुंगात त्यांनी 'गीतारहस्य' हा अत्यंत मौलिक ग्रंथ लिहिला. सहा वर्षांच्या कारावासानंतर १५ जून १९१४ रोजी सरकारने त्यांना मुक्त केले.

त्यांनी १ मे १९१६ रोजी होमरूल लीग वा हिंदी स्वराज्यसंघ बेळगाव येथे स्थापन केला. तत्पूर्वी १९१५ मध्येच ॲनी बेझंट यांनी मद्रासला होमरूल लीग ही संस्था स्थापन केली होती. होमरूलची चळवळ टिळक व बेझंटबाई यांनी संयुक्तपणे चालवली.

कोलकाता येथील ऐतिहासिक काँग्रेस अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून टिळकांचे नाव पं. मालवीय यांनी सुचविले होते; पण तत्पूर्वीच टिळकांचे मुंबईत काही दिवसांच्या आजारानंतर सरदारगृहात देहावसान झाले.

## वसंतराव नाईक



यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली येथे १ जुलै १९१३ रोजी वसंतराव नाईक यांचा सधन शेतकरी कुटुंबात जन्म झाला. नागपूर विद्यापीठातून बी.ए. तसेच एल.एल.बी.पदवी त्यांनी मिळवली. पुसद येथे स्वतंत्रपणे वकिली व्यवसायास सुरुवात केली.


पुसद तालुक्यातील 'आदर्श ग्राम चळवळी' त पुढाकार. त्यांच्या प्रयत्नांमुळे व तळमळीमुळे त्यांचे स्वत:चे गाव 'गहुली' हे आदर्श गाव बनले. १९५२ मध्ये मध्यप्रदेश मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री म्हणून नियुक्ती.

१९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेनंतर जुन्या मुंबई राज्यात सहकार, कृषी, दुग्धव्यवसाय या खात्यांचे मंत्री म्हणून नियुक्ती. अखिल भारतीय काँग्रेसचे तसेच महाराष्ट्र विभागीय काँग्रेस समिती व कार्यकारिणीचे तेव्हापासून सदस्य. १९५७ - सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेत पुसद मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवड. महाराष्ट्र मंत्रिमंडळात कृषिमंत्री म्हणून नियुक्ती. १९६० - महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळात महसूल मंत्री म्हणून नियुक्ती. १९६२-सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्र विधानसभेवर पुसद मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवड होऊन पुन्हा महसूल मंत्री म्हणून नियुक्ती. मुख्यमंत्री होईपर्यंत हेच खाते त्यांच्याकडे राहिले. ५ डिसेंबर १९६३ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

१९६७- सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्र विधानसभेवर पुसद मतदारसंघातून चौथ्यांदा निवड होऊन ६ मार्च १९६७ ला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर दुसऱ्यांदा एकमताने निवड. या सार्वत्रिक निवडणुकीतून पुसद मतदारसंघातून पाचव्यांदा निवड होऊन १४ मार्च १९७२ ला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी तिसऱ्यांदा निवड झाली. २० फेब्रुवारी १९७५ महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा. १२ मार्च १९७७- वाशिम लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवड. १८ ऑगस्ट १९७९- सिंगापूर येथे ६६ व्या वर्षी निधन. वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस कृषिदिन म्हणून साजरा करण्यात येतो.

(संदर्भ : सामान्यांतील असामान्य- वसंतराव नाईक आणि महानायक ग्रंथ/मराठी विश्वकोश)

**संकलन: गजानन पाटील**


सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
सामाजिक न्यायाच्या दिशेने आणखी एक पाऊल...
डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना
वंचितांना आधार हाच शासनाचा निर्धार...
शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी या योजनेमार्फत आर्थिक मदत.
भोजन, निवास व शैक्षणिक सुविधा भागविण्यासाठी आधार संलग्न बँक खात्यात रकमेचे हस्तांतरण.
विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीकडे विशेष लक्ष.
रुपये ४५,००० पासून रुपये ६५,००० पर्यंत प्रतीवर्षी लाभ.
विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
विद्यार्थी मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणारा असावा, त्याला १०वी/१२वी मध्ये ६०% पेक्षा जास्त गूण असावेत.
पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. २,००,००० मर्यादित असावे.
आवश्यक त्या कागदपत्रांची यादी, इत्यादी माहिती विभागाच्या
https://sjsa.maharashtra.gov.in तसेच https://mahaeschol.maharashtra.gov.in
संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
श्री. राजकुमार बडोले
मा. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री
श्री. दिलीप कांबळे
मा. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य राज्यमंत्री
श्री. मिलिंद शंभरकर
श्री. दिनेश वाघमारे
श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
सामाजिक न्याय दिनाच्या हार्दिक शुभेच्छा


महाराष्ट्र शासन
लोकराज्य
महाराष्ट्रातील सर्वाधिक खपाचे एकमेव मासिक
अधिकृत - विश्वासार्ह - वस्तुनिष्ठ
किंमत फक्त रु. १०/-
वार्षिक वर्गणी रु. १००/-

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th July 2017
Date of Publication : 10th of every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला,
जे.एन. हेरडिया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह